
सुंदर हा देश
अनिल अनंत वाकणकर

सुंदर हा देश

अनिल अनंत वाकणकर

ई साहित्य प्रतिष्ठान

सुंदर हा देश

हे पुस्तक विनामूल्य आहे

पण फुकट नाही

या मागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत .

म्हणून हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

दाम नाही मागत. मागत आहे दाद.

साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि संपूर्ण समाज सतत एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

सुंदर हा देश

लेखक:- अनिल अनंत वाकणकर.

पत्ता:- श्रीमंत पेशवे मार्ग, श्रीवर्धन, जिल्हा रायगड, ४०२११०.

Email-aawakankar@gmail.com

Mobile: 9011857414

ब्लॉग : https://aawakankar.blogspot.in/

या पुस्तिकेतील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पूनर्मुद्रण व नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक--- ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

प्रकाशन : १५ ऑगस्ट २०१९

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध
- आपले वाचून झाल्यावर आपण फॉरवर्ड करू शकता
- हे पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापूर्वी किंवा वाचना व्यातिरिक्त कोणताही वापर करण्यापूर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी आवश्यक आहे.

लेखकाचा परिचय

संपूर्ण नांव:- अनिल अनंत वाकणकर.

पत्ता:- श्रीमंत पेशवे मार्ग, श्रीवर्धन, जिल्हा रायगड, ४०२११०.

मोबाईल क्रमांक:- ९०११८५७४१४

वाचना संबधी:- गेली जवळपास ४० वर्षे अनेक प्रकारची पुस्तके वाचली. त्यातल्यात्यात कांदबरी हा प्रकार जास्त आवडीचा. योगिनी जोगळेकर, वि. स. खांडेकर, बाबा कदम, रणजित देसाई हे लेखक जास्त आवडीचे. श्रीवर्धन येथे वाचनालयात उपलब्ध असणाऱ्या जवळपास सर्वच कादंबऱ्या वाचल्या आहेत. या शिवाय समर्थ रामदास स्वामींचे वाङ्मय, प. पू. पांडुरंग शास्त्री आठवले याची प्रवचने या अंगाचे वाचनही आवडीचे आहे.

स्वत:चे लेखन:- ई साहित्यतर्फे माझी वृक्ष मंदिर ही कादंबरी, दुर्गा कवच, सेवक भूषण, ब्रह्मणस्पती विनायक, भाऊबीज, गुरु दक्षिणा या कथा प्रसिध्द झाल्या आहेत. हे सर्व साहित्य माझ्या https://aawakankar.blogspot.in/ या ब्लॉगवरदेखिल उपलब्ध आहे.





श्री अनिल वाकणकर यांची पूर्वप्रकाशित पुस्तके
www.esahity.com येथे विनामूल्य उपलब्ध.



भाग पहिला



पहिल्या भागाचे प्रास्ताविक

"हिमालयाच्या सहवासात" या माझ्या प्रवासवर्णनात्मक साहित्याचा पहिला भाग वाचकांच्या समोर सादर करताना मला अतिशय आनंद होत आहे. १४ मार्च २०१६ ते ३१ मार्च २०१६ या काळात मी एका सहलीत सहभाग घेतला होता. त्या सहलीच्या प्रवासाच्या अनुभवावर आधारीत केलेल्या लेखनाचे प्रकाशनाच्या सोयीसाठी भाग पाडले आहेत. "हिमालयाच्या सहवासात" या त्यातल्या पहिल्या भागात वैष्णोदेवी, श्रीनगर, पहेलगाम हा प्रवासाचा टप्पा घेतला आहे. हा माझा प्रवास वर्णन लेखनाचा प्रयत्न आपल्याला आवडल्यास आपला अभिप्राय मला जरुर कळवावा. आपल्या अभिप्रायाने मला लिहिण्याचा नवा उत्साह देईल.

नोकरीतून स्वेच्छानिवृत्ती घेतल्यानंतरच माझे महाराष्ट्रा बाहेर प्रवास करणे सुरु झाले. नोकरीत असताना रजेची अडचण असायची. याच्याहीपेक्षा मुख्य अडचण असायची ती दामाजीपंतांची. केंद्र सरकारमध्ये नोकरी करत असल्याने एल्. टी. सी. ची सवलत मिळत असे. परंतु त्यात मेख अशी होती, की सरळ एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणाकडे जाण्याकरीता कमीत कमी अंतराचे फक्त प्रवास भाडे मिळत असे. सहलीकरीता जायचे म्हणजे हे अडचणीचे होई. कारण प्रवास करताना थांबत थांबत मुक्काम करीत करीत जावे लागते. प्रत्येक ठिकाणी हॉटेल अथवा तत्सम ठिकाणी मुक्काम करणे, सकाळच्या चहा पासूनचे सर्व विकतचे पदार्थ घेणे याकरीताचा खर्च खूप होत असे. त्यामुळे कधी एल् टी सी ची सवलत घेतली नव्हती. सरकारी नोकरीत पगारही बेताचाच असतो त्यातच मुलांची शिक्षणे प्रापंचिक जबाबदाऱ्या यांना प्राधान्य द्यावे लागते.

सेवा निवृत्ती घेतल्यानंतर मुलांची शिक्षणे पूर्ण झाली होती. त्यामुळे जबाबदारी कमी झाली होती. आता या काळात सहलीचा विचार करणे शक्य होते. तरीही मी या सहलीला तयार नव्हतो. परंतु त्या वैष्णो देवीनेच तिच्या दर्शनाला बोलावल्यामुळे मी सहलीला जायला तयार झालो असेन. आम्ही ठरवलेली ही सहल कोणत्याही ट्रॅव्हेल एजन्सी मार्फत न करता नातेवाईकांचाच एक ग्रुप तयार करून आमची आम्ही आयोजित केली होती. त्यामुळे आमचे वेळापत्रक, प्रवासाचा मार्ग आमचा आम्हीच ठरवला होता. त्यात आयत्यावेळी बदल करण्याचे स्वातंत्र्य आम्हाला होते.

या प्रदिर्घ प्रवासाचे वर्णन मी लिहायचा प्रयत्न केला आहे.

या प्रवासात आम्ही जम्मु-काश्मिर, पंजाब, हिमाचल प्रदेश, हरीयाणा या राज्यांमधून मुक्काम केले आणि तिथले निसर्ग सौंदर्य अनुभवले. काश्मिरमध्ये असताना एकीकडे बर्फात वावरण्याचा आनंद, तर दुसरीकडे अतिरेक्यांच्या प्रभावाखाली असलेल्या भागात वावरत असल्यामुळे धास्ती अशा दुहेरी भावना होत्या. आमच्या सुदैवाने आम्हाला कोणत्याही वाईट अनुभवाला सामोरे जावे लागले नाही. श्रीनगरमधल्या लोकांच्या मनाचा मोठेपणाही अनुभवायला मिळाला.

प्रवास वर्णन म्हणजे टिपीकल इथुन आलो तिथुन गेलो असे न लिहीता भेट दिलेल्या स्थळांची जास्तीत जास्त माहिती मिळवून ती देण्याचा प्रयत्न केला आहे. आपण भेट देत असलेल्या स्थळांची माहिती असेल, त्याचे वैशिष्ट काय हे माहिती असले की, त्या स्थळाकडे पहाण्याचा दृष्टीकोन मिळतो. आमच्याकडे लोक जंजिरा किल्ल्यावर जातात आणि म्हणतात की, तिथे बघण्यासारखे काहीच नाही. वास्तविक तिथे जाण्यापूर्वी त्या किल्याचा इतिहास त्याचे जलदुर्ग म्हणून असलेले महत्व विचारात घेऊन किल्ला पाहिला की, हा किल्ला उभा करण्यामागे निर्मात्यांचे कष्ट आणि त्यांची दूरदृष्टी याचा प्रत्यय येतो. किल्यात असणारे गाईड चुकीचा इतिहास सांगतात आणि आपण आपला गैरसमज वाढवून परत येतो. असाच प्रकार श्रीनगर येथील प्रसिद्ध अवंतीस्वामी मंदिराचे बाबतित होतो. मंदिराचा खरा इतिहास समजतच नाही. गाईड त्यांना सोयीची माहिती सांगतात. असो मी काही त्यातला तज्ञ नाही परंतु मनात आले ते व्यक्त केले एवढेच.

श्रीवर्धन

दिनांक- ०६/०५/२०१९ अनिल अनंत वाकणकर.

दिवस पहिला

माताने बुलाया है।

माझा काश्मिर सहलीमधील सहभाग हा तसा अचानकच झाला. वास्तविक ही सहल पूर्व नियोजित होती. मी त्यात सहभागी होणार नाही हे माझ्या बाजुने अगदी पक्के होते. याचे मुख्य कारण आर्थिक तर होतेच, त्याच्याहीपेक्षा मला माझ्या शारिरीक क्षमतेची खात्री वाटत नव्हती. या सहलीची सुरवातच माता वैष्णोदेवी पासून होणार होती. माता वैष्णोदेवीला जाण्याकरीता १२ किलोमिटर चढण चढल्या शिवाय पर्याय नाही हे मला पक्के माहित होते. गेले २-३ वर्षे माझे गुडघे दुखत आहेत, त्यातच जामनगरच्या थंडीत माझ्या पायांना भेगा पडुन रक्त येईल अशी परिस्थिती निर्माण झाली होती. त्यामुळे काश्मिरची थंडी आणि वैष्णोदेवीची चढण आपल्याला झेपायची नाही ही माझी ठाम समजुत होती. चालण्याला पर्याय होता पालखीतून जाणे किंवा घोड्यावरून जाणे. दुसऱ्या माणसांच्या खांद्यावर जिवंतपणी बसून जाऊन देवदर्शन करणे हे मनाला पटत नाही. राहिला प्रश्न घोड्यावरून जाण्याचा, हा प्रकारही फार त्रासदायक असतो असे मला समजले होते. आणखी दोन पर्याय होते हेलिकॉप्टर किंवा बॅटरी कारने जाणे परंतु या पर्यायात जाऊन येऊन कमीत कमी ७-८ किलोमिटर चढण चढावी किंवा उतरावी लागणार होतीच.

म्हणून एकट्या सौ. वर्षाचेच बुकिंग केले होते. त्यातच ह्या सहलीचे कोणतेही नियोजन नव्हते. म्हणजे फक्त रेल्वेचे बुकींग केलेले होते. मुक्कामाकरीता अथवा पुढील प्रवासाकरीता बसचे बुकींग न करता आयत्यावेळी हॉटेल आणि प्रवासाकरीता वाहन ठरवायचे असे धोरण होते. जम्मु काश्मिर आणि पंजाबची सध्याची परीस्थिती पहाता मला ते रिस्की वाटत होते.

परंतु साधारण २०-२५ दिवस आधी आमच्या सहलीच्या टीम लिडर सौ. केतकी यांचा फोन आला की त्यांनी आणि त्यांचा मुलगा नचिकेत यांनी त्यांच्या फॅमिली फ्रेंड श्री राजेश यांच्या

मदतीने सहलीचे पूर्ण नियोजन केले आहे. सहलीचे तपशिलासह नियोजन करणे अतिशय मेहनतीचे आणि चिकाटीचे काम आहे. परंतु या सहलीचा माझा अनुभव असे सांगतो की, या तिघांनी या नियोजनाकरीता खूपच मेहेनत घेतली होती. कारण प्रत्येक ठिकाणाच्या हवामानाचा, भौगोलीक परिस्थितीचा, प्रत्येक ठिकाणामधील अंतराचा, प्रवासाला लागणाऱ्या वेळाचा तपशिलवार अभ्यास करून त्यांनी प्रवासाचे वेळापत्रक तयार केले होते. आणि काश्मिरच्या लहरी हवामानामुळे करावा लागणारा थोडाफार फरक वगळता आमची सहल नियोजीत कार्यक्रमानुमार पार पडली.

सहलीचे प्रस्थान स्थळ, जामनगर रेल्वे स्थानक

आता प्रश्न निर्माण होतो की माझा ठाम नकार होकारामध्ये कसा परिवर्तित झाला? याचे उत्तर माझ्या मते त्या वैष्णोदेवी मातेनेच मला तिच्या दर्शनाला बोलावून घेतले असावे. कारण सौ वर्षाला बडोद्याला सोडण्याकरीता जामनगर ते बडोदा रेल्वेचे बुकींग करण्याकरिता रेल्वेची

वेबसाईट उघडली आणि ध्यानी मनी नसताना बडोदा ते वैष्णोदेवी असे आमच्या दोघांचे बुकिंगच करून टाकले. ते तिकिट वेटिंगमध्ये होते त्यामुळे नंतर सौ वर्षाचे तिकीट रद्द करून टाकले.

तिकिट कन्फर्म झाले तर जायचे असे ठरवल्यानंतर जवळपास २० दिवसांच्या प्रवासाच्या दृष्टीने तयारी करणे जरुरी होते. सौ वर्षाची तयारी गेले जवळपास ४-५ महिने चालु होती. परंतु माझी काहीच तयारी नव्हती. संन्याशाच्या लग्नाला शेंडीपासून तयारी करावी लागते तशी माझी परिस्थिती होती. कारण आमचे असे ठरले होते की, प्रवासात कपडे धुणे शक्य होणार नाही त्यामुळे २० दिवस पुरतील इतका कपड्यांचा स्टॉक घेणे आवश्यक होते. आम्ही जेव्हा सोमनाथला गेलो होतो तेव्हा सोमनाथ देवस्थानच्या भक्तनिवासमध्ये कपडे धुण्यास सक्त मनाई होती. त्यामुळे हाच नियम सगळीकडे असणार हे उघडच होते.

जायचे की नाही जायचे या द्विधा मनस्थितीत असतानाच जाण्याच्या दृ्ष्टीने खरेदीला सुरवात झाली. सर्वप्रथम बर्फात आणि थंड वातावरणात वावरण्याच्या दृष्टीने बुटांची खरेदी झाली, कपड्यांचे जास्तीचे सेट घेऊन झाले. मोबाईलकरीता पॉवर बँकची ऑनलाईन खरेदी केली. दरम्यान जामनगर ते बडोदा दोघांची रेल्वे तिकीटे काढून झाली. ही तिकीटे मात्र कन्फर्म मिळाली. नंतर रोज दिवसातून कमीतकमी दोनदा तरी वैष्णोदेवीच्या तिकीटांची ताजी पोझिशन चेक करणे सुरु झाले. बुकिंग करताना वेटींगमध्ये २८वा नंबर होता. शेवटच्या दिवशी तो १८ वर आला. त्यामुळे मग अखेरचा उपाय म्हणून तात्काळ मधे बुकींग करायचे ठरले. त्याकरिता केदारने ड्युटी बदलुन घेतली.

दिनांक १३ मार्च २०१६ ची सकाळ उजाडली, उद्या दिनांक १४ मार्च ला सोमवारी दुपारी एक वाजता “स्वराज एक्सप्रेस” बडोद्याला येणार होती. त्या गाडीची वेळ साधण्याकरीता आम्हाला जामनगरहुन दिनांक १३ मार्चला रात्री १२ वाजता ट्रेन पकडायची होती. आज ११ वाजता तात्काळचे बुकींग करायचे होते. त्या करिता केदार आणि मी १०.३० पासून अगदी तयारीत बसलो होतो. हाताशी सर्व माहिती तयार होती फक्त कॉपी पेस्ट करायचे होते. परंतु

दुर्दैवाची गोष्ट अशी की, बँकेचा व्यवहार पूर्ण होईर्यंत ४० सेकंदात सर्व सिट बुक झाल्या. खात्यातून पैसे वजा होऊनदेखिल तिकीट मिळाले नाही. त्यामुळे परत प्रश्न उत्पन्न झाला आता काय करायचे. (या विषयात हल्लीच मला एक माहिती मिळाली ती म्हणजे तात्काळ बुकींग करण्याकरीता ‘Tatkal now” नावाचे एक सॉफ्टवेअर उपलब्ध आहे. त्यामध्ये बुकींगचा पूर्ण फॉर्म आधीच भरून आयत्यावेळी काही सेकंदात बुकिंगची प्रोसिजर पूर्ण होते.)

शेवटी त्या वैष्णोदेवीने बुद्धी दिली की, काही नाही तू तुझे सामान घेऊन बडोद्याला चल. तिच्या इच्छेप्रमाणे आम्ही दोघांनी जामनगर सोडले. दरम्यान बडोद्याच्या प्रवासातदेखिल तिकीट कन्फर्म झाले का ते चेक करत होतो परंतु वेटींग लिस्टचा नंबर १६ वर आला होता, पण तिकीट कन्फर्म होत नव्हते अगदी RAC गेले असते तरी गाडीत चढता आले असते. बडोद्याला उतरल्यावर १० वाजले तरी तिकीट कन्फर्म झाल्याचा किंवा रद्द झाल्याचा मेसेज येईना. शेवटी १०.१० ला जेव्हा पोझिशन चेक केली तेव्हा समजले की तिकीट कन्फर्म झाले आहे. मी माता वैष्णोदेवीच्या अधिकृत वेबसाईटवर वाचले होते की, लोकांची अशी ठाम श्रद्धा आहे की, तुमच्या मनात काहीही असो, मातेची इच्छा असेल तर तिचा भक्त तिच्यापर्यंत पोचतोच. (Hindus believe that one cannot possibly have Darshan of Mata, unless she herself calls the devotees.) अखेर मातेचा बुलावा आला म्हणूनच हो नाही करता करता दुपारी एक वाजता स्वराज एक्सप्रेसमध्ये दाखल झालो.

।। जय मातादी! जय मातादी! जय मातादी! ।।

दिवस दुसरा

बडोदा ते कटरा (माता वैष्णोदेवी)

दिनांक १४ मार्च २०१६ मातेच्या इच्छेनुसार आज सकाळी बांद्र्याहुन सुटलेल्या आणि दुपारी एकच्या सुमारास बडोद्यात दाखल झालेल्या “स्वराज एक्सप्रेस”मध्ये सौ वर्षासह दाखल झालो. गाडीमध्ये आमच्या स्वागताकरीता आमच्या या सहलीमधले सहप्रवासी १) श्री सुरेश व सौ केतकी, २) श्री नंदकुमार व सौ संध्या, ३) श्री नारायण उर्फ नाना व सौ नंदिनी (माधुरी) आणि ४) श्री विकास व सौ विप्रा उपस्थित होते.

सहलीचे वाहन, स्वराज एक्सप्रेस

बडोदा सोडल्यावर लगेचच गोध्रा स्टेशन आले. या रेल्वे स्टेशनवरच कारसेवकांच्या डब्याला आग लावली गेली होती किंवा लागली होती. त्याची सहजच आठवण झाली.

गाडीमध्ये मला मिळालेला स्लिपर पांच बोगी पुढे होता. परंतु मी केवळ रात्री झोपण्यापुरताच त्या बोगीमध्ये गेलो होतो. आमच्या बोगीमध्ये जवळपास सर्वच महाराष्ट्रीयन लोक होते. त्यापैकी एक कुटूंब दरवर्षी वैष्णोदेवीला जाणारे होते. त्यांचेदेखिल असेच म्हणणे होते की आई वैष्णोदेवीने बोलावल्या वाचून कोणिही तिला भेटायला जाऊ शकत नाही. चर्चा करता करता अनेक राज्य पार होत होती. आमची गाडी अनेक राज्यामधून जाणार होती. ती अशी १)

महाराष्ट्र, २) गुजरात, ३) राजस्थान, ४) मध्य प्रदेश, ५) दिल्ली, ६) हरीयाणा, ७) हिमाचल प्रदेश, ८) पंजाब, ९) जम्मु आणि काश्मिर.

आमचा ग्रुप पूर्ण तयारीने आलेला होता. आमच्या बरोबर तयार नाश्ता तर होताच परंतु आयत्यावेळी झटपट तयार करता येईल असे नाश्त्याचे साहित्यदेखिल हजर होते. त्याशिवाय गरमागरम चहा कॉफी तयार करण्याची सामुग्रीदेखिल होती. आम्ही गाडीमध्ये स्थिरस्थावर होताच सर्वप्रथम जेवणाचा कार्यक्रम झाला. लवकरची गाडी असल्यामुळे सगळेचजणच पहाटे लवकर उठले होते त्यामुळे पोटात भर पडताच प्रत्येकजण डुलक्या घ्यायला लागला.

संध्याकाळी पांच साडेपांचच्या सुमारास सगळे जरा ताजे तवाने झाल्यावर चहा कॉफीचा कार्यक्रम झाला. आता रतलाम स्टेशन आले होते. स्टेशनवरील लोकांच्या बोलीभाषेतिल फरक जाणवायला लागला होता. मग मात्र पत्त्यांचा कॅट बाहेर पडला. मेंडिकोट, बदाम सातचा डाव सुरु झाला.

गाडीने गुजराथ सोडल्यानंतर राजस्थानी भाग सुरु झाला होता. सगळीकडे रखरखाट होता, मैलोन मैल हिरवळीचे नांव नव्हते. नद्यांवर पुल होते पण नदीच्या पात्रात पाण्याचा पत्ताच नव्हता. तरीही अशा भीषण वाळवंटात लोक आपल्या शेतात काम करीत होते. एवढ्या कडक उन्हात बाजुलाच रेल्वेचा ट्रॅक वाढवायचे काम चालु होते अनेक लोकं तिथे काम करत होती. खरोखरच या सर्व विश्वकर्म्याच्या वंशजाना दिलसे सलाम.

बघता बघता दिवस मावळला काळोख झाला. गाडीतले फेरीवाले फिरायचे कमी झाले. गाडीतल्या पँट्रीमधून जेवणाच्या ऑर्डर पोचवण्याचे काम सुरु झाले. आता कोटा जंक्शन आले होते. आम्हीही यथावकाश बरोबर आणलेल्या जेवणाचा समाचार घेतला. थोडावेळ पत्ते खेळून मग मी माझ्या बोगीत जाऊन झोपलो. इकडे नानांनी रात्रीचा पहारा मी करणार असे सांगितले म्हणून बाकीचेदेखिल थोडावेळ जागे तर थोडी झोप अशी झोप घेत राहिले. दरम्यान रात्री काही लोक दादागिरी करीत होते त्यांना हुसकवून लावल्याचे नानांनी सकाळी सांगितले. थोड्या वेळाने असे समजले की काही हत्यारी लोकांना रात्री दोनच्या सुमारास नवी दिल्लीच्या अगोदर रेल्वे पोलिसांनी याच गाडीतून पकडले होते. क्षणभर मनात आले आपल्या पाठिशी माता होती म्हणून ही घटना दोन बोगी पुढे घडली. रात्री झोपेतच मथुरा, सवाई माधोपुर, दिल्ली ही सर्व महत्वाची स्टेशन गेली होती.

आज दिनांक १५ मार्च दिवसचा नविन प्रांत समोर घेऊन आला होता. आता पंजाब राज्य सुरु झाले होते. मोबाईल वरील मेसेज मुळे नविन राज्य सुरु झाल्याचे कळत होते. पंजाब हा प्रांत तसा संपन्न, आसपास गव्हाची, उसाची शेती दिसायला सुरवात झाली. डोळयांना सुखद हिरवळ दिसायला लागली होती. बराचसा गहू कापायला तयार झालेला दिसत होता. मधून मधून उसाने भरलेले ट्रॅक्टर दिसायला लागले होते. दुकानांच्या पाट्या मात्र पंजाबीत होत्या त्यामुळे आपण निरक्षर असल्या सारखे वाटायला लागले होते.

अनेक स्टेशन्स पास होत होती. बऱ्याच शहरांची नांवे ओळखीची होती. गाडीत अनेक प्रकारचे फेरीवाले येत होते. कोणी बॅगांची चेन रीपेर करणारे, तर कोणी बॅगांना बांधायच्या

साखळ्या विकणारे. खाद्य पदार्थ, चहा, कॉफी विकणारे तर होतेच. पानिपतनंतर लुधियाना आले त्यानंतर मात्र विशेष महिला विक्रेत्या मोठ्या प्रमाणात गाडीत दिसु लागल्या. अनेक प्रकारचे कपडे, विशेषत: जम्मु काश्मिरमध्ये आवश्यक असणारे स्वेटर, कान टोप्या, मफलर, शाली, हातमोजे, पायमोजे विकणाऱ्यांचे प्रमाण जास्त होते.

आमच्या ग्रुपमधल्या लोकांनी फारशी खरेदी केली नाही, कारण आम्हाला अजुन १३-१४ दिवस प्रवास करायचा होता. आणि हे जास्तीचे ओझे आम्हाला परवडणारे नव्हते. आमच्याकडे आधीच प्रत्येकी साधारण दोन दोन बँगा होत्या. शिवाय खाण्या पिण्याच्या पदार्थांची ओझी होती ती वेगळीच.

बघता बघता दिवस उताराला लागला. साधारण तिन साडेतिनच्या सुमारास कठुआ स्टेशन आले. आता आमच्या गाडीने जम्मु काश्मिरची बॉर्डर पार केली होती. बॉर्डर क्रॉस करताच आम्हा सर्वांच्याच प्रीपेड मोबाईलची नेटवर्क बंद झाली. मी नेटवर वाचले होते त्याप्रमाणे आमच्या गाडीमधून काश्मिर मधला पहिला टोलनाका दिसु लागताच सर्वांची प्रीपेड सिम बंद पडली. आमच्या ग्रुपमध्ये आता माझ्याकडे एक आणि सुरेशराव यांच्या कडे दोन असे तिन पोस्टपेड मोबाईल चालू होते.

जम्मु काश्मिरमध्ये प्रवेश करताच सिमा सुरक्षा दलाच्या हत्यारबंद जवानांचा वाढलेला वावर जाणवू लागला. आपण आता एका वेगळ्या वातावरणांत आलो आहोत हे प्रकर्षाने जाणवायला लागले. आता कोठेही काहीही होऊ शकते या शंकेने मन थोडे अस्वस्थ झाले. पूर्वी वैष्णोदेवीला जाण्याकरीता जम्मु पर्यंत रेल्वेने आणि नंतर रस्त्याने जावे लागायचे. परंतु आता रेल्वे थेट कत्रा पर्यंत जाते. आमच्या बोगीतील काही लोकांना हे माहिती नसल्याने त्यांनी जम्मु पर्यंतच तिकीटे काढली होती. त्यामुळे ते जम्मुलाच उतरले.

सुमारे अर्धातास जम्मुला थांबून आमची गाडी कत्र्याच्या दिशेने निघाली. जम्मु ते कत्रा ही रेल्वे लाईन उभारणे मोठे आव्हानात्मक काम होते. खडतर निसर्ग तर होताच, पण अतिरेकी

हमला कधीही होईल ही भिती रेल्वे उभारताना कायम होतीच. आपल्याला कोंकण रेल्वेचे काम बघुन निसर्गाच्या आव्हानाची कल्पना आहेच. परंतु कोंकणामधील कातळ पक्के तरी होते. इकडे कातळ किंवा खडक दिसतच नाही. रेल्वे लाईनच्या बाजुच्या दरडी वरून लक्षांत येते की, ही दरड म्हणजे अतिशय भुसभुशीत माती आणि छोटे छोटे गोटे यांचे हे मिश्रण आहे. यामधून मोठमोठाले बोगदे, उंचच उंच पुल बांधून ही रेल्वे लाईन बांधलेली आहे. खरोखरच अशी सर्व आव्हाने पेलुन ही रेल्वे लाईन उभारणाऱ्या त्या सर्व निर्मात्यांचे आम्ही शतश: ऋणी आहोत.

जम्मु आणि वैष्णोदेवी मार्गावर उधमपुर येथे गाडी थोड्यावेळ थांवली होती. अशा प्रकारे बडोद्यापासून सतराशे किलोमिटरचा प्रवास करून संध्याकाळी सुमारे सात वाजता त्या माता वैष्णोदेवीच्या पुण्यभूमीत कत्र्यामध्ये आमची गाडी पोचली आणि आम्ही त्या पवित्र भूमीला वंदन करण्याकरीता गाडीतून खाली उतरलो.

।। जय मातादी! जय मातादी! जय मातादी! ।।

दिवस तिसरा

माता वैष्णोदेवी दर्शन

दिनांक १५ मार्च २०१६ला संध्याकाळी वैष्णोदेवी रेल्वे स्टेशनवर सर्व सामानासह उतरल्यावर समोर सामानाचा मोठा ढिग दिसत होता. हे सर्व बोजे घेऊन मुक्कामाचे हॉटेल गाठायचे होते. रत्नागिरीला ज्याप्रमाणे रेल्वे प्लॅटफॉर्म खाली तळात आणि स्टेशनमधून बाहेर पडण्याचा मार्ग जवळपास तिन मजले वर अशी येथेही स्थिती होती. त्यामुळे आधी जिने चढण्याऐवजी बॅगा चाकांवर ओढत नेता येतिल असा मार्ग शोधून काढला. वर चढून आल्यावर लक्षात आले की रेल्वे स्टेशन खूपच छान आणि तेथिल निसर्ग सौदर्याला पुरक होईल अशा पद्धतीने बांधण्यात आले आहे. स्टेशनच्या आवारातच रेल्वेचे गेस्ट हाऊस आणि मातेच्या दर्शनाला जाण्यासाठी अतिशय आवश्यक असणारी यात्रा पर्ची मिळण्यासाठी काऊंटर होता.

सर्व सामानासह स्टेशनच्या बाहेर पडल्यावर आधी सर्व सामान समोर ठेवून फोटो सेशन झाले. तिथे असणाऱ्या एका प्रवाशाला विनंती करून त्याला आमच्या सर्वांचा ग्रुप फोटो काढायला सांगितला. दरम्यान रेल्वेने कटरा गाठण्यापूर्वीच मुक्कामाच्या हॉटेलशी संपर्क करून झाला होता आणि त्या हॉटेलच्या मॅनेजरने हॉटेल स्टेशन पासून जवळच आहे असे सांगितले होते. मग एवढ्या सामानासह दहा माणसे घेऊन जाणारे वाहन शोधणे सुरु झाले. तिथल्या रिक्षा आणि गाडीवाल्यांनी आम्हाला अक्षरश: गराडाच घातला. सगळेचजण अव्वाच्या सव्वा भाडे सांगु लागले. शेवटी आमच्या मुंबईकरांनी बारगेनिंग करून दोनशे रुपयाला एक वाहन ठरवले. त्या गाडीत सर्व सामानासह आम्ही स्वत:ला कोंबून घेतले.

आम्ही बुक केलेले हॉटेल होते “नॅशनल गेस्ट हाऊस.” आमच्या गाडीवाल्याने आम्हाला नॅशनल गेस्ट हाऊसच्या गेटमधून आत नेले. परंतु त्या एकाच गेटच्या आत दुसरे एक गेस्ट हाऊसदेखिल होते, याची कल्पना आम्हाला नव्हती. याचा फायदा घेत गाडीवाल्याने बदमाशीचा नमुना दाखवत, आम्हाला दुसऱ्याच गेस्ट हाऊसच्या ऑफीसात नेले. शेवटी गडबड घोटाळा लक्षांत आल्यावर आम्ही आधी बुक केलेल्या हॉटेलात पोचलो. पहिल्याच फटक्यात काश्मिरमधील कमिशन एजंटाच्या कारागिरीचा नमुना बघायला मिळाला, सुदैवाने या व्यवहारात कोणतेही नुकसान झाले नाही. पण यामुळे पुढील सर्व प्रवासात सर्वजण सावध झालेले होते.

दोन दिवसांच्या सलग प्रवासाने सगळेचजण थकले होते. सर्वजण प्रथम गरम गरम चहा कॉफी घेऊन आणि नंतर गरम पाण्याच्या सहाय्याने फ्रेश झाले. मी तर पूर्ण आंघोळच केली. सुमारे तासभर आराम करून सर्वजण पोटपूजेच्यासाठी बाहेर पडलो. हॉटेलच्या काऊंटरवर चौकशी केली असता असे समजले की, पहाटे लवकर जर दर्शनाला जायचे असेल तर आत्ता तावडतोब यात्रापर्ची घ्यावी लागेल. कारण यात्रापर्चीचा काऊंटर रात्री दहा वाजता बंद झाला की सकाळी आठ वाजल्या शिवाय उघडत नाही. आता तर सव्वा नऊ वाजुन गेले होते.

आमच्या पैकी काही जणांना असे समजले होते की, यात्रा पर्ची बनवण्याकरीता ओळखपत्राची झेरॉक्स लागते. परंतु मी नेटवर वाचले होते की फक्त ओळखपत्र जवळ ठेवावे लागते. त्यामुळे आमच्यापैकी काही जणांकडे झेरॉक्स होती तर काही जणांकडे नव्हती. हॉटेलच्या काऊंटरवर सांगितले की झेरॉक्स लागत नाही. शेवटी ज्यांच्याकडे झेरॉक्स होती ते झेरॉक्ससह आणि नव्हती ते तसेच यात्रा पर्ची काऊंटरला पोचलो. तेथे फक्त प्रत्येकाचा फोटो काढला आणि नाव विचारले ओळखपत्र विचारलेदेखिल नाही. अक्षरश: पाच मिनिटात आम्ही तेथुन बाहेर पडलो.

यात्रा पर्चीवर सुचना होत्या त्यात १२ किलोमिटर चढण चढण्याचा उल्लेख होतो ते वाचून आपण काही एवढी चढण चढु शकणार नाही हे मनांत आले. मग हेलिकॉप्टरची तिकीटे आयत्यावेळी मिळू शकतात काय याची चौकशी केली असता, हेलीकॉप्टरचा काऊंटर सकाळी आठनंतर उघडेल असे समजले. दुसरा पर्याय होता बॅटरी वर चालणाऱ्या छोट्या गाड्या. त्या बॅटरी कार पर्यंत जायला सुद्धा ३-४ किलोमिटर चढण चढायची होती. आमच्यापैकी काहीजण चालत जायचे ठरवत होते, तर काही जण बॅटरी कारने जायचे या मताचे होते. काहीही झाले तरी ३-४ किलोमिटर चालायला लागणार हे नक्की होते. तेव्हा पहाटे साडेतिन वाजता चालायला सुरवात करायची हे नक्की करून आम्ही पोटपूजेकरीता योग्य ठिकाण शोधु लागलो. माझा पुतण्या मंदार दोन वेळा इकडे येऊन गेलेला

होता. त्याने सांगुन ठेवले होते की जर शुद्ध शाकाहारी जेवायचे असेल तर वैष्णो धाबा किंवा हॉटेलातच जा. त्याप्रमाणे समोरच एक वैष्णो हॉटेल दिसले त्यामध्ये जाऊन जेवण केले.

माणसाचा स्वभाव चौकस असला की त्याचा फायदा होतो याचा प्रत्यय या ठिकाणी आला. आमच्या पैकी विकास दांपत्य पी सी ओमध्ये फोन करायला गेले असता तिथे चौकशी केली तेव्हा त्यांना समजले की, टुरिस्ट लोकांकरीता येथे १५ दिवसाकरीता प्री अँक्टीव्हेटेड प्रीपेड सिम कार्ड मिळतात. त्यांनी लगेचच २०० रुपये भरून एक सिम खरेदी केले. त्या दोनशे रुपयात त्यांना ५० रुपये टॉक टाईमही मिळाला.

पहाटे तिन वाजताचा गजर लाऊन सगळेजण अकरा वाजता झोपले. पहाटे बरोबर ३.४५ वाजता तयार होऊन सर्वजण हॉटेलच्या खाली आलो. चहा कॉफी घेऊन रीक्षाने बाणगंगा गेटपर्यंत आलो. माता वैष्णोदेवीच्या नामाचा गजर करीत पदयात्रेला सुरवात केली. गेटवरती सिमा सुरक्षा दलाचा सुरक्षा तपासणी कक्ष होता. तेथे पुरुष व स्त्रिया यांच्या वेगळया रांगा होत्या. तिथे प्रत्येकाचे ओळखपत्र तपासले जात होते. त्याचप्रमाणे शारिरीक झडतीही घेतली जात होती.

आता प्रत्यक्ष वाटचालीला सुरुवात झाली होती. आमच्या ग्रुपमधले सर्वजण आता विखुरले गेले होते. प्रत्येकजण आपल्या स्वत:च्या गतीने चालत होता. रस्ता मात्र चांगला होता. आपल्याकडे कोकणात पाखाडी बांधलेली असते तसा रस्ता शेवटपर्यंत होता. त्याच रस्त्याने

घोडेही जात होते. खेचरे पाठीवर सामानाची ओझी घेऊन चढण चढत होती. चालताना आमचा चौघांचा एक ग्रुप तयार झाला होता, त्यात मी, सौ वर्षा, केतकी आणि संध्या होतो. आम्ही दर १० मिनिटांनी विश्रांती घेत होतो. एवढ्या पहाटेदेखिल रहदारी खूपच होती.

रस्ता मात्र प्लेन होता कुठेही खाच खळगे नव्हते. आणि मुख्य म्हणजे घोड्यांच्या शेणाने अगदी सारवलेल्या सारखा दिसत होता. मजल दरमजल करीत अखेर आम्ही सात वाजता बॅटरी कारच्या स्टॉप पर्यंत आलो. आमच्या व्यतिरीक्त आमच्या ग्रुपमधील कोणीही तिथे दिसत नव्हते. चौकशी केली असता असे समजले की, बॅटरी कार नऊ वाजल्या शिवाय चालु होणार नाही. आतापर्यंत चार किलोमिटर चालुन झाले होते. अजुन आठ किलोमिटरचा मोठा टप्पा बाकी होता.

दोन तास तिथे बसून वाट बघत बसायचे की, पुढे चालायला सुरवात करायची याचा विचार चालु होता. दरम्यान घोडेवाले पाठिशी लागलेलेच होते. परंतु मला आणि वर्षाला घोडेस्वारीचा अजिबात अनुभव नव्हता. शेवटी वाट बघत बसण्यापेक्षा आणि आठ किलोमिटर चालण्यापेक्षा घोडेस्वारीचा अनुभव घ्यायचा असा निर्णय घेतला. मग सुरु झाले घोडेवाल्यांशी

बारगेनिंग, आमच्या मुंबईवाल्या बारगेनिंग एक्सपर्ट होत्याच. शेवटी ३५० रुपयांमध्ये तोड होऊन घोडेस्वारी सुरु झाली.

खरोखरच घोडेस्वारी हा एक वेगळाच अनुभव होता. पहिल्यांदा भिती वाटली, पण नंतर मात्र त्यातही एक थ्रिल आहे असे जाणवायला लागले. वाटेत निरनिराळ्या प्रकारचे वृक्ष दिसत होते. त्यामध्ये जास्त “चिड” या जातिचे वृक्ष होते. साधारण तिन चार किलोमिटर गेल्यावर घोड्यांना चारा पाणी दिले गेले. आम्ही आणि घोडेवाल्यांनीही चहापाणी घेतले. या परिक्रमा रस्त्याच्या जास्तीत जास्त भागावर शेड केलेल्या दिसत होत्या. आणि जिथे नव्हत्या तेथे शेड बनविण्यचे काम चालु होते. वाटेत परत एकदा सिमा सुरक्षा दलाचे सुरक्षा तपासणी केंद्र लागले. तेथे घोडेवाल्यांची सुद्धा तपासणी केली गेली.

अखेर साडे नऊच्या दरम्यान आम्ही मातेच्या मंदिर परिसरात पोचलो. घोडेवाल्याने दाखविलेल्या एका प्रसाद भांडारात आमचे सामान जमा केले. प्रसादाची खरेदी केली आणि काही क्षणातच आम्हाला आमच्या बाकी ग्रुप मेंबरची पण भेट झाली. मग सगळेजण दर्शनाच्या रांगेत उभे राहीलो. रांग खूप मोठी होती, तरी त्या रांगेला गती होती. देवीच्या गुंफेत पोहोचे पर्यंत

अजुन दोन ठिकाणी सुरक्षा तपासणी झाली. दर्शन रांगेत असताना अचानक एक हनुमानाचा वंशज पुढे आला आणि त्याने वर्षाच्या हातामधील प्रसादाची पुडी आपल्या ताब्यात घेतली. आम्ही नेलेला प्रसाद मातेने हनुमंताच्या मार्फत स्विकारला.

मातेच्या बोलावण्यानुसार आम्ही उभयतांनी गुंफेमधील मातेच्या महाकाली, महासरस्वती आणि महालक्ष्मी स्वरुपातिल सगुण रुपाचे मस्तक टेकवून दर्शन घेतले. दरम्यान रांगेत दाखल झाल्यापासून कधी मनातल्या मनांत तर शक्य असेल तेथे मोठ्या आवाजात “ॐ ऐं –हीं क्लीं चामुंडाय विच्चे” या मंत्राचा जप चालुच होता. प्रत्यक्ष दर्शन घेताना डोळे बंद करून देवीच्या तिनही रुपाचे पुढे दिलेले ध्यान मंत्र म्हटले.

“खड्गं चक्र गदेषु चाप परिघान् छूलं भुशुंडीं शिरः।
शंखं संदधतीं करैस्त्रिनयनां सर्वांग भूषावृतिम्।।
नीलाश्म द्युतिमास्य पाददशकां सेवे “महाकालिकाम्”।
यामस्तौत् स्वपिते हरौ कमलजो हंतुं मधुं कैटभम्।।१।।
अक्षस्त्रक् परशू गदेषु कुलिशं पद्मं धनुः कुंडिकां।

दण्डं शक्तिमसिं च चर्म जलजं घंटां सुराभाजनम्।।
शूलं पाश सुदर्शनेच दधतीं हस्तैः प्रवालप्रभाम्।
सेवे सैरिभ मर्दिनी मिह "महालक्ष्मीं" सरोजस्थितिम्।।२।।
घंटाशूल हलानि शंख मुसले चक्रं धनुः सायकम्।
हस्ताब्जैर्दधतीं धनांत विलसच्छीतांशु तुल्यप्रभाम्।
गौरीदेह समुद्भवां त्रिजगतां आधारभूतां महा
पूर्वामत्र "सरस्वती" मनुभजे शुंभादि दैत्यार्दिनीम्।।३।।"

अशा तऱ्हेने मी नाही नाही म्हणत असताना माता वैष्णोदेवीने मला तिच्या चरणाजवळ आणले आणि आपले दर्शन दिले. दरम्यान मी मातेच्या या तिर्थक्षेत्राची शक्य तेवढी माहिती मिळवली ती अशी.

भारतामधील जम्मु काश्मिर राज्यातिल वैष्णोदेवी डोंगरावरील वैष्णोदेवीचे मंदिर हे हिंदूंचे अतिशय पवित्र मंदिर आहे. हे मंदिर शक्तीच्या उपासकांचे अतिशय आवडते स्थान आहे. या देवीला माताराणी, वैष्णवी या नावानेदेखिल ओळखले जाते. हे देऊळ कटरा या शहरापासून बारा किलोमिटर अंतरावर आहे. या मंदिराची समुद्रसपाटीपासूनची उंची २५०० फुट आहे. भारतातिल तिरुपती मंदिरा खालोखाल या मंदिरात मोठ्या संख्येने भक्त दर्शन घेण्यासाठी येतात. या मंदिराची देखरेख आणि भक्तांची व्यवस्था "माता वैष्णोदेवी तिर्थक्षेत्र ट्रस्ट" द्वारे केली जाते.

माता वैष्णोदेवी सर्व भक्तांच्या इच्छा आकांक्षा पूर्ण करते. मातेचे निमंत्रण आल्यावर तिचा भक्त कोणत्या ना कोणत्या कारणाने तिच्या दरबारात हजर होऊन तिचे दर्शन घेतोच. माता वैष्णोदेवी हे हिंदूंच्या प्रमुख देवस्थानांपैकी एक असल्यामुळे तिचे दर्शन घेण्याकरीता खूप लांबून भक्त तिच्या दर्शनाकरीता येत असतात.

हिंदू महाकाव्यातिल संदर्भानुसार माता वैष्णोदेवीचा जन्म दक्षिण भारतातिल रत्नाकर सागर यांच्या घरी झाला. तिचे माता पिता अनेक वर्षे अपत्यहिन होते. या दैवी बालिकेने (माता

वैष्णोदेवीने) जन्माला येण्याअगोदर रत्नाकर कडुन वचन घेतले होते की ते तिच्या इच्छेच्या आड कधिच येणार नाहीत. वैष्णोदेवीला बालपणी “त्रिकुटा” या नावाने ओळखले जात होते. काही काळाने तिला तिने भगवान विष्णूंच्या कुळात जन्म घेतला म्हणून वैष्णवी म्हणून संबोधले जात असे.

नऊ वर्षाची झाल्यावर त्रिकुटाने आपल्या वडिलांजवळ समुद्र किनारी तपश्चर्या करण्याची अनुमती मागितली. या तपश्चर्येमध्ये तिने भगवान विष्णूंचे अवतार “श्रीरामांची” उपासना केली. सीतेचा शोध घेत असताना प्रभु श्रीरामांची त्यांच्याच ध्यानात मग्न असणाऱ्या त्रिकुटेची भेट झाली. तेव्हा तिने प्रभुंना त्यांची पति म्हणून स्विकार केल्याचे सांगितले. त्यावेळी प्रभुंनी तिला या जन्मी एकपत्नीव्रती असल्याने तिच्याशी विवाह शक्य नसल्याचे सांगितले. मात्र कलियुगात ते जेव्हा कल्कीच्या रुपात अवतार घेतिल तेव्हा तिच्याशी विवाह करीन असे आश्वासन दिले.

दरम्यान प्रभु श्रीरामांनी त्रिकुटाला उत्तरभारतातिल माणिक पहाडीमधील त्रिकुटा डोंगर रांगांमधील गुंफेमध्ये ध्यानस्थ अवस्थेत रहायला सांगितले. रावणाविरुद्धच्या युद्धात प्रभु श्रीरामांना यश प्राप्त व्हावे म्हणून मातेने त्रिकुटापर्वतावर नवरात्र साजरे केले होते. म्हणून नवरात्रीच्या नऊ दिवसांमध्ये येथे रामायणाचे पारायण करण्याची परंपरा आहे. प्रभु श्रीरामांनी त्रिकुटाला वचन दिले होते की समस्त विश्वामध्ये ती वैष्णोदेवी या नावाने ओळखली जाईल.

माता वैष्णोदेवी संबंधात अनेक कथा प्रचलीत आहेत. त्यातिल एक कथा श्रीधरची आहे. श्रीधरचे आई वडील माता वैष्णोदेवीची परमभक्त होते. ते सध्याच्या कटरा गावापासून २ किलोमिटर अंतरावरील हंसली गावात रहात होते. एकदा मातेने त्यांना एका तरुण मुलीच्या स्वरुपात दर्शन दिले आणि त्यांना भंडाऱ्याचे आयोजन करायला सांगितले. मातेच्या आदेशानुसार त्यांनी जवळपासच्या सर्व लोकांना बोलावणे केले, त्यातच तेथिल स्वार्थी व राक्षसीवृत्तीच्या भैरवनाथालाही आमंत्रण केले. तेव्हा भैरवनाथाने त्याला त्याच्या आर्थिक परिस्थितीची कल्पना

दिली आणि जर तो सर्व लोकांना प्रसाद पुरवु शकला नाही तर त्याचे काय परिणाम होतील याची जाणिव करून दिली. परंतु मातेने त्यांचा भंडारा यथासांग संपन्न केला.

श्रीधर हादेखिल वैष्णोदेवी मातेचा परम भक्त होता. त्याच्या परम भक्तीने प्रसन्न होऊन मातेने त्याची लाज राखली आणि आपल्या अस्तित्वाचे प्रमाण दाखवले. एकदा श्रीधरने गावातील लोकांकरीता देवीचा महाप्रसाद म्हणून भंडाऱ्याचे आयोजन केले होते. त्या भंडाऱ्याला त्याने सर्व गावक-यांना आणि साधु संतांना आमंत्रण केले होते. दरीद्री श्रीधर सर्व गावाला भंडाऱ्याला बोलावतोय यावर सुरवातिला गावक-यांचा विश्वासच बसला नाही. या भंडाऱ्याला श्रीधरने भैरनाथ आणि त्याचे सर्व शिष्य यांनाही बोलावले होते. भैरवनाथाने जेव्हा प्रसाद म्हणून खिर पुरी ऐवजी मद्य आणि मांस पाहिजे असे सांगितले तेव्हा श्रीधरने ते शक्य नाही असे सांगितले.

आपल्या परमभक्ताची लाज राखण्याकरीता स्वत: माता वैष्णोदेवी कुमारिकेचे रुप घेऊन भंडाऱ्यामध्ये हजर होती. प्रसादाच्या बाबतित हट्ट करणाऱ्या भैरवनाथाला समजावण्याचे तिने खूप प्रयत्न केले. परंतु तिचे त्याने काही ऐकले नाही उलट तिला पकडण्याचा प्रयत्न केला. तेव्हा मातेने त्याला गुंगारा देऊन ती त्रिकुट पर्वतावरील गुंफेमध्ये नऊ महिने तपस्या करायला बसली. तप करायला जाताना तिने हनुमानाला बोलावले आणि त्याला भैरवनाथाला तिचे तप पूर्ण होईपर्यंत गुंगवून ठेवायला सांगितले. त्याप्रमाणे हनुमंतांनी नऊ महिने मातेचे रक्षण केले आणि भैरवनाथाला तिथेच गुंतवून ठेवले. त्याच गुंफेला सध्या अर्धक्वाँरी या नावाने ओळखले जाते. अर्धक्वाँरीच्या जवळच मातेच्या पादुका आहेत. त्या ठिकाणी भैरवनाथाला चकवताना मातेने मागे वळून पाहिले होते. त्यावेळी हनुमंत माते सोबतच होते, तेव्हा हनुमंताना तहान लागली होती म्हणून मातेने एक बाण मारून जमिनीतून पाण्याचा झरा उत्पन्न केला होता. त्या पाण्यामध्ये मातेने आपले केस धुतले होते. ती पवित्र जागा आज बाणगंगा म्हणून ओळखली जाते.

बाणगंगेच्या पवित्र जलामध्ये स्नान केल्याने भक्तांच्या सर्व व्याधी दूर होतात. त्रिकुट पर्वतावर मातेने भैरवनाथाचा संहार केला. त्यानंतर त्याने क्षमा याचना केल्यावर त्याला

आपल्यापेक्षा उंच जागेवर स्थान दिले. त्याला असाही वर दिला की, माझे दर्शन घेतल्यानंतर तुझे दर्शन घेतल्याशिवाय माझ्या भक्ताची यात्रा पूर्ण होणार नाही.

ज्या जागेवर माता वैष्णोदेवीने हट्टी भैरवनाथाचा वध केला ती जागा 'भवन' म्हणून प्रसिद्ध आहे. या ठिकाणी उजव्या बाजुला काली माता, डाव्या बाजुला सरस्वती आणि मध्ये माता लक्ष्मी स्वंयंभू पिंडीच्या स्वरुपात आहे. या तिन देवींच्या एकत्रित स्वरुपाला माता वैष्णोदेवी या नावांने ओळखले जाते. माता वैष्णोदेवीच्या एका कटाक्षाने भक्तांचे सर्व कष्ट दूर होतात.

भैरवनाथाचा वध केल्यानंतर त्याचे शिर भवन पासून तिन किलोमिटर दूर जाऊन पडले त्या ठिकाणाला सध्या भैरवनाथ मंदिर म्हणून ओळखले जाते.

माता वैष्णोदेवीच्या यात्रेची सुरवात कटरा येथुन होते. बहुतांश यात्रेकरु कटरा येथे विश्रांती घेऊन नंतर आपल्या यात्रेची सुरवात करतात. कटरा येथे मातेच्या दर्शनाला जाण्यासाठी आवश्यक असणारी यात्रा पर्ची मिळते. यात्रापर्ची घेतल्यानंतरच यात्रेकरु वैष्णोदेवीच्या चढाईला सुरवात करु शकतात. यात्रा पर्ची जारी केल्यापासून सहा तासाच्या आत आपणाला बाणगंगा चेक पॉईंटला दाखल व्हायला लागते अन्यथा ती आपोआप रद्द होते. या पॉईंटला आपले सामानही चेक केले जाते. मातेच्या दर्शनाला जाणाऱ्या यात्रेकरुंची रहदारी रात्रभर चालू असते.

मातेच्या दर्शनाला जाण्यासाठी घोड्यांची सोय आहे. त्याचप्रमाणे वृद्ध, आजारी भक्तांसाठी पालखीचीही सोय आहे. कटरा येथुन मंदिरात जाण्यासाठी हेलिकॉप्टरचीही सोय आहे. हेलिकॉप्टरने गेल्यावर तिन किलोमिटर चालत जावे लागते. हल्ली अर्धक्वारी पासून बॅटरी कारचीही सोय झाली आहे. ज्याला उच्च रक्तदाबाचा त्रास आहे त्यांनी पायऱ्या चढून जाऊ नये, त्याऐवजी पाखाडीसारख्या असणाऱ्या रस्त्याने जावे.

वैष्णोदेवीला दर्शनासाठी वर्षभर भक्तांची गर्दी असते. परंतु वैष्णोदेवीला भेट देण्याची योग्य वेळ ही उन्हाळयात आहे. थंडीमध्ये येथील तापमान -३ ते -४ इतके होते. या मोसमात दरडी कोसळण्याचा धोका जास्त असतो. त्यामुळे या काळात इकडे येण्याचे टाळावे.

मातेचे दर्शन घेऊन झाल्यावर परत सर्वजण एकत्र जमलो. सगळयांनी नाश्ता केला. आज नाश्त्याला छोले भटोरे आणि इकडच्या पद्धतीची कांदा भजी(प्याज पकोडे) घेतली होती. चहा पाणी घेऊन झाल्यावर चार किलोमिटर अंतरावर असलेल्या भैरोनाथ मंदिरात जाऊन त्यानंतर खाली कत्रा येथे जायचे होते. एकुण जवळपास १६ किलोमिटरचा तिव्र उताराचा रस्ता होता. त्यामुळे एवढे अंतर चालत जाणे शक्यच नव्हते. अखेर सर्वानुमते परत घोड्यावरून जायचे असे ठरले. परत बारगेनिंग करून प्रत्येकी ८०० रुपये ठरवले.

येतानाचा घोड्यावरूनचा प्रवास मात्र त्रासदायक वाटला. कधी एकदा तो संपतोय असे झाले होते. हॉटेलवर आल्यावर आंघोळ केली आणि बाकिच्यांच्या बरोबर जेवायलाही न जाता आराम करणे पसंत केले. आमचे बाकीचे मेंबर काही खरेदी वगैरे करायला गेले होते. अशा तऱ्हेने सहलीचा पहिला टप्पा पार पडला.

दिवस चौथा

पटणी टॉप हिल स्टेशन

आज दिनांक १७ मार्च! सकाळी लवकर उठून प्रातर्विधी आणि आंघोळ करून झाली. बाहेर बघितले तर आज हवामान बदलले दिसत होते. पाऊस चांगलाच सुरु झालेला होता. टि.व्ही. वरच्या बातम्यांमध्ये जम्मु काश्मिरमध्ये अतीवृष्टी आणि बर्फ पडण्याचा इशारा देत होत. सर्वांचे प्रातर्विधी आटोपल्यावर आम्ही बरोबर आणलेला नाश्ता केला. चहा कॉफी मात्र रुमवरच मागवली होती. बदललेल्या हवामानामुळे आमची बस उशिराच आली. साधारण नऊच्या सुमारास आम्ही मार्गस्थ झालो.

नियोजित वेळापत्रकाप्रमाणे आम्ही आज पटणी टॉप हे हिलस्टेशन व तेथिल प्रेक्षणिय स्थळे बघुन रात्री मुक्कामाला श्रीनगरला जाणार होतो. कटऱ्याहून पटणीटॉप साधारण ११० ते ११५ किलोमिटर अंतरावर आहे. पाऊस चालुच होता. जागोजागी बर्फ पडलेला दिसत होता.

पटणी टॉप हे जम्मु काश्मिरमधील उधमपुर जिल्ह्यातील पर्यटकांच्या दृष्टीने अतिशय महत्वाचे ठिकाण आहे. आपल्याकडिल महाबळेश्वर, माथेरान सारखे हिल स्टेशन आहे. येथे नेहमीच पर्यटकांची खूप गर्दी असते. पटणी टॉप येथे नाथा टॉप, संसार लेक, नाग मंदिर, सुध महादेव मंदिर, बगलीहर डॅम, बिल्लो की पावरी ही पर्यटकांची आवडती ठिकाणे आहेत. पटणी टॉप समुद्रसपाटी पासून २०२४ मिटर (६६४० पुट) उंचीवर आहे. येथे येणारे पर्यटक जास्त करून स्नो फॉल आणि स्केटीगचा आनंद घेण्याकरीता येतात.

आम्ही जेव्हा पटणी टॉप मधे प्रवेश केला तेव्हा पावसाचा जोर वाढला होता. जेव्हा आम्ही नागमंदिरात जाण्यासाठी गाडीतून खाली उतरलो तेव्हा पावसाच्या जोरामुळे चार पावलेदेखिल चालणे मुश्कील झाले होते. हा सिझन पावसाचा नसल्यामुळे आमच्या कोणाकडेच छत्री नव्हती. नागमंदिरात जाण्याकरीता जवळपास दोन किलोमिटर चालत जायचे होते आणि पावसामुळे ते शक्य नव्हते. त्यामुळे नाग मंदिरात जाणे तूर्तास स्थगित करून आम्ही नाथा टॉपकडे जायचे ठरवले.

जाता जाता वाटेत एक पार्क होते त्या ठिकाणी थोडावेळ थांबून चहापाणी घेतले. तेथिल रिमझिम पाऊस आणि थंड वातावरणात गरमागरम वाफाळलेला चहा पिण्याची मजा काही

औरच होती. पाऊस जरा कमी झाल्यावर आमच्या आजुबाजुच्या निसर्ग सौंदर्याचा आस्वाद घेता आला. पाऊस आणि आजुबाजुला पडलेला बर्फ यामुळे तेथिल निसर्ग सौंदर्य वेगळेच भासत होते. जोडीला गुलाबी थंडीदेखिल होती. अशा या वातावरणांत जर फोटो काढले नाही तरच नवल.

थोड्या वेळाने नाथा टॉप येथे गेलो. तिथे पोचेपर्यंत वातावरण बदलले होते. आता चक्क उन पडले होते. आजुबाजुला पडलेल्या बर्फावर उन्हाचे कवडसे पडल्यावर तो बर्फ स्फटीकाप्रमाणे चमकत होता. दरम्यान बर्फात आणि पावसाळी वातावरणांत वावरण्यासाठी आवश्यक असणारे गमबुट आणि रेनकोट सारखे मोठे डगले भाड्याने घेतले. येथेही बारगेनिंग नाही केले तर खूप मोठे नुकसान होऊ शकते.

बसमधून उतरल्यावर समोर दिसणारे दृष्य खरोखरच अवर्णनिय असे होते. सगळीकडे नुसता बर्फच बर्फ दिसत होता. जवळपास तिस फुट असणारा रस्ता बर्फाने झाकल्यामुळे चिंचोळया गल्लीसारखाच दिसत होता. देवदार, पाईन सारख्या मोठ्या झाडांवरदेखिल बर्फाचे थर साचलेले दिसत होते. खाली आलेल्या बारिक बारीक फांद्या म्हणजे बर्फाच्या सळयाच दिसत होत्या. पावसाने आणि बर्फाने मोबाईल खराब होऊ नये म्हणून त्या प्लॅस्टिक पिशवीत ठेवला

आणि प्रत्येकाने भराभर फोटो काढायला सुरवात केली. या अप्रतिम दृष्याचे किती फोटो काढु आणि किती नाही असे प्रत्येकाला झाले होते.

लोकल गाईडच्या मदतीने मग बर्फात स्केटींग करायला सुरवात केली. आमचे स्केटींग म्हणजे लाकडाच्या जाड फळीवर एक एक जण बसून लहानपणी खेळायचो तसे गाडी गाडी खेळलो. म्हणजे आमचा जो गाईड होता त्याच्या भावाने आम्हाला त्या फळीवर बसवले आणि त्याने ती फळी बर्फाच्या उतारात ओढत नेली. त्यानंतर प्रत्येकाने बर्फाचे गोळे करून एकमेकांच्या अंगावर उडवले. बर्फात उताराने घसरत जाणे सोपे होते परंतु परत चढण चढून येणे कठीण काम होते. कारण बर्फावर शरिराचा भार पडला की, तो वितळत होता. त्यामुळे पाय फटाफट सरकत होते. शेवटी आमच्या गाईडने आम्हाला सुखरुप बाहेर काढले. बराच वेळ बर्फात राहील्याने आणि नुकताच परत सुरु झालेल्या पावसाने थंडी असह्य होऊ लागली. त्यामुळे एक एक करत सर्वजण परत रस्त्यावर आले. तिथल्या स्थानिक लोकांनी म्हणजेच गाईडचे काम करणाऱ्या मंडळींनी शेकोटी पेटवली होती. त्या शेकोटीवर हात पाय शेकून स्वत:ला गरम करून घेतले. जोडीला गरमागरम चहा कॉफी होतीच.

आम्हाला आज श्रीनगरला मुक्कामाला जायचे होते. बदललेल्या हवामानामुळे आता आम्हाला आमचा नियोजित कार्यक्रमात बदल करणे भाग होते. जवळपास दोनशे किलोमिटरचा

प्रवास करायचा होता. हा रस्ता पूर्णपणे पहाडी भागातून जात होता. म्हणून मग आम्ही बाकीचे सगळे पॉईंट बघणे रद्द करून साधारण दोनच्या सुमारास श्रीनगरच्या रस्त्याला लागलो.

साधारण तासाभराच्या प्रवासानंतर वाटेतल्या एका वैष्णो धाब्यावर जेवणासाठी थांबलो. तेथिल जेवणाचा मेनू एकदम मस्त होता. राजमा रोटी आणि राजमा राईस. राजमा हा इतका रुचकर लागू शकतो याची कधी कल्पनाच केली नव्हती. राजमा राईसमधील भातावर साजुक तूप घातले होते त्यामुळे त्याची चव लाजबाब होती. सुग्रास जेवण झाल्यावर परत प्रवासाला सुरवात झाली. पोटातल्या जेवणाने सगळेच जण सुस्तावले होते.

जवळपास पाच साडेपाच वाजले असावेत रस्त्यावरील मैलाचे दगड रामबन पंधरा किलोमिटर आहे असे दाखवत होते. आमची बस एक दोन किलोमिटर गेली नसेल तोच पोलिसांनी रस्त्यावर अडथळे लाऊन रस्ता बंद केलेला दिसत होता. गाड्यांची भली मोठी लाईन लागली होती. पोलिसांनी आमच्या ड्रायव्हरला सांगितले की, श्रीनगरला जाणाऱ्या रस्त्यावर जागोजागी दरडी कोसळल्यामुळे हायवे पूर्णपणे बंद आहे. शिवाय वाटेत मोठा अपघात झाला आहे. दरीत कोसळलेल्या बसमधील जवळपास सर्वच माणसे दगावली आहेत. अशा परिस्थितीत दोन दिवस तरी ट्रॅफिक सुरु होणार नाही. तेव्हा गाडीतल्या माणसांचे वय आणि महिलांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने तुम्ही ताबडतोब मागे फिरा. सगळी हॉटेल बुक होण्यापूर्वी दोन दिवसाच्या मुक्कामाची सोय करा.

अचानक निर्माण झालेल्या समस्येवर तोडगा काढण्याकरीता ड्रायव्हरने त्याच्या मालकाला फोन लावला. आमच्या सहल संयोजक सौ. केतकी यांनी श्री फारुकभाई यांना फोन लावला. आमच्या सहलीचा सर्व व्यवहार श्री फारुक भाई यांच्याबरोबर ठरला होता. आम्ही माता वैष्णोदेवीचे दर्शन घेतल्यानंतर दिनांक १७ मार्च रोजी कत्रा येथील हॉटेलमधून आम्हाला पिकअप करून दिनांक २९ मार्चला रात्री पानिपत येथील हॉटेल सोडे पर्यंतची सर्व व्यवस्था करण्याची जबाबदारी श्री फारुक भाई यांच्यावर सोपवली होती. फक्त जम्मुपासून पुढील जेवण नाश्ता चहापाणी आम्ही करणार होतो.

फारुक भाई यांनी त्यांचे कॉन्टॅक्ट वापरून परिस्थितीचा आढावा घेतला आणि त्यांनी आमची सोय पटणी टॉप येथील “रोज गेस्ट हाऊस” येथे केली. त्यामुळे आमची गाडी परत उलट दिशेने वळवली आणि दोन तासाचा प्रवास करून परत पटणी टॉपला आलो. येताना वाटेत सतत पाऊस चालुच होता. डोंगरावरून पाण्याचे धबधबे पडत होते. रस्त्यावरून पाण्याचे लोट वहात होते. ते पाहून मला कोकणातल्या तुफान पावसाची आठवण झाली.

पटणी टॉप येथील हॉटेल मात्र छान होते. आम्ही अचानक आल्याने सर्वांची व्यवस्था एका मजल्यावर झाली नाही. परंतु एकुण व्यवस्था चांगली होती. गेल्या गेल्या गरमा गरम चहा घेतल्यानंतर चांगल्या कडकडीत पाण्याने आंघोळ केली. दिवसभराच्या प्रवासाचा शिण त्यामुळे दूर झाला. साधारण दोन तासांनी मस्त मिक्स भाजी, रोटी, डाळ, राईस आणि जोडीला पापड असे भरपेट जेवण जेवलो. मुख्य म्हणजे एवढ्या थंडीतही रोटीसुद्धा सर्व पदार्थ गरमा गरम होते. तिथल्या जीवघेण्या थंडीत याचे अप्रुप जास्त होते. विशेषत: जेवणाची चव मस्त होती. जेवण झाल्यावर थोड्या गप्पा मारून सगळेजण झोपायला गेले. वास्तविक आमच्या वेळापत्रकाप्रमाणे आमचा एक मुक्काम पटणी टॉपवर ठरला होता. परंतु काही कारणाने तो रद्द झाला होता. परंतु निसर्गाच्या मनात आम्ही पटणी टॉपवर मुक्काम करावा असे होते. त्यामुळे श्रीनगरच्या दिशेने निघालेले आम्ही येथे मुक्कामाला आलो होतो.

दिवस पाचवा

पटणी टॉपहून श्रीनगरकडे

आज दिनांक १८ मार्च २०१६! सकाळी आमचे सगळे व्यवहार जरा निवांतच चालू होते. आज वातावरण मात्र बदललेले दिसत होते. आभाळ निरभ्र होते, थोडेफार उन पडलेले होते. सकाळचे प्रातर्विधी आंघोळ दाढी उरकली आणि पहिला चहा रुममध्येच मागवला. नाश्ता करण्याकरीता मात्र सगळेजण एकत्र जमलो. तेवढ्यात श्रीनगरहून फारुक भाईंचा फोन आला, ते म्हणाले ट्रॅफिक अंशत: सुरु झाले आहे. जी प्रवासी वाहने कालपासून ट्रॅफिकमध्ये अडकली आहेत, सध्या त्यांनाच फक्त सोडणार आहेत. तेव्हा तुम्ही वेळ न घालवता ताबडतोब निघा. हा निरोप आम्ही आमचा ड्रायव्हर गब्बुला सांगितला. त्याने परत फारुकभाईंबरोबर फोनवर बोलुन व्यवस्थित चौकशी केली. त्यानंतर साधारण दहा वाजता आम्ही पटणी टॉप वरील हॉटेलमधून बाहेर पडलो.

पटणी टॉप गावाच्या बाहेर असलेल्या पोलीस आणि सिमासुरक्षा दलाच्या संयुक्त चेक पोस्टवर गेल्यावर आमची गाडी अडवली. पोलिसांनी सांगितले की अजुन ट्रॅफिक सुरु झाले नाही. वाटेत अडकुन पडलात तर परत मागे फिरणे शक्य होणार नाही. मग परत फोना फोनी सुरु झाली. पोलिसांनीही कुठेतरी फोन केला. अखेर अर्धा तासानी आमची गाडी पोलिसांनी सोडली. गाडी सुटल्याबरोबर व्यवहारेंनी गणपती बाप्पा मोरयाचा गजर केला. खरोखरच आलेले विघ्न हरण्याकरीता त्या विघ्नहर्त्या गजाननाच्या आशिर्वादाची गरज होती. म्हणून मग सामुदायिक गणपति अथर्वशिर्षाचे पठण सुरु केले. ते संपल्यानंतर प्रणम्य शिरसा त्यानंतर दुसरी स्तोत्रे असा क्रम सुरुच होता. त्यानंतर आमचा प्रवास सुरु राहिला परंतु त्याची गती अतिशय मंद होती. एका ठिकाणी रस्ता रुंदिकरणाचे काम सुरु होते. तेथे सुरुंग लावून कातळ फोडायचे काम सुरु होते. त्या एका जागेवर तब्बल दिडतास गाडी उभी होती.

हॉटेल सोडल्यापासून सलग सहा तास गाडीत बसून होतो. ट्रॅफिक मंद गतीने का होईना सुरु होते. फक्त छोट्या गाड्यांनाच सोडले होते. रस्त्याच्या कडेला ट्रक, टेंपो, अगदी बसदेखिल लाऊन ठेवलेल्या होत्या. जवळपास सत्तर ऐंशी किलोमिटर होईल एवढी या मोठ्या गाड्यांची लाईन रस्त्याच्या कडेला लावलेली होती. श्रीनगरला जाणारा सर्व रस्ता अतिशय अवघड असा होता.

एका बाजुला उंचच उंच डोंगर तर दुसऱ्या बाजुला खोल खोल दरी असा रस्ता होता. त्या उंचच उंच डोंगरावर जायला कोणताच रस्ता दिसत नव्हता तरीही तेथे विखुरलेल्या स्वरुपात घरे दिसत होती. एकुणच इथल्या स्थानिक लोकांचे जीवन खडतर असे दिसत होते. त्यांना खाण्यापिण्याच्या आणि इतर जीवनावश्यक वस्तु कशा मिळत असतिल देव जाणे.

जसे जसे श्रीनगर जवळ यायला लागले तसा वातावरणात बदल जाणवयला लागला. सिमा सुरक्षा दलाच्या वाहनांची वर्दळ वाढलेली दिसायला लागली. जागो जागी सिमा सुरक्षा दलाचे जवान हातात हातात बंदुका ताणलेल्या अवस्थेत पहारा करताना दिसायला लागले. असे वातावरण बघायची कधीच सवय नसल्याने मनावर नकळत दडपण यायला लागले.

लवकरच बनिहाल अथवा जवाहलाल नेहरु बोगदा आला. बोगदा सुरु होण्याच्या आधी जवळपास एक किलोमिटर पासून जवानांचा पहारा दाट झालेला होता. पहारा करीत असलेले जवान हातात रायफल ताणून कोणत्याही क्षणी फायर करायच्या तयारीत असलेले दिसत होते.

आमची गाडी या बोगद्यातून चार मिनिटे चालत होती. या बोगद्याची लांबी २.८५ किलोमिटर आणि रुंदी अडिच मिटर आहे. हा बोगदा बांधायला सन १८५४ ते १८६० एवढा कालावधी लागला होता. पुर्वी हा बोगदा मध्यरात्री पासून सकाळी सात वाजेपर्यंत बंद असायचा परंतु बोगद्याचे नूतनीकरण झाल्यापासून तो चोविस तास खुला असतो.

थोड्याच वेळात लाखनपुर टोल नाका आला. ट्रॅफिक जामचे संकट आता संपले होते. त्यामुळे फ्रेश होण्याकरीता थांबायला आता हरकत नव्हती. जेथे महिलांकरीता टॉयलेटची सोय असेल अशा ठिकाणी गाडी थांबवण्याची सूचना आम्ही ड्रायव्हरला केली. त्याप्रमाणे त्याने एका हॉटेल समोर गाडी उभी केली. जिथे गाडी थांबवली होती त्या हॉटेलचे नांव होते, “नाझ मुस्लिम हॉटेल” नांव बघुन मन थोडेसे चरकले. पण आता मनाला याची सवय करायला हवी होती. कारण श्रीनगरमध्ये सर्वच मुस्लिम असणार होते. आपल्याकडे जसे कोंकणी, पंजाबी अथवा साऊथ इंडियन हॉटेल असते तसे हे मुस्लिम हॉटेल असावे. तेथे चहा कॉफीची ऑर्डर दिली. परंतु त्याने कॉफी मिळणार नाही असे सांगितले. आमचे चार मेंबर कॉफि पिणारे होते. त्यांना दुधाची ऑर्डर दिली. येथील विशेष म्हणजे येथे दुधात साखर घाला असे सांगायला लागते. इकडे बहूदा साखर घातलेले दूध पिण्याची पद्धत नसावी. आज दुपारचे जेवण गुड डे बिस्कीट आणि चहा यावर भागवावे लागले. कारण येथे दुसरे काही उपलब्धच नव्हते.

काही अंतर गेल्यावर हलमुल्लाह नावाचे छोटे शहरवजा गांव लागले. या गावाचे वैशिष्ट असे की, येथे रस्त्याच्या दोन्हीबाजुला ठराविक आकाराचे लाकडाचे तुकडे पद्धतशिरपणे रचून ठेवलेले होते. चौकशी करता समजले की, हे गांव क्रिकेटच्या बॅट निर्मितीकरीता प्रसिद्ध होते. ते लाकडाचे तुकडे काश्मिर सारख्या अतिशय थंड वातावरणात होणाऱ्या विलो(Willow) या झाडाच्या लाकडाचे तुकडे होते. या गावात तयार होणाऱ्या बॅट पाकिस्थान, इंग्लंड, न्यूझिलंड, ऑस्ट्रेलिया, बांगला देश येथे एक्सपोर्ट होतात. इंग्लंडमध्ये तयार होणाऱ्या बॅटच्या खालोखाल येथे तयार होणाऱ्या बॅटस्चा नंबर लागतो.

रस्त्याच्या दुतर्फा पिवळी फुले असणाऱ्या झुडुपांची शेती दिसत होती. चौकशी केली तेव्हा ती मोहरीची शेत असल्याचे समजले. मग त्या शेतांच्या पार्श्वभूमीवर फोटो काढणे झाले. हिरव्या गार झांडांवर आलेल्या वळी जर्द फुले असलेली लांबच लांब पसरलेली शेती अतिशय आकर्षक वाटत होती.

श्रीनगरच्या हद्दीत दाखल झाल्यावर म्हणजेच श्रीनगर सुमारे २५-३० किलोमिटर असेल तेव्हा एक आयुष्यभर लक्षांत राहिल असा एक प्रसंग घडला. झाले काय, आमच्या गाडीच्या मागच्या चाकाने रस्त्यावरील एक दगड उडाला आणि कशावर तरी आपटला त्याचा मोठा आवाज झाला. म्हणून साहजिकच काय झाले ते बघायला आमचा ड्रायव्हर खाली उतरला. त्याच क्षणाला सिमा सुरक्षा दलाच्या दोन गाड्या आमच्या गाडीच्या मागे आणि पुढे उभ्या राहिल्या. झटकन

त्यातून दोन जवान रायफल रोखुन खाली उतरले. आमच्या ड्रायव्हरने त्यांना काय घडले ते सांगितल्यावर त्यांनी त्याला काहीही न बोलता गाडी त्वरीत हलवायला सांगितली.

अखेर संध्याकाळी सात साडेसातच्या सुमारास आम्ही श्रीनगर शहर गाठले. आम्हाला रिसिव्ह करायला श्री फारुकभाई दाल सरोवराच्या गेट क्रमांक सातवर हजर होते. सर्वांचा परिचय करून झाल्यावर आमचे सर्व सामान खाली उतरवले गेले. समोरच विस्तिर्ण असे दाल सरोवर दिसत होते. हाऊस बोटींमधील लाईटच्या प्रकाशामुळे सरोवरातिल पाणी चमकत होते.

फारुकभाईंच्या सोबत असणाऱ्या माणसांनी भराभर आमचे सामान दोन शिकाऱ्यांमध्ये चढवले. आम्हीही पाच पाच जणांच्या ग्रुपनी दोन्ही शिकाऱ्यांमध्ये बसलो. काही मिनिटातच आमच्या मुक्कामाच्या ठिकाणी म्हणजेच हाऊस बोटीच्या पायऱ्यांपाशी थांबले. आमच्या हाऊस बोटचे नांव होते शागु पॅलेस.

शागु पॅलेसमध्ये आमचे स्वागत करायला फारुकभाई यांची पत्नी, आई आणि मुले हजर होती. आज दिवसभराच्या प्रवासाने खूपच थकायला झाले होते. वास्तविक दोनशे किलोमिटर प्रवास सलग केला असता तर जास्तीत जास्त चार तास लागले असते. परंतु आम्हाला याच

प्रवासाला जवळपास आठ तास लागले होते. फक्त समाधान एवढेच होते की, एवढे ट्रॅफिक असूनही अडखळत का होईना आमचा प्रवास पूर्ण झाला होता.

चहा, कॉफी झाल्यानंतर फारुकभाईंनी आम्हाला आमच्या रुम दाखवल्या. सामानाचे सॉर्टींग होऊन प्रत्येकाचे सामान प्रत्येकाच्या रुममध्ये पोचवले गेले. त्या सामाना पाठोपाठ आम्ही आपापल्या रुममध्ये दाखल झालो. अँटॅच टॉयलेट आणि बाथरुम असणारी ती सेमी लक्झरी रुम होती. रुमची रचना छानच होती. सर्वरुममध्ये जाड आणि उबदार कारपेट अंथरले होते. प्रशस्त बेड उबदार दोन रग शिवाय ईलेक्ट्रीक वेड हिटरही होता. त्यामुळे हवामान अती थंड असले तरी सुसह्य होणार होते. या शिवाय रुमच्या बाहेर हॉलवजा खोली होती. तिथेही गॅसवरचा रुम हिटर होता.

तासाभराने जेवण झाल्यावर सगळयांनी गॅसवरील रुम हिटरच्या उबेत बसून थोड्या गप्पा मारल्या. उद्याच्या कार्यक्रमावर चर्चा केली आणि आपापल्या रुममध्ये झोपण्यासाठी गेलो. अशा तऱ्हेने आमचा श्रीनगरमधील आमचा पहिला दिवस संपला.

****

दिवस सहावा

सोनमर्ग दर्शन

आज दिनांक १९ मार्च२०१६! आज सकाळी सहा वाजताच जाग आली. थंडी प्रचंड होती. काल रात्री श्रीनगरला पोचल्याचा केदारला फोन केला तेव्हा मी नेट चालू केले होते. तेव्हा तापमान आठ अंश सेल्सीएस एवढे होते. आज सकाळी बघितले तेव्हा ४ अंश सेल्सिएस होते. बाहेर बघितले तो रिमझिम पाऊस चालू झालेला होता. सात वाजता गरम पाणी चालू झाल्यावर सर्व प्रातर्विधी उरकले. आंघोळ दाढी झाल्यावर बाहेर डेकवर आलो.

डेकवर गुडमार्निंग करायला फारुकभाई हजर होते. त्यांनी काश्मिरी स्पेशल घोंगडीसारखा दिसणार डगला घातला होता. त्या डगल्याच्या आतमध्ये काश्मिरी कांग्री (शेगडी) घेतली होती. एकुणच त्यांनी थंडीचा पुरता बंदोबस्त केला होता. त्यांच्या बरोबरच गप्पा मारत गरमा गरम चहा घेतला.

रात्री हाऊस बोटवर आलो तेव्हा एकतर काळोख होता आणि दिवसभराच्या प्रवासाने आलेल्या थकव्यामुळे आजुबाजुला काही बघितले नव्हते. आता वातावरण आल्हाद दायक होते. फारुकभाईंशी चर्चा करता करता त्यांनी आम्ही रहात असलल्या दाल सरोवराची माहिती दिली.

सरोवराची लांबी ७.४४ किलोमिटर तर रुंदी ३.५ किलोमिटर एवढी आहे. त्याचे क्षेत्रफळ २२ किलोमिटर एवढे होते. हे सरोवर कमित कमी ४.७ फुट तर जास्तीत जास्त २० फुट एवढे खोल आहे. या सरोवरातिल पाण्याचा साठा ८७३ दशलक्ष घन मिटर एवढा असतो.

या सरोवरात दोन बेटे असून त्यांची नांवे सोना आणि रुपा अशी आहेत. जेव्हा तापमान उणे अकरा सेल्सिएस होते तेव्ह्ा सर्व सरोवर गोठलेल्या अवस्थेत असते. या सरोवरामधील पाणी पृष्टभागावर जरी स्थिर दिसत असले तरी त्याच्या अंतर्गत प्रवाह् आहेत. दाल सरोवराचे मूळ नांव “महासरित” असे होते. पौराणिक कथेनुसार दाल सरोवराच्या पूर्व भागात असलेल्या “इसबार” या गावात माता दुर्गादेवीचा निवास होता. दाल सरोवराच्या किनाऱ्यावरील त्या जागेला “सूरेश्वरी” असे संबोधले जायचे.

ब्रिटीश साम्राज्याच्या काळात त्या काळातिल डोग्रा महाराजांनी काश्मिर घाटीमध्ये घरे बांधण्यासाठी आणि मालमत्ता बनविण्यासाठी बंदी घातली होती. त्या नियमाला पळवाट म्हणून ब्रिटिशांनी दाल सरोवरात हाऊस बोटी बांधल्या. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर ती तरंगती घरे काश्मिरी हाजी लोकांनी आपल्या मालकीच्या करून घेतली. त्यांची देखभाल आणि दुरुस्ती करून त्यावर बागा, दुकाने आणि घरे तयार केली.

सगळयांच्या आंघोळी झाल्यानंतर कांदा पोहे, ब्रेड बटर जाम असा नाश्ता झाला. त्यावर चहा कॉफी झाल्यावर दाल सरोवराच्या किनाऱ्यावर जाण्याकरीता दोन छोटे शिकारे आले. त्यात बसून सर्वजण परत सात नंबरच्या गेटवर आलो. तेथे बस तयारच होती. त्यात बसून सर्वजण सोनमर्गच्या दिशेने निघालो.

सोनमर्ग याचा अर्थ सोनेरी गवताचे मैदान. काश्मिरी भाषेत “मर्ग” या शब्दाचा अर्थ आहे, गवताचे मैदान. हे स्थळ श्रीनगरच्या उत्तर पूर्वेला ८७ किलोमिटर अंतरावर आहे. सोनमर्गमधील सिंध घाटी काश्मिरमधील सर्वात मोठी घाटी आहे. सोनमर्ग हे समुद्रसपाटी पासून सुमारे तिन हजार मिटर उंचीवर असणारे एक रमणिय स्थान आहे. सिंधु नदीच्या दोन्ही बाजुच्या किनाऱ्यावर पसरलेले हे मर्ग सोन्यापेक्षाही सुंदर दिसते.

सोनमर्गला जायच्या रस्त्याच्या दुतर्फा घनदाट झाडी होती. घाटी चढायला सुरवात केल्यावर जिकडे तिकडे बर्फच बर्फ दिसत होता. सोनमर्गमध्ये पोचल्यावर तेथिल स्थळे पहाण्याकरीता आम्ही नेलेली गाडी उपयोगी नव्हती. त्याचप्रमाणे बर्फात फिरण्याकरीता आमचे रेग्युलर शूजदेखिल उपयोगी नव्हते. त्यामुळे बर्फात चालता येईल असे गमबुट भाड्याने घेतले.

त्याचप्रमाणे बर्फात चालू शकेल अशी चेन लावलेली फोरव्हीलरही भाड्याने ठरवली. प्रत्येक ठिकाणी बार्गेनिंग कंपलसरी होते. या बाबतित तेथिल लोकांचे म्हणणे असे की, आम्हाला आमचा वर्षभराचा गुजारा याच्यावरच करावा लागतो त्यामुळे जास्तीत जास्त पैसे कसे मिळतिल हे आम्ही बघतो. कारण पर्यटनाचा सिझन काही वर्षभर नसतो.

येथे आम्ही पब्लिक पार्क, राम तेरी गंगा मैली हो गयी या सिनेमाचे शूटींग जेथे झाले तो स्पॉट, पाकीस्थान मध्ये उगम पाऊन सोनमर्गमधून वहात जाणारी निलम नदी ही ठिकाणे पाहिली. ही नदी गोठलेल्या स्वरुपात पहायला मिळाली. या शिवाय गडसर लेक, विशनसर लेक, बालतल व्हॅली, कृष्णसर लेक ही प्रेक्षणिय स्थळे आहेत. परंतु कालच झालेल्या स्नो फॉल मुळे सगळीकडे बर्फाचे साम्राज्य होते. त्यामुळे काही ठिकाणी जाणे आम्हीच रद्द केले, तर अर्थ स्लायडींग झालेले असल्यामुळे काही ठिकाणी पोलिसांनी जाऊ दिले नाही.

सोनमर्गमध्ये सगळयात जास्त वेळ आम्ही पब्लिक पार्कमध्ये घालवला. गाडीतून उतरल्यापासून फोटो आणि व्हीडिओ काढायचा प्रत्येकाने सपाटाच लावला. या ठिकाणचे वातावरणच असे आल्हाददायक होते की, प्रत्येकातले लहान मुल जागे झाले होते. एकमेकांच्या अंगावर बर्फ उडवणे, बर्फात लोळणे अशा खेळात प्रत्येकजण आपले वय विसरून बर्फात रमु लागला. श्रीवर्धनला येणारे जसे समुद्र पाहिल्यावर वेडे होतात तसेच आमचे झाले होते. समुद्र आम्हाला रोजचाच असल्याने त्याचे आम्हाला अप्रुप नव्हते परंतु ज्यांनी कधी समुद्रच पाहिला नाही त्याला त्याचे वेड लागणारच. हे आम्हाला आत्ता जाणवले, कारण बर्फ पाहून आम्हीदेखिल असेच वेड्यासारखे वागत होतो.

सोनमर्ग येथे अक्रोड, चिड, देवदार, चिनार आणि विलो या झाडांची गर्दी दिसत होती. काही काही झाडे तर प्रचंड मोठे वृक्ष झालेले दिसत होते. येथेदेखिल विलो लागडांचे बॅट बनविण्याकरीता ठराविक आकाराचे तुकडे रचून ठेवलेले आढळले. त्या रचून ठेवलेल्या लाकडांवर बर्फाचे थरावर थर पसरलेले दिसत होते.

बर्फामध्ये भरपुर वेळ घालवल्यावर श्रीनगरच्या दिशेने परतिचा प्रवास सुरु केला. परत जाताना श्रीनगरमध्ये थोडे मार्केटिंग करायचे होते. त्याचप्रमाणे येथील प्रसिद्ध शकराचार्य मंदिरालाही भेट द्यायची होती. परंतु गाडीचे काम निघाल्याने त्यातच वेळ गेला. नंतर काळोख पडला. त्यामुळे दुसऱ्या कुठेही न जाता परत मुक्कामी हाऊस बोटवर गेलो.

हाऊस बोटीत आल्यावर चहा कॉफी झाली. दरम्यान हवेतील गारवा वाढायला लागला होता. तापमान सहा अंश सेल्सिएस एवढे खाली आले होते. गॅस हिटरच्या उबेत उद्याचा कार्यक्रम ठरवणे सुरु होते. उद्या आमचे एक सहप्रवासी सुरेश आठवले यांचा वाढदिवस होता. त्यामुळे उद्याचा मेनू आणि वाढदिवसाच्या कार्यक्रमाचे नियोजनही करणे चालू होते.

दरम्यान एक फोटोग्राफर काश्मिरी ड्रेस घेऊन फोटो काढायला आला होता. सर्वांनाच काश्मिरी ड्रेसमध्ये फोटो काढायचे होते. परंतु तो फोटोग्राफर अव्वाच्या सव्वा पैसे सांगत होता.

त्यामुळे येथेही बार्गेनिंग करून पन्नास रुपये एका फोटाचा दर ठरवून त्याला सकाळी यायला सांगितले. त्यानंतर एक विक्रेता हार, बांगड्या वगैरे प्रसाधन साहित्य घेऊन विक्रीकरीता आला होता. मग सर्व महिला मंडळ त्याच्या भोवती बसून निरनिराळया वस्तू पाहून त्याचे बार्गेनिंग करून खरेदी करु लागले.

काश्मिरमध्ये आल्यावर प्रत्येकालाच येथील अक्रोड, केशर, जर्दाळु, बदाम यासारखा येथील प्रसिद्ध सुकामेवा खरेदी करायचा होता. परंतु खात्रीलायक आणि वाजवी किंमतीत कसा मिळणार याचा प्रश्न होता. परंतु हा प्रश्न फारुकभाईंच्या मिसेसनी सोडवला. त्यांच्या भावाचा या सर्व वस्तुंचा बिझिनेस होता. त्यांनी एक दिवस आधी ऑर्डर दिली तर या सर्व वस्तू वाजवी दरात आणि उत्तम दर्जाच्या आपल्या हाऊसबोटवरच उपलब्ध करून देईन असे आम्हाला सांगितले. त्यामुळे आम्ही निश्चिंत झालो.

रात्री जेवण झाल्यावर उद्याचा कार्यक्रमाबद्दल चर्चा करून आणि तो निश्चित करून सगळेजण झोपायला निघाले. उद्या गुलमर्गला जायचे होते. शिवाय उद्या काश्मिरी ड्रेसमधले फोटो काढायला फोटो ग्राफर येणार होता. त्याचप्रमाणे काश्मिरी साड्या घेऊन एक विक्रेताही हाऊसबोटवर येणार होता. श्रीनगर दर्शनाचा कार्यक्रमही उद्याच होता. असा भरगच्च कार्यक्रम उद्याकरीता ठरवला होता. त्यामुळे उद्या लवकरात लवकर तयार होणे गरजेचे होते. त्याकरता वेळेवर झोपणे जरुरी होते. एकमेकांना गुड नाईटकरून सर्वजण आपापल्या रुममध्ये गेले.


In kashmiri dress

****

दिवस सातवा

गुलमर्ग आणि श्रीनगर दर्शन

आज दिनांक २० मार्च. आज सकाळी सात वाजताच तयार होऊन हाऊसबोटच्या डेकवर आलो. आज मुद्दामच कोणतेही गरम कपडे घातले नव्हते. आजचे तापमान ८ अंश सेल्सिएस एवढे होते. त्यामुळे थंडी होतीच परंतु ती बोचरी वाटत नव्हती. रेग्युलर टि शर्ट आणि जीन्सची पँट घातली होती तरी बेअरेबल वाटत होते.

काल ठरल्याप्रमाणे फोटोग्राफर हजर झालेला होता. सर्वप्रथम आठवले दांपत्याचे फोटो सेशन झाले. आज सुरेश आठवले यांचा वाढदिवस होता. त्यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. त्यांचे दोघांचे त्यांच्या मोबाईलमध्ये फोटो काढून दिले. त्यानंतर छोट्या शिकाऱ्यामध्ये काश्मिरी ड्रेसमध्ये बसून आमचे दोघांचे फोटो सेशन करून झाले. आम्ही फक्त चार पाच फोटो काढायचे असे ठरवले होते. परंतु प्रत्यक्ष पंधरा फोटो काढून झाले. त्यानंतर एकेकाचे करत सर्वांचेच फोटो सेशन झाले. एकीकडे कापड खरेदी सुरु होती. सगळ्यांनीच श्रीनगरची आठवण म्हणून ड्रेसपिसची खरेदी केली. दरम्यान नाश्ता आला. आज आलु पराठा आणि लोणचे असा नाश्त्याचा बेत होता.

आज आमचा श्रीनगर दर्शनाचा कार्यक्रम होता. त्यानिमित्ताने फारुकभाईंनी आम्हाला श्रीनगरच्या इतिहासाची आणि प्रेक्षणिय स्थळांची माहिती दिली. श्रीनगर हे जम्मु आणि काश्मिर या राज्याचे राजधानीचे शहर समुद्रसपाटी पासून १७०० मिटर उंचीवर आहे. हे शहर हाऊस बोट आणि सरोवरांकरीता प्रसिद्ध तर आहेच. या व्यतिरिक्त पारंपारीक हस्तकला आणि सुक्यामेव्याकरीताही हे शहर प्रसिद्ध आहे. या शहराचा इतिहास तसा खूप प्राचीन आहे.

या शहराचे मूळनांव सूर्यनगरी असे होते. श्रीनगर या शहराच्या नांवातच खरं म्हणजे त्याचा अर्थ सामावला आहे. श्री म्हणजे लक्ष्मी याचाच अर्थ हे शहर लक्ष्मीचेच नगर आहे. राजा प्रवरसेन दुसरा याने या नगरीची स्थापना २००० वर्षांपूर्वी केली असावी याचे काही पुरावे उत्खननात सापडले होते असे म्हणतात. काही इतिहासकारांच्या मते हे शहर सम्राट अशोकाने स्थापन केले. श्रीनगर येथे अनेक सिनेमांचे शूटींग केले जात असे. जुन्या जवळ जवळ प्रत्येक सिनेमात काश्मिरचे दृष्य असणारे कमीत कमी एखादे तरी गाणे असायचेच. अगदी मराठी सिनेमातही हे चिंचेचे झाड या गाण्यात काश्मिरमधील दृष्ये आहेत.

श्रीनगरमध्ये निशात गार्डन, चश्मेशाही गार्डन, शालिमार गार्डन, गुलमर्ग, सोनमर्ग, पहलगाम ही पर्यटकांची आवडती ठिकाणे आहेत. हल्लीच श्रीमती इंदिरा गांधी यांच्या नावाने तुलिप गार्डन तयार करण्यांत आले आहे. येथे असणाऱ्या हजरत बल मस्जिदमध्ये हजरत मोहमंद पैगंबराच्या दाढीचा केस जपुन ठेवला आहे.

श्रीनगर शहरामध्ये शंकराचार्य पर्वतावर शंकराचार्यांचे मंदिर आहे. याला तख्त ए सुलेमान असेही म्हटले जाते. या मंदिराची निर्मिती राजा गोपादित्याने इसवीसन पूर्व ३७१ मध्ये केली होती. आमच्या दुर्दैवाने आम्ही येथे जाऊ शकलो नाही.

आमच्या सर्व मेंबरची खरेदी, फोटोसेशन उरकल्यावर आजचे उत्सवमूर्ती श्री आठवले यांचे औक्षण करण्यात आले. औक्षणाची तयारी केतकीताईंनी मुंबईहून येतानाच आणलेली होती. आमच्या ग्रुपमध्ये पांच सुवासिनी होत्याच त्यांनी त्यांना औक्षण केले. त्यानंतर फारुकभाईंच्या मिसेसनीपण त्यांना औक्षण केले. औक्षण झाल्यावर श्री आठवले यांनी आमच्यात ज्येष्ठ असणाऱ्या नानांना आणि फारुकभाईंच्या आईला नमस्कार केला. केतकीताईंनी खास वाढदिवसाकरीता आणलेल्या बेसनाच्या लाडवांनी सर्वांचे तोंड गोड केले. मात्र काश्मिरच्या कडक थंडीने त्या लाडवांनादेखिल कडक केले होते.

एवढे सगळे होईपर्यंत दोन शिकारे दाल सरोवराच्या किनाऱ्यावर जाण्याकरीता हजर झाले होते. त्या शिकाऱ्यांमध्ये बसून दाल सरोवराच्या किनाऱ्यावर आलो तेथे आमची बस हजरच होती. परंतु तेवढ्यात काही गरम टोप्या, जर्कीन असे गरम कपडे विकणाऱ्या लोकांनी आम्हाला गराडा घातला. आमच्यापैकी काही जणांनी त्यातले गरम कपडे खरेदी केले. आजचा बिझी शेड्युल विचारात घेऊन गब्बु आमचा ड्रायव्हर निघण्याची घाई करीत होता.

आता आम्ही गुलमर्गच्या रस्त्याला लागलो होतो. हा रस्तादेखिल निसर्गसौंदर्याने नटलेला होता. दोन्ही बाजुला घनदाट झाडी, मधून मधून धबधबे कोसळत होते. त्यातच रिमझिम पाऊस पडत होता. त्यामुळे वातावरणात गारवा वाढला होता. एकुणच वातावरण आल्हाददायक होते.

काश्मिरच्या खोऱ्यामध्ये श्रीनगर पासून कोणत्याही दिशेला गेले तरी निसर्गाची इतकी लोभसवाणी दृष्ये दिसतात की, ती पाहून असे वाटते परमेश्वराने आपले सर्व वैभव येथे उधळून टाकले आहे. या राजमार्गावरून निघाल्यावर पर्यटक रस्त्यावर लिहिलेल्या गावांची नावे वाचूनच आकर्षित होतात आणि गुलमर्ग, सोनमर्ग आणि पहलगाम येथे फिरायला जातात.

गुलमर्गच्या रस्त्याच्या दुतर्फा असलेली छोटी छोटी गावे आणि शेती मनाला मोहून टाकते. सरळ लांबच लाब रस्त्याच्या दुतर्फा असलेल्या उंचच उंच झाडांच्या भव्य रांगा हिरव्या हिरव्या भिंतींप्रमाणे भासतात. जुन्या काळातिल अनेक चित्रपटामधली गाणी या रस्त्यावर चित्रित केली गेली आहेत. चढणीचा रस्ता सुरु झाल्यावर या झाडांची घनता आणखिनच वाढते. गुलमर्गला पोचल्यावर सगळीकडे गवताने भरलेली सुंदर सुंदर मैदाने दिसायला लागतात. या मैदानांना काश्मिरी भाषेत मर्ग असे म्हणतात. गुलमर्ग याचा अर्थ आहे फुलांनी भरलेली मैदाने. गुलमर्ग समुद्रसपाटी पासून २६८० मिटर उंचीवर आहे. येथुन घोड्यावरून खिलनमर्ग, सेवन स्पिंग आणि अलपथ्थर येथे जाता येते.

गुलमर्ग येथे जगात सगळयात उंचीवर असणारा गोल्फकोर्स आहे. हिवाळयात येथील धरतीने बर्फाची जणू चादरच पांघरलेली असते. त्यावेळी आईस स्केटींगचा आणि बर्फात खेळण्याची हौस असणाऱ्यांसाठी हा जणू स्वर्गच असतो. गुलमर्ग येथील वैशिष्ट म्हणजे येथे चालवली जाणारा गंडोला. गंडोला म्हणजे बर्फाने भरलेल्या दरीची दृष्ये पहाण्याकरीता आकाशातून केलेले भ्रमण. येथे असणाऱ्या या रोप वे किंवा केबल कारमधून आकाशातून विहार करणे. येथे असणाऱ्या वृक्षराजीवर साचून राहिलेला बर्फ पहाण्यात एक वेगळीच मजा आहे. अशा या बर्फाच्छादित शिखरांवर जर सोनेरी सूर्याची किरणे पडली तर सोनेपे सुहागा. परंतु आम्ही या गंडोला सफारीचा आनंद घेऊ शकलो नाही.

आम्ही गुलमर्गमध्ये प्रवेश केला आणि स्नो फॉल व्हायला सुरवात झाली. आम्ही आणलेली मिनी बस आता पार्क करण्यात आली होती. याच्या पुढचा प्रवास सोनमर्ग प्रमाणे स्पेशल चेनवाल्या गाडीने करावा लागणार होता. तेथे हजर असणारे गाडीवाले भरमसाट दर सांगत होते. आम्ही आमच्या गाडीतून उतरून चौकशी केली तेव्हा समजले की, गंडोल्यापर्यंत कोणालाच जाऊन देत नाहित. तेव्हा आम्ही सगळयांनी निर्णय घेतला येथील लोकल गाडीवाल्यांच्या थापांना बळी न पडता येथेच मोकळया जागेत स्नो फॉलचा आनंद घ्यायचा.

सिनेमातला स्नो फॉल बघणे आणि त्याचा प्रत्यक्ष अनुभव घेणे यात खूपच अंतर आहे. येथे बर्फात मनसोक्त खेळून त्याचे व्हीडीओ करून झाल्यावर तेथे जवळच असणाऱ्या हॉटेलात पोटपूजा करून घेतली. गरमा गरम कांदाभजी, त्यासोबत गरमा गरम चहा आणि बरोबर घरून आणलेल्या पदार्थांनी पोटभरून घेतले. त्या हॉटेलात असलेल्या फायर प्लेस जवळ बसून बर्फात खेळून आखडलेले हात शेकून घेतले. त्या हॉटेलच्या परिसरांतच एक काश्मिरी कपड्यांचे दुकान होते.

महिलांनी तेथे काही खरेदी केली. तेथे असलेल्या निरनिराळया प्रकारच्या टोप्या घालुन फोटो काढले.

दुपारी तिनच्या सुमारास परत श्रीनगर शहरांत आलो. सर्वप्रथम आम्ही निशाद गार्डनला भेट दिली. निशात गार्डननंतर आम्ही शालिमार गार्डनला भेट दिली. या बागेला पौराणिक संदर्भदेखिल आहे. सध्याच्या इतिहासानुसार शालिमार गार्डनच्या विस्तारिकरणाचे आणि मोगल गार्डनच्या सध्याच्या स्वरुपामध्ये ही बाग परिवर्तित करण्याचे श्रेय मुगल बादशहा जहांगिर याच्याकडे जाते. परंतु प्राचिन इतिहास पाहिला तर दुसऱ्या शतकात ज्या प्रवरसेन द्वितिय याने श्रीनगर शहर वसविले त्यानेच या बागेचे निर्माण केले असावे असा संदर्भ मिळतो.

प्रवरसेन राजाने दाल सरोवराच्या दक्षिण पूर्व कोपऱ्यात एक झोपडीवजा घर उभारले होते. त्या घराचे नाव त्याने शालिमार असे ठेवले. संस्कृतमध्ये शालिमार या शब्दाचा अर्थ प्रेम निवास अथवा प्रीती घर असा होतो. जेव्हा प्रवरसेन राजा त्यावेळचे संत सुकर्मास्वामी यांना भेटायला येत असे तेव्हा तो या झोपडीत रहात असे. कालांतराने ती झोपडी राहिली नाही परंतु शालिमार हे या जागेचे नांव कायम राहिले.

शालिमार गार्डन नंतर आम्ही चश्म ए शाही गार्डन बघायला गेलो. या बागेत जाण्याकरीता ५०-६० पायऱ्या चढून जावे लागते. बागेमधून दाल सरोवराचे आणि परिसराचे दृष्य विलोभनिय दिसते.



या जागेचा शोध घेण्याचे श्रेय काश्मिरमधील काश्मिरी पंडितांच्या कुळातिल महिला संत रुपा भवान यांच्याकडे जाते. रुपा भवानी यांच्या कुटूंबाचे आडनाव साहिब असे होते. त्यावरून या झऱ्याला चश्मे साहिब असे संबोधले जायचे. काही कालानंतर त्याचा अपभ्रंश होऊन त्याला चश्मेशाही अथवा चश्म ए शाही या नांवाने ओळखले जायला लागले. कालांतराने मोगल शासकांनी त्याचा मुगल गार्डन स्वरुपात विस्तार केला.

सध्या या गार्डनमध्ये जाण्याकरीता सिमा सुरक्षा दलाच्या क़डक पहाऱ्यातून जावे लागते. सुरक्षा चौकीच्या गेटमधून आधी आमची रिकामी गाडी पुढे गेली. नंतर आम्ही सर्वजण मेटल डिटेक्टर सारख्या मशिनमधून पलिकडे गेलो. तेथिल सुरक्षा जवानांनी आमची आस्थेन चौकशी केली. विशेष म्हणजे चौकशी करणारा जवान मराठी बोलणारा होता.

चश्म ए शाही बागेला भेट दिल्यानंतर आम्ही श्रीनगरचे वैभव मानल्या गेलेल्या तुलिप गार्डनला भेट द्यायला गेलो. हे गार्डन श्रीमति इंदिरा गांधी यांच्या स्मृतीप्रित्यर्थ निर्माण करण्यांत आले आहे. हे आशिया खंडातिल सर्वात मोठे तुलिप गार्डन आहे. १२ हेक्टर एवढ्या प्रचंड जागेत निर्माण करण्यांत आलेले हे गार्डन पहाणे म्हणजे डोळ्यांना मेजवानीच आहे. निरनिराळया रंगाच्या तुलिप फुलाचे हे गार्डन आखिव रेखिव आहे. या ठिकाणीदेखिल अनेक फोटो काढले व्हीडीओ केला. श्रीनगरमध्ये आल्याचे सार्थक झाले असा भाव हे गार्डन पाहून मनात आले.

तुलिप गार्डन एवढे भव्य होते की, ते बघता बघता वेळ कसा निघुन गेला ते कळलेच नाही. त्यामुळे आमची बघायची अनेक ठिकाणे मिस झाली. शंकराचार्य मंदिर तरी बघायला पाहिजे होते कारण शंकराचार्यांचे मंदिर कुठे असलेले ऐकले नव्हते. आज आमचा श्रीनगरचा शेवटचा मुक्काम होता त्यामुळे इलाज नव्हता.

संध्याकाळी हाऊस बोटीवर आलो तेव्हा एक धक्कादायक बातमी समजली. बडोदा येथील एक फॅमिली फारुकभाईंच्या बहिणीच्या हाऊसबोटवर उतरली होती. ते एकूण तिघेजण स्वत:ची कार घेऊन आले होते. गाडी ते स्वत: चालवत होते. आज ते फारुकभाई यांच्या भाच्याला रस्ता दाखवायला घेऊन सोनमर्ग येथे गेले होते. सोनमर्ग येथे ती कार बर्फावरून स्लिप होऊन खोल दरीत कोसळली होती. गाडी चालवणारा तो गेस्ट जिवंत होता परंतु त्याच्या शरिराची इतकी मोडतोड झाली होती की, त्याला अतिदक्षता विभागात दाखल होते. त्याची पत्नीदेखिल गंभिर जखमी होती. फक्त त्याचा मुलगा आणि फारुकभाई यांचा भाचा सही सलामत होते. या घटनेमुळे फारुक भाई तिकडे हॉस्पिटलमध्ये गेले होते.

आज आठवले यांचा वाढदिवस होता त्यानिमित्ताने सकाळी त्यांना औक्षण करून झाले होते. आता संध्याकाळी कापण्यासाठी केक आला होता. परंतु घडलेल्या प्रसंगाचे त्यावर सावट आले होते. रात्री जेवण्यापूर्वी केक कापण्याचा कार्यक्रम झाला. जेवणात स्विटदेखिल केले होते. रात्री आम्ही झोपेपर्यंत फारुकभाई हॉस्पिटलमधून आले नव्हते. वास्तविक आज आठवले यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने ते हाऊसबोटला लाईटिंग करणार होते. स्वत: गिटार वाजवून बर्थ डे गीत गाणार होते. परंतु तो योग नव्हता.

दिवस आठवा

पहलगाम दर्शन

आज दिनांक २१ मार्च २०१६! आता थोड्याच वेळात ही हाऊसबोट सोडायची होती. काल रात्री उशिरा फारुकभाई हॉस्पिटलमधून आले होते. त्या गुजराथी माणसाच्या जिवाला असलेला धोका टळला होता. परंतु तो स्वत:च्या पायावर ऊभा रहाण्याची शक्यता कमी होती. याचा अर्थ एकच अनोळखी प्रांतात भलतेच साहस करण्याच्या भरीस पडू नये. बर्फातून गाड्या चालवण्याचा सराव असणाऱ्या आणि सुरक्षेसाठी गाडीच्या चाकांना लोखंडी साखळीचा बेल्ट लावलेल्या गाडीमधून प्रवास करण्याची सक्ती ही पर्यटकांच्या सुरक्षेसाठीच होती हे आता मनात पक्के झाले. आमच्याकडेदेखिल हरिहरेश्वर येथे येणारे पर्यटक असेच वेडे धाडस करून समुद्रात उतरतात आणि आपल्या जिवाला मुकतात. त्यानंतर बोंबाबोंब मात्र शासनाच्या नावाने करतात. पर्यटनाचा आनंद घ्यावा परंतु आपल्या बरोबर सगळयांचाच जीव धोक्यात घालू नये.

चहा नाश्ता करून फारुकभाईंचा सर्व हिशेब करून आम्ही शागु पॅलेस सोडला. जाताना फारुकभाईंच्या फॅमिलीला काही गिफ्ट दिले, कारण गेले तिन चार दिवस त्यांनी आमच्यासाठी चांगली व्यवस्था ठेवली होती. सर्वांच्या बॅगा परत शिकाऱ्यामध्ये ठेवण्यात आल्या. जाता जाताच लेकला मोठी प्रदक्षिणा घालुन रस्त्यावर आलो. शिकारेवालेदेखिल टीप द्या म्हणून पाठिशी लागले होते. त्यांना टिप देऊन झाल्यावर त्यांनीच रस्त्यावर हजर असलेल्या आमच्या बसमध्ये आमचे सामान चढवून दिले. आम्हाला निरोप देण्यासाठी रस्त्यावर फारुकभाई आले होते. आम्ही गब्बुला वाटेत सफरचंदाची बाग आणि केशराची शेती दाखवायला सांगितली. काश्मिरमध्ये येऊन सफरचंदाची बाग आणि केशराची शेतं पाहिली नाहित तर काश्मिर दर्शन पूर्णच होणार नाही. साधारण दहाच्या सुमारास आम्ही श्रीनगर सोडले.

श्रीनगरपासून साधारण सोळ सतरा किलोमिटर आल्यावर पॅंपोर हे केशराकरीता प्रसिद्ध असणारे गांव आले. येथे रस्त्याच्या कडेला केशराचीच शेते होती. सध्या केशराला फुले वगैरे येण्याचा हंगाम नसल्यामुळे केशराची शेती म्हणजे गवताने भरलेले माळरान भासत होते.

केशराच्या झुडुपांना छान निळी फुले आलेली असली की, ते एक विलोभनिय दृष्य असते. परंतु ते आता शक्य नव्हते. फक्त केशराची शेती पाहिली असे सांगता येईल एवढा अनुभव घेतला.

पँपोरनंतर दहा बारा किलोमिटर गेल्यावर अवंतीपुर हे शहरवजा गांव लागले. येथे काश्मिरमधील दोन प्रसिद्ध मंदिरे आहेत. त्यातले अवंती स्वामी मंदिर पहलगावच्या रस्त्यावरच आहे. हे मंदिर भारत सरकारच्या पुरातत्व खात्याने संरक्षित स्मारक म्हणून जाहिर केले आहे. मंदिर पहाण्यासाठी आम्ही गाडीतून खाली उतरलो. समोर भग्नावस्तेतिल मंदिर होते. त्याचे अवशेष इतस्तत: विखुरलेल्या अवस्थेत होते. भग्नावस्तेतिल हे मंदिर पाहून मन विषण्ण झाले.

भगवान विष्णूंचे हे मंदिर नवव्या शतकातिल आहे. हे मंदिर इसविसन पूर्व ८५३ ते ८८८ या काळात या राज्याचा शासक असणाऱ्या अवंती वर्मन या राजाने बांधले होते. हे मंदिर, अवंतीपूर येथेच जिर्णोद्धार केलेले अवतेश्वर(शिव) मंदिर आणि काश्मिरमध्येच असणारे मार्तंड(सूर्य) मंदिर ही तिनही मंदिरे ग्रीक स्थापत्य शैलीतिल आहेत. या उद्धवस्त असणाऱ्या अवंती स्वामी मंदिराचे अवशेषांवरील कोरीव काम पाहून त्यावेळच्या स्थापत्यकलेच्या भव्यतेची कल्पना येते.

पहलगामच्या दिशेने जाताना रस्त्याच्या दोन्ही बाजुला सफरचंदाच्या बागा होत्या. आपल्याकडे कोंकणात आंब्याच्या बागा असतात तशाच पद्धतिच्या त्या बागा मला वाटल्या. सध्या पाऊस, स्नो फॉल आणि पानगळीचा ऋतु चालू असल्यामुळे सफरचंदाची झाडे म्हणजे खराटे झालेले होते. नुकतिच झाडांना पालवी यायला सुरवात झाली होती. अपवाद म्हणून एक दोन

झाडांवर हिरवी सफरचंदे पहायला मिळाली. बागा मात्र मोठ्या मोठ्या होत्या. आपल्याकडे कोंकणात माझी पांचशे कलमांची, हजार कलमांची आंब्याची बाग आहे असे म्हणतात, तसे इथे पाचशे हजार झाडांची सफरचंदाची बाग आहे असे म्हणत असावेत.

उध्वस्थ अवंतीस्वामी मंदिर, श्रीनगर

दुपारी दोनच्या सुमारास आम्ही पहलगामला पोचलो. पहलगाम येथील मुख्य आकर्षण होते फ्लॉवर व्हॅली. त्याकरीता घोडेस्वारी करणे आवश्यक होते. पहलगाम हे अनंतनाग जिल्ह्यातिल एक शहर आहे. हे शहर लिड्डर नदीच्या किनाऱ्यावर वसले आहे. हे पर्यटकांचे अत्यंत आवडते ठिकाण आहे. या शहराची समुद्र सपाटीपासूनची उंची ७२०० फुट आहे. येथे अनेक सिनेमांचे चित्रिकरण झाले आहे. दरवर्षी अमरनाथ यात्रेला जाणारे लोक प्रथम येथे येतात. येथुन पुढे अमरनाथ लिंगापर्यंत घोड्यावरून अथवा पायी जावे लागते. येथील मुख्य व्यवसाय पर्यटन हाच असावा. कारण हा सर्व पहाडी भाग आहे. किंबहूना सर्व काश्मिर खोरेच पर्यटन व्यवसायावर अवलंबून आहे.

पहेलगाम येथे आमच्या स्वागताला तेथिल आमचे बुकींग असलेल्या हॉटेलचे मालक गफुरभाई हजर होते. त्यांच्या सल्यानुसार आम्ही आधी हॉटेलवर न जाता साईट सीइंग करून जायचे ठरवले. त्यांच्याच मध्यस्थिने घोडे ठरवले.

पहलगाम येथील घोडेस्वारी हा एक वेगळाच अनुभव होता. येथे एक घोडेवाला दोन दोन घोडे मॅनेज करत होता. घोडेस्वारीची वाट अतिशय अवघड होती. कालच भरपुर पाऊस आणि बर्फ पडला होता त्यामुळे डोंगरात सर्वत्र त्या वितळलेल्या बर्फाचे झरे वहात होते. त्या वाहत्या पाण्यांतून दगड, गोटे, चिखल यातून वाट काढीत घोडे आपला मार्ग आक्रमत होते. अतिशय तिव्र चढण आणि उतरण असलेला हा रस्ता होता. अशा प्रकारच्या वाटेला आपल्याकडे ढोरवाट म्हणतात. आमचे घोडे त्यातूनच आमचे ओझे घेऊन जात होते कमाल त्या घोड्यांची आणि घोडेवाल्यांची. घोडेवाले आमच्याबरोबर पायी चालत त्या दगडाळ सरपटणाऱ्या रस्त्याने चालत होते. घोडेवाले जसे अगदी वृद्ध होते तसेच पोरगेलेदेखिल होते. तरुण मात्र फार कमी होते.

घोडेवाल्यांनी आम्हाला कारगिल पॉईंट, पहलगाम लिड्डुर रिव्हर पॉईंट, चंदनवारी, आरु व्हॅली, शिकार पॉईंट एवढे पॉईंट दाखवले. हवामान स्वच्छ असल्यास या ठिकाणाहून श्रीनगर परिसर दिसतो असे एका पॉईंटवर आम्हाला त्यांनी सांगितले. कारगिल पॉईंटवरून ज्या ठिकाणी कारगिल युद्ध झाले ते शिखर दिसत होते. दुसऱ्या एका पॉईंटवरून लिड्डुर नदीचे विहंगम दृष्य दिसत होते.

पूर्ण चढण चढून गेल्यावर एक छान पठार होते. मस्त हिरवळीला चिनार, पाईन, देवदार या वृक्षांच्या गर्द झाडीची कुंपण घातल्यासारखी भिंतच होती. त्या पार्श्वभूमिवर जमिनीवर सगळीकडे बर्फच बर्फ पसला होता. थोडे उंचवटे सोडून सर्व जमिन बर्फाने झाकलेली होती. उन्हाच्या कवडशांनी बर्फ सोन्यासारखा चकाकत होता. या पठाराला बैसरन(Baisaran) पठार असे म्हणतात. या बैसरन पठारावरील बर्फावरून फिरायला खूपच मजा येत होती. हे पठार खूपच मोठे असल्याने तेथे असलेली गर्दी जाणवत नव्हती. या पठारावर एक झाड होते त्या झाडाला

दिड दोन फुटांवर एक फांदी फुटून ती दोन झाडे झाल्यासारखी दिसत होती. खाली असलेल्या बर्फाच्या पार्श्वभूमीवर त्या बेचकीत उभे राहून फोटो खूपच छान येत होत. त्यामुळे त्या पॉईंटवर बरेच फोटो काढून झाले.

आतापर्यंत कुठे बघण्यात न आलेला एक गेम तिथे पहायला मिळाला. चेंडूच्या आकाराच्या एका मोठ्या फुग्यामध्ये गॅस भरून त्यात दोन माणसांना बसवून ते फुगे उतारावरून सोडून दिले जात होते. या गेमला झोर्बिंग असे म्हणतात. बैसरन पठारावर बराच वेळ घालवून त्यानंतर तिथेच असलेल्या टपरीवजा हॉटेलमध्ये पोटपूजा केली. त्यानंतर आमचा पहेलगामकडे परतिचा प्रवास सुरु झाला.

पहलगामकडे परत जाताना सर्व प्रवास तिव्र उताराचा होता. त्यामुळे तोल सावरणे कठीण जात होते. एकाबाजुला अतिशय खोल दरी त्यातच दगड, गोटे राडा, रोडा याने भरलेली अति चिंचोळी वाट यामुळे अक्षरश: जीव मुठीत नाही तर घोड्याच्या लगामात धरून आम्ही जात होतो. घोड्यावर एकाबाजुलाच वजन पडणार नाही याची दक्षता घेत आमची घोडेस्वारी चालू होती. अखेर एकदाचा आमचा घोड्यावरचा प्रवास संपला आणि आम्ही आमची गाडी जेथे पार्क केली होती तेथे आलो.

संध्याकाळी सहा वाजता आम्ही हॉटेलवर पोचलो. हे हॉटेल आमच्या पूर्ण सहलीच्या मुक्कामाच्या ठिकाणांचा विचार करता एक नंबरचे हॉटेल होते. रुमच्या खिडकीतून बाहेरील निसर्ग सौंदर्य खूपच छान दिसत होते. रुमचे इंटीरिअरही खूप चांगले होते. बेडवर पातळ गादी होईल एवढ्या जाडीची रजई, शिवाय रग आणि इलेक्ट्रीक हिटींग रगदेखिल होता. अर्थात आताचे तापमानदेखिल तिन अंश सेल्सिएस होते.

आजच्या घोडेस्वारीने अंगाचा खुर्दा झाला होता त्यामुळे कढत कढत पाण्याने आंघोळी केल्या. सकाळपासून फारसे खाणे झाले नसल्याने आणि वातावरणाचा परिणाम म्हणून असेल् कडकडून भूक लागली होती. त्यामुळे बरोबर आणलेल्या पदार्थांचा नाश्ता केला. नाश्ता झाल्यावर येथे जवळच मामलेश्वराचे मंदिर आहे असे समजले. तेथे दर्शनाला जाण्याकरीता म्हणून निघालो तो अचानक सगळीकडचे लाईट गेले आणि पूर्ण काळोख झाला. त्यामुळे अनोळखी प्रदेशात उगाच भटकण्यापेक्षा परत हॉटेलात परत आलो. एकूणच श्रीनगरच्या परिसरात असताना देवदर्शनाचा योग काही आला नाही.

श्री मामलेश्वर मंदिर, पहेलगाम

वास्तविक मामलेश्वराचे मंदिर आमच्या हॉटेलपासून अगदी जवळ होते परंतु नेमकी जागा दाखवणारा कोणी नसल्यामुळे आम्हाला देवळात जाता आले नव्हते. त्या मामलेश्वराच्या मनांत आम्हाला दर्शन द्यायचे नव्हते. हॉटेलात आल्यावर या मंदिराची माहिती मिळाली ती फार महत्वाची होती. या मंदिराला पौराणिक संदर्भ आहे. हे मंदिर इसवीसन पूर्व ४०० वर्षांपूर्वीचे असण्याची शक्यता आहे. पार्वतीने आपल्या मळापासून बनविलेल्या गणपतिला स्नानाला जाताना द्वारपाल म्हणून बसविले. त्यावेळी त्याने प्रत्यक्ष शंकारांना अडविले होते तो प्रसंग येथे घडला असे

म्हणतात. “मा मल” याचा अर्थ जाऊ नका असा होतो. म्हणून या महादेवाचे नांव मामलेश्वर असे पडले.

हॉटेलात परत आल्यावर तासाभराने लाईट आले त्याकाळात बेडवर पडुन रहाणेच पसंत केले. कारण घोडेस्वारीचे परिणाम जाणवायला लागले होते. लाईट आल्यावर नऊच्या सुमारास सर्वांनी एकत्र डायनिंग हॉलमध्ये जेवण केले आणि जास्त टाईमपास न करता लगेचच झोपायला गेलो. उद्या जम्मुला जायचे होते. येतानाचा श्रीनगर जम्मु हायवेचा अनुभव चांगला नव्हता त्यामुळे प्रवासाला किती वेळ लागेल याचा भरवसा नव्हता. सावधगीरी म्हणून उद्या पहाटे पांच वाजताच मार्गाला लागायचे असे ठरवले होते.


तेथे कर माझे जुळती
प्रवास वर्णन
पानिपत
युध्द
स्मारक

दुसऱ्या भागाची प्रस्तावना

तेथे कर माझे जुळती या माझ्या प्रवास वर्णनात्मक पुस्तकाचा दुसरा भाग वाचकांच्या समोर सादर करताना मला अतिशय आनंद होत आहे.

या भागाला तेथे कर माझे जुळती हे नांव देण्याचे कारण आहे, या प्रवासाच्या टप्प्यात आम्ही जास्तीत जास्त शहिदांच्या, शूरवीरांच्या, स्वातंत्र्याकरीता प्राण अर्पण करणाऱ्या देशभक्तांच्या वीरभूमीला भेट दिली होती. त्यातले पहिलेच ठिकाण होते पंचफुला येथील शहिद भगत सिंगांचेकाका सरदार अजित सिंह यांचे स्मारक. त्यानंतर नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्याशी संबधित ठिकाण, सुभाश बोहली, त्यानंतर गोरखा रेजिमेंटने बांधलेले भगसु नाग मंदिर, त्यानंतर भेट दिली ती बाघा बॉर्डर, जालियनवाला बाग, कुरुक्षेत्र, आणि शेवटी पानिपत ही सर्व स्थळे युध्द क्षेत्र आहेत अथवा त्याच्याशि संबंधित आहेत.

हा माझा प्रयत्न आपल्यला आवडल्यास मला अवश्य कळवावा. आपला अभिप्राय मला लिहिण्याचा नवा उत्साह देईल.

श्रीवर्धन अनिल अनंत वाकणकर.

दिवस नववा

पहलगावपासून जम्मु पर्यंत

आज २२ मार्च २०१६! पहाटे ठिक पाच वाजुन दहा मिनिटांनी सर्वजण बसपाशी उभे होतो. काल अगदी जरुरी पुरते सामान गाडीतून उतरवले होते. त्यामुळे सामान चढवण्याचा प्रश्नच नव्हता. गब्बुने गाडीचे इंजिन चालू केले होते. तापमान शून्य अंशापेक्षा कमी असावे कारण गाडीच्या काचेवर बर्फ साचला होता. १५-२० मिनिटे इंजिन गरम झाल्यावर प्रवासाला सुरवात झाली. वातावरण अतिशय थंड असल्याने रस्त्यावर वाहनांची गर्दी नव्हती. त्यामुळे श्रीनगर जम्मु हायवे येईपर्यंत विना अडथळा प्रवास झाला. हायवे सुरु झाल्यावर मात्र गाडी दर दहा मिनिटांनी थांबत होती. वाहतूकीचे नियंत्रण सिमा सुरक्षा दलाचे जवान करीत होते. त्यामुळे प्रवास धिमा असला तरी चालू होता. कोणतेही वाहन मधे घुसत नव्हते.

रामबन गेल्यावर श्रीनगरला येताना जिथे जेवण केले होते त्याच्या जवळपासच्या एका वैष्णो धाब्यावर मागच्यासारखाच राजमा राईस आणि राजम रोटीची ऑर्डर दिली परंतु आज चव मात्र पूर्वीसारखी नव्हती. त्या हॉटेलच्या मागच्या बाजुला एक धरण दिसत होते. त्या धरणाचे दृष्य मात्र मनमोहक होते.

जाताना पावसामुळे रहित झालेल्या पटणी टॉप येथील नाग मंदिरात आज गेलो. हे नाग मंदिर क्रिमची येथे मंतालाई जवळ आहे. येथे शंकर भगवान आणि माता पार्वती यांचा विवाह झाला होता असे मानले जाते. पटणी टॉप येथील हे सर्वात जुने मंदिर आहे. पटणी टॉप येथील सर्वांत उंच टेकडीवर असलेले हे मंदिर ६०० वर्षे जुने आहे. नाग पंचमीच्या दिवशी येथे हजारो भक्त दर्शनाला येतात.

पटणी टॉपनंतर मात्र प्रवास विना अडथळा आणि पूर्ण वेगात सुरु झाला. जम्मुमध्ये प्रवेश करण्यापूर्वी तावी नदीचे दर्शन झाले. या नदीच्या नांवावरूनच जम्मु शहराचे नांव जम्मु तावी असे पडले आहे.



जम्मु शहराचे नांव जिच्यावरुन पडले त्या तावी नदीचे दृष्य

जम्मुमध्ये पोचायला रात्रीचे आठ वाजले. जम्मुमध्ये आम्ही हॉटेल इंटरनॅशनलमध्ये उतरलो होतो. हॉटेल ए.सी. होते परंतु रिनोव्हेशनचे काम चालू असल्याने आकर्षक वाटत नव्हते. रुम मात्र प्रशस्त होत्या. हॉटेलपासून रेल्वे स्टेशन आणि रघुनाथ मंदिर जवळच होते. आता शहरात आल्या मुळे की काय उकाडा खूपच जाणवत होता.

हॉटेलमध्ये चेकइन करून, फ्रेश व्हायला पावणे दहा वाजले होते. जेवण्याकरीता वैष्णोधाबा शोधून काढी पर्यंत त्या धाब्याची बंद करण्याची वेळ झाली होती. त्या हॉटेल वाल्याला रिक्वेस्ट करून दहा माणसांची जेवणाची सोय करायला सांगितली. जेवण झाल्यावर जवळच असणाऱ्या रघुनाथ मंदिरापर्यंत चक्कर मारून आलो. झोपेपर्यंत अकरा साडे अकरा वाजले होते. काश्मिरमध्ये दाखल झाल्यापासून आज पहिल्यांदा रात्रभर पंखा लाऊन झोपलो. आता उद्या जरा निवांत होते. थोडे उशिरा उठले तर चालणार होते.

******

दिवस दहावा

जम्मु आणि डलहौसी दर्शन.

आज दिनांक २३ मार्च २०१६! आज होळी पोर्णिमा आहे. आज जर घरी असतो तर होळीच्या सणाची वेगळीच गडबड असती. घरच्या पुरणपोळीची चव होळीचा दिवस असूनही चाखता येणार नव्हती. इकडच्या लोकांना पुरणपोळी हा प्रकार माहित असेल असे वाटत नाही. इकडचा आलु पराठा म्हणजेच इकडची तिखट पुरणपोळी. आज बहूदा तिच खावी लागेल असे दिसते.

सकाळी साडेदहाला रघुनाथ मंदिरात आलो. संपूर्ण परिसर सिमा सुरक्षा दलाच्या तैनातिखाली होता. मंदिराच्या प्रवेशद्वारावर असलेले जवान मराठी होते. आम्ही मराठी बोलत होतो ते ऐकुन त्यांनी आमची आस्थेन चौकशी केली. मंदिराच्या परिसरात सर्वत्र सावधान पोझिशन मधेले हत्यारी जवान दिसत होते. मंदिरात प्रवेश केल्यावर समोरच मंदिराचे निर्माते(patron) राजे रणबिरसिंग यांचे पोर्ट्रेट होते.

जम्मु शहराच्या मध्यवर्ती भागात असणारे रघुनाथ मंदिर हे मुख्यत: रामाचे मंदिर आहे. मुख्य मंदिराचा गाभारा सोन्याच्या पत्र्याने मढविलेला आहे. गाभाऱ्यात श्रीराम, सिता, लक्ष्मण यांच्यासह एकूण सात मूर्ती आहेत. या मंदिराचा परिसर भव्य असून त्या परिसरात रामायणातिल सर्व व्यक्तिमत्वांची वेगवेगळी मंदिरे आहेत. तसेच संपूर्ण प्रदक्षिणा मार्गावर अनेक मंदिरे आहेत.

मंदिराच्या परिसरात बांधलेल्या हॉलमध्ये असंख्य शालिग्राम बसविले आहेत. त्यांना तेहतिस कोटी देवांच्या स्वरुपात पूजले जाते. मंदिरात प्रवेश करताना प्रथम हनुमानाचे दासमारुतीच्या स्वरुपातिल मूर्ती असलेले मंदिर आहे. या शिवाय एक स्वतंत्र गणपति मंदिर आहे. त्या मंदिरात पंचमुखी गणेशाच्या मूर्ती आहेत. या मंदिराच्या निर्मितीचे काम या राज्याचे महाराज गुलाबसिंग यांनी सन १८३५ मध्ये सुरु केले ते त्यांचे पुत्र महाराजा रणविर सिंग यांनी सन १८६० मध्ये पूर्ण केले.

आम्ही मंदिरात प्रवेश केला तेव्हा श्रीरामांच्या आरतीची सुरवात झालेली होती. आरती झाल्यावर आम्ही विधीपूर्वक दर्शन घेतले. तेथे असलेल्या पूजाऱ्यांकडे आम्ही रामरक्षा स्तोत्राचे

पठण करण्याची परवानगी विचारली. तेव्हा त्यांनी दर्शन घेणाऱ्यांना त्रास होणार नाही आणि आम्हालाही सहज दर्शन होईल अशी जागा आम्हाला बसण्यासाठी दाखवली.

त्यांनीच आम्हाला बसण्यासाठी गालिचादेखिल आणून दिला. मग त्या गालिचावर बसून आम्ही सर्वांनी रामरायाचे दर्शन घेत घेत रामरक्षा स्तोत्राचे संथ सुरात सामुदाईक पठण केले. त्यामुळे मनाला एक वेगळेच समाधान मिळाले. त्यानंतर पंचमुखी गणेश मंदिरातही असेच श्री गणपति अथर्वशिर्षाचे पठण केले. या पठनात तेथिल पूजारीही सामिल झाले. त्यानंतर सर्व परिवार देवतांचे दर्शन घेतले.

जामनगरहून प्रवासाला निघाल्यापासून जास्त रोकड जवळ बाळगायची नाही हे धोरण ठेवले होते. त्याप्रमाणे जसे जसे पैसे लागतिल तसे ए. टी. एम्.मधून काढत असे. आज आता जवळची रोकड संपली होती. त्यामुळे पैसे काढण्याकरीता रघुनाथ मंदिराच्या जवळ असणारे स्टेट बॅंकेचे ए. टी. एम्. शोधून काढले.

ए. टी. एम्.मधून येईपर्यंत बाकी सर्वजण गाडीत सामान भरून तयारच होते. मी आल्यावर लगेचच गाडी सोडण्यांत आली. यानंतर आम्ही जम्मुचा किल्ला पहायला गेलो. “बाहू”

या नावाने या किल्याचा ओळखले जाते. या किल्याचे बांधकाम “राजा बाहूलोचन” याने सुमारे तिन हजार वर्षांपूर्वी केले आहे. या किल्यावरून तावी नदीचे अद्‌भूत दृष्य दिसते. येथे काली मातेचे मंदिर आहे. मंदिराच्या परिसरात असलेल्या जंगलाचे सुंदर बगिचामध्ये रुपांतर करण्यात आलेले आहे. या बागेला बाहू बाग म्हणून ओळखले जाते.

पांढऱ्या संगमरवरात बांधलेले हे मंदिर आकाराने मात्र छोटे आहे. याची उंची केवळ ३.९ फुट आहे. त्यामुळे मंदिरात एकावेळी मोजकेच भक्त जाऊ शकतात. येथे रोज कुमारीकांची ओटी भरून पूजा केली जाते. हे मंदिर महाराजा गुलाबसिंग सत्तेत आल्यावर १८व्या शतकांत सन १८२२ मध्ये बांधले गेले असे मानले जाते. या संबंधी एक कथा सांगितली जाते. सुमारे ३०० वर्षापूर्वी “पंडित जगतराम” याच्या स्वप्नात माता महाकाली आली होती. तिने त्यांना सांगितले की, मी पिडींच्या(स्वयंभू) स्वरुपात डोंगराच्या माथ्यावर आलेली आहे. त्यानंतर लोकांना सध्या मंदिर आहे त्या ठिकाणी पिंडीच्या स्वरुपातिल देवी आढळून आली. काही काळाने त्या ठिकाणी

मंदिर बांधण्यात आले. सध्याच्या काळया पाषाणातिल मूर्तीची शिला अयोध्येच्या राजाकडून मिळाली होती.

मंदिर परिसरात आणखिही देवीच्या मूर्ती आहेत. मंदिराचा परिसर छान स्वच्छ होता. या ठिकाणचे एक वैशिष्ट म्हणजे येथे येणाऱ्या प्रत्येक भक्ताला अस्सल साजुक तुपातला शिरा आणि हरभऱ्याची उसळ प्रसाद म्हणून देण्यांत येतो. खास बाब म्हणजे ते पदार्थ वाटी आणि चमच्या सह दिले जात होते. प्रसाद ग्रहण करून झाल्यावर वाटी चमचा घासण्याकरीता लगेच सेवेकरी हजर असतात.

या किल्याच्या तटाच्या पार्श्वभूमीवर अनेक फोटो काढून झाले. किल्यातल्या गार्डनमध्येदेखिल फोटो काढले. अशा तऱ्हेने बाहू किल्ला पाहून झाल्यावर डलहौसीच्या दिशेने प्रवासाला सुरवात झाली. काही काळ प्रवास झाल्यावर जम्मु काश्मिरची बॉर्डर लागली. सिमेवरचा टोल क्रॉस करताच सगळयांची प्रिपेड सिम चालू झाली. त्यामुळे सर्वांनी भराभरा फोन लावायला सुरवात केली. माझा काही प्रश्न नव्हता कारण मी पोस्टपेड सिम बरोबर ठेवले होते.

आता आम्ही पंजाबमध्ये प्रवेश केला होता. दुपारचे दोन वाजुन गेले होते. सगळयांच्या पोटात कावळे काव काव करायला लागले होते. गब्बुला सांगितल्यावर त्याने एका पंजाबी धाब्यावर गाडी थांबवली. त्या हॉटेलमधील सरसोका साग आणि मकईकी रोटी हा स्पेशल मेनू होता. सगळयांनी तोच मेनू ऑर्डर केला. जेवण खरोखरच चविष्ट होते. भरपेट जेवण झाल्यावर परत पुढचा प्रवास सुरु झाला. आता आपण पंजाबमधून प्रवास करीत आहोत हे रस्त्याच्या दुतर्फा असणाऱ्या गव्हाच्या शेतांवरून जाणवत होते.

दुपारच्या तिन साडेतिनच्या सुमारास गब्बुने गाडी थांबवली आणि येथे एक खास शिवमंदिर आहे असे सांगितले. हे मंदिर म्हणजे हिमाचलमधील प्रसिद्ध त्रिलोकीनाथाचे म्हणजेच शंकराचे मंदिर होते. हे मंदिर राजा अजब सेन याची राणी सुलतान देवी हिने सन १५२०मध्ये बांधले. या गावाचे नांव मंडी असे आहे. बयास नदीच्या किनाऱ्याला असणाऱ्या गुंफेत हे मंदिर आहे. गुंफेच्या छतामधून सतत पाणी ठिपकत होते. जणू तेथे भगवान शंकराला संतत धारेच्या स्वरुपात अभिषेकच करीत होते.

हे मंदिर मंडी गावातिल व्हिक्टोरीया पुलाच्या अगदी बाजुला आहे. येथे भक्तांची खूपच गर्दी दिसत होती. बयास नदिच्या पात्रातही एक छोटे मंदिर दिसत होते. या ठिकाणचा निसर्गही समृद्ध आहे. हिरव्यागार वनराईमध्ये नदीच्या पात्राच्या अगदी बाजुला असल्याने या ठिकाणाचे

आकर्षण जास्त होते. या तिर्थक्षेत्राचा विकास हिमाचल प्रदेश पर्यटन विभागा तर्फे केला गेला आहे. तिथेच असलेल्या एका धाब्यावर चहापाणी करून पुढच्या प्रवासाला सुरवात केली.



थोड्याच वेळात आम्ही डलहौसीच्या परिसरात पोचलो. डलहौसीची घाटी चढायला सुरवात केल्यावर रस्त्याच्या दुतर्फा अनेक प्रकारची झाडे होती. परंतु त्यात लक्ष वेधून घेत होते ते लालफुलांचे वृक्ष. या झाडांवर जास्वंदी सारखी फुले आलेली होती. जंगलाचा मोठा भाग या झाडांनी व्यापला होता. त्या झाडांच्या फुलांमुळे सर्वत्र लाल रंग भरून राहिला होता. नंतर चौकशी केली तेव्हा त्या फुलांच्या झाडाचे नांव “बुऱ्हान” आहे असे समजले. या जातीच्या झाडांना लाल, पांढरी आणि गुलाबी अशी तिन प्रकारची फुले येतात. या फुलांचे सरबत, चटणी आणि जाम असे पदार्थ केले जातात. हिमाचल प्रदेश खादी ग्रामोद्योग मंडळा तर्फे या वस्तुंचे उत्पादन आणि विक्री केली जाते.

आता आम्ही डलहौसी शहरात प्रवेश केला होता. डलहौसी हे शहर सन १८५४मध्ये ब्रिटीश सरकारने आपल्या कर्मचाऱ्यांना उन्हाळ्याची सुट्टी घालविण्याकरीता निर्माण केले होते.

या शहराचे नांव लॉर्ड डलहौसी या भारतातिल त्यावेळच्या ब्रिटिश गव्हर्नरच्या नांवावरून दिले होते. हे धौलाधार पर्वतावरील पांच टेकड्यांवर वसविले गेले आहे. या शहराची समुद्र सपाटीपासूनची उंची ६००० ते ९००० फुटां दरम्यान आहे.

आता संध्याकाळ झाली होती. आम्ही डलहौसी येथील प्रसिद्ध खज्जर लेक या ठिकाणाला भेट दिली. मोठे हिरवळ असलेले मैदान, आजुबाजुला घनदाट झाडी, एक छोटा तलाव हे येथील निसर्ग वैभव आहे. घोडेवाले, फोटोग्राफर आपापला धंदा व्हावा म्हणून पाठिशी लागले होते. होळीच्या निमित्ताने सलग चार पाच दिवस सुटी असल्याने भरपुर गर्दी होती. सशांची छोटी छोटी पिल्ले एका उभट टोपलीत घेऊन काही माणसे तेथे हजर होती. लोक त्या सशाची पिल्ले असणाऱ्या टोपल्या हातात घेऊन फोटो काढत होते. एक फोटोकरीता ती टोपली वापरण्याचे दहा रुपये ती माणसे घेत होती.

खज्जर येथील निसर्ग सौंदर्याचा आनंद घेऊन झाल्यावर वाटेत एका टेकडीवर देवीचे मंदिर होते ते पहाण्यासाठी गब्बुने गाडी थांबवली. आम्ही चढण चढायला सुरवात केली तेव्हा दिवस मावळायला सुरवात झाली होती. सुमारे १५-२० मिनिटे चालल्यावर आम्हाला देवीचे दर्शन घेऊन येणारे काही भक्त भेटले, ते म्हणाले आता थोड्याच वेळात काळोख होईल तुम्हाला पुढे जाणे मुश्किल होईल. तरीही आम्हा मोबाईलच्या बॅटरीच्या प्रकाशात पुढे जाणे चालूच ठेवले. तेवढ्यांत वरून भक्तांचा दुसरा ग्रुप आला. त्यामध्ये देवीच्या मंदिराचे पूजारीबाबाही होते. त्यांनी

आम्हाला सांगितले, आता वरती जाण्यात काही अर्थ नाही. देवीच्या मंदिराच्या परिसरात रानटी श्वापदांचा वावर असतो म्हणून मी मंदिर बंद करून आलो आहे. तेव्हा देवीच्या दर्शनाचा योग नाही असे समजुन आम्ही परत फिरलो. तरीही या ठिकाणी आल्याची आठवण म्हणून काही फोटो काढले.

आता रात्र झाली होती. मुक्कामाच्या ठिकाणी जायची वेळ झाली होती. आमच्या बुकिंगमध्ये काहीतरी गडबड झाली होती. त्यामुले गब्बुची गेस्ट हाऊस शोधायची धावपळ सुरु होती. आज डलहौसीमध्ये प्रचंड गर्दी होती. त्यामुळे वाहने पार्किंग करण्याकरीता जागादेखिल मिळत नव्हती. बऱ्याच प्रयत्नानंतर आम्हाला हव्या तशा पांच रुम एकाच ठिकाणी मिळाल्या. डलहौसी हे हिलस्टेशन असल्याने गेस्ट हाऊसदेखिल टेकडी टेकडीवर होती. आम्हाला मिळालेले गेस्ट हाऊस असेच उंच टेकडीवर होते. तिथे गाडी जाऊ शकत नव्हती. त्यामुळे अत्यावश्यक सामान बरोबर घेऊन गेस्ट हाऊसमध्ये दाखल झालो. महाबळेश्वर, माथेरान ही हिलस्टेशन जवळ असूनही कधी तिथे जाणे झाले नव्हते ते आता हिमाचलमध्ये शक्य झाले. रुम छानच होत्या. आज हवामानही खूपच थंड होते. परंतु आल्हाद दायक होते.

आता उद्या डलहौसी दर्शनाचाच कार्यक्रम होता त्यामुले सकाळी लवकर उठण्याची घाई नव्हती.

****

दिवस अकरावा

डलहौसी दर्शन

आज दिनांक २४ मार्च २०१६! आमच्या सहलीचा ११वा दिवस! डलहौसी येथे बघण्यासाठी बरेच पॉईंट आहेत. त्यामुळे आज आम्ही आमचा पूर्ण दिवस येथेच घालवणार आहोत. सकाळचे प्रातर्विधी आणि चहापाणी झाल्यावर हॉटेलवर आणलेले सामान गाडीत चढवून हॉटेलमधून चेक आऊट केले.

सर्वात प्रथम आम्ही पंचफुला येथे दाखल झालो. पंचफुला येथे छान धबधबा आहे. तो पाहून मला शिवथर घळीची आठवण झाली. शिरथर घळी येवढ्या उंचीवरून हा धबधबा पडत नव्हता तरीही स्पॉट खूपच छान होता. जवळच दोरीच्या सहाय्याने तयार केलेला पुल होता. धबधब्याचे पडणारे पाणी शेवटी एका विशाल तलावात जाते त्या ठिकाणी बोटींगची सोय आहे. त्या तलावाच्या काठावर परम देशभक्त सरदार अजीत सिंह यांचे स्मारक आहे. त्यांचा पुतळा येथे उभा केलेला आहे. हे अजित सिंग म्हणजे शहिद भगत सिंग यांचे काका होते. या ठिकाणी एक माणूस ससे घेऊन बसला होता. आश्चर्याची गोष्ट म्हणजे तिथे असलेले ससे शांत बसले होते.

पंचफुला येथील निसर्ग सौंदर्याचा आनंद घेतल्यानंतर आम्ही जवळच असलेल्या सातधारा या प्रसिध्द स्थळी आलो. समुद्रसपाटीपासून २०३६ मिटर उंचीवर असलेल्या या ठिकाणी सात झरे छोट्याशा धबधब्याच्या स्वरुपात पडतात. या सातधारांच्या पाण्यात औषधी गुण आहेत असा लोकांचा विश्वास आहे. या पाण्यात गंधकाचा अंश असल्याने त्वचा रोग तर बरे होणारच. येथील निसर्ग सौंदर्याचा आस्वाद घेण्याकरीता तर लोक येथे येतातच शिवाय हे सात अप्सरांचे किंवा देवीचे स्थान आहे असाही लोकांचा समज आहे. आपल्याकडे कोंकणातही अशी सात आसरांची अशी बरीच स्थाने आहेत.

सातधारानंतर आम्ही सुभाष बोहली या पवित्र स्थळाला भेट दिली. आपल्या देशाच्या स्वातंत्र्य संग्रामात महत्वाची भूमिका बजावणाऱ्या नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्याशी निगडीत असे हे स्थळ आहे. सन १९३७मध्ये इंग्रजांच्या कैदेत असताना नेताजींना टी.बी. झाला होता. त्यावेळी उपचारासाठी आक्टोबर ते मे १९३७ या काळात ते पंचफुला रोडवरील डॉ.धर्मवीर यांच्याकडे ते राहिले होते. त्यावेळी ते दररोज या रोडवर फिरायला येत असत आणि या विहिरीचे पाणी पित असत. येथील औषधी पाण्याने आणि शुध्द हवेने ते बरे झाले व नंतर नव्या उत्साहाने

त्यांनी परत स्वातंत्र्य संग्रामात उडी घेतली. या ठिकाणी आम्ही नेताजींच्या पवित्र स्मृतीला वंदन केले.

डलहौसी येथील आणखी एक प्रसिध्द ठिकाण म्हणजे गांधी चौक. येथे प्रसिध्द तिबेटी बाजार आहे. चिनने जेव्हा तिबेटवर हल्ला केला तेव्हा हजारे तिबेटी आश्रयासाठी येथे स्थलांतरीत झाले होते. त्यातिल बरेचसे कालांतराने हे शहर सोडून गेले. मात्र जाताना रस्त्याच्या कडेला त्यांनी निर्माण केलेली लेणी आणि गांधी चौकातिल तिबेटी बाजारच्या स्वरुपात आपल्या खूणा ठेवून गेले. आमच्यापैकी काहीजणांनी येथे खरेदी केली.

त्यानंतर आम्ही भेट दिली सुभाष चौकाला. येथे नेताजी सुभाषचंद्र बोस यांचा पुतळा उभारला आहे. या चौकातच फ्रान्सिस चर्च आहे. त्या चर्चला आणि तेथिल झूला भेट दिली. या

ठिकाणी असलेल्या मोराने चक्क पिसारा उभारला होता. तसे जामनगरला आम्ही दररोज मोर बघतो परंतु पिसारा उभारलेला मोर बघणे हा वेगळाच अनुभव आहे.

फ्रान्सिस चर्चला भेट दिल्यानंतर आम्ही डलहौसी शहराच्या बाहेर पडलो ते सरळ चमेरा लेकच्या दिशेने निघालो. डलहौसीहून चमेरा लेक ३४ किलोमिटर आहे. परंतु रस्ता वळणा वळणाचा आणि पूर्णपणे घाट रस्ता आहे. धरण दिसायले लागले होते परंतु रस्ता काही संपतच नव्हता. शेवटी एका बोगद्यातून गेल्यावर धरणाचा बोटींग करता असलेला स्पॉट दिसायला लागला. तेथुन जवळच भालेई मातेचे मंदिर होते. आम्ही आधी भालेई मातेच्या मंदिरात जायचा निर्णय घेतला.

आपल्याकडे ज्याप्रमाणे दक्षिण काशी म्हणून अनेक देवस्थानांचे नांव घेतले जाते. त्याच प्रमाणे वैष्णोदेवीच्या खालोखाल प्रसिध्द असणारी बरीच मंदिरे आहेत त्यापैकीच हे एक मंदिर आहे. या मंदिरात जाण्यासाठी साधारण शंभर पायऱ्या चढाव्या लागतात. मंदिराला छान दगडी कमान केलेली आहे.

भद्रकालीला येथे भालेई माता असे संबोधले जाते. हे स्थळ भाल्यासारख्या टोकदार असणाऱ्या डोंगरावर असल्याने त्याला भालेई असे म्हणातात. समुद्रसपाटीपासून याची उंची ३८८० फुट आहे. हे मंदिर चंबा या जिल्हाच्या ठिकाणापासून ४० किलोमिटर तर डलहौसी पासून ३५ किलोमिटर आहे. आश्विन आणि चैत्र महिन्यांत येथे नवरात्री उत्सव साजरा केला जातो.

या मंदिराची कथा मोठी रंजक आहे. माता भद्रकाली राजा प्रतापसिंग यांच्या स्वप्नांत आली व तिने मी “भ्रण” येथे गाडलेल्या अवस्थेत आहे, तिथुन मला बाहेर काढ आणि योग्य जागी माझे मंदिर बांध असे सांगितले. हे भ्रण गांव सध्याच्या मंदिरापासून तिन किलोमिटर अंतरावर आहे.

राजा प्रताप सिंग यांना आपली राजधानी चंबा येथे मंदिर बांधायचेच होते. त्याला शुभ शकुन झाला असे म्हणुन ते आपल्या सैनिकांसह मूर्ती शोधण्याकरीता निघाले. मूर्तीचा शोध घेतल्यानंतर परत येताना वाटेत ते सर्वजण भालेई येथे विश्रांतीसाठी थांबले. विश्रांती झाल्यावर परत चंबाच्या दिशेने निगण्याकरीता मूर्ती उचलु लागले असता मूर्ती जागची हालेना. याच्यावर तोडगा काढण्याकरीता किलोद येथील ब्राह्मणाला बोलावून उपाय विचारला तेव्हा त्याने सांगितले की, देवीची इच्छा इथेच रहाण्याची आहे. दुसऱ्या कथेनुसार येथील ग्रामस्थांचादेखिल देवीला येथुन हलवून चंबाला नेण्यास विरोध होता, म्हणून त्यांनीही राजाला भालेई येथेच मंदिर बांधण्याची विनंती केली.

कारण काही असो राजा प्रताप सिंग यांनी भालेई येथे हे मंदिर बांधले. कालांतराने राजा श्री सिंग यांनी त्याचे नूतनिकरण केले. दुर्दैवाने सन १९७३मध्ये मंदिरामधील मूर्तीची चोरी झाली. परंतु सुदैवाने ती मूर्ती परत सध्याच्या धरणाच्या परिसरात सापडली. परंतु तेव्हापासून

त्या मूर्तीमधून घामाच्या धारा लागु लागल्या असे म्हणतात. भालेईमाता मंदिराच्या टेकडीवरून चमेरा धरणाचा परिसर अगदी लॅंडस्केप सारखा दिसतो. एवढ्या उंचीवरून चंबा खोरे पहाणे म्हणजे डोळयांना मेजवानीच आहे.

भालेई मातेचे दर्शन करून झाल्यावर आजच्या लंचचा मेनू कोंकणातिल दडपे पोहे करायचे असा ठरवला. त्याकरीता पोहे, मीठ, तिखट, तेल ही सर्व सामुग्री रोह्याहून येताना बरोबर आणलेली होती. फरसाण, टॉमॅटो आणि कांदे मुंबईहून आणलेले होते. हिरवी मिरची आणि कोथिंबीर भालेई मातेच्या पायथ्याशी असलेल्या सब्जीच्या दुकानातून घेतली. ओला नारळदेखिल होता परंतु तो किसायचा कसा हा प्रॉब्लेम होता. पोहे कालवण्याकरीता आमच्या सामानात प्लॅस्टीकची बालदी होती.

पोहे बनविण्याकरीता आमच्या सोबत गब्बुपण कामाला लागला होता. सुरीने कांदे कापण्यात तो मदत करत होता. ते सर्व साहित्य एकत्र करून प्लॅस्टीक बादलीत ते दडपे पोहे कालवले आणि ते खायला मात्र खाली चमेरा लेकपाशी गेलो. दडपे पोह्यांचा बेत मस्तच जमला होता. भरपुर दडपे पोहे खाऊन झाल्यावर आम्ही लेक पहाण्याकरीता बोटींग करण्याच्या धक्यावर गेलो.

लेकमध्ये बोटींग करण्याच्या दृष्टीने चौकशी करायला गेलो असता त्यांनी सांगितलेले दर ऐकुन चाटच पडलो. बोटींग करायचे अंतर आणि वेळ याचा विचार करता दर खूपच जास्त होते. याच्यापेक्षा खूप कमी पैशात आम्ही मांडवा ते मुंबईमधील गेट वे पर्यंतचे अंतर अगदी कमी पैशात पार करतो. त्या जलप्रवासाला वेळदेखिल बराच लागतो. त्यामुळे आमच्यापैकी कोणीही बोटींगकरीता गेले नाही. लेकच्या पार्श्वभूमीवर फोटो मात्र काढले. त्यावेळी तिथे लेकमध्ये बरीच बदके पोहताना दिसत होती.

चमेरा लेक पाहून होईपर्यत बराच वेळ झाला होता. आज आम्हाला पठाणकोट येथे वस्तीला जायचे होते. त्यामुळे आमचा प्रवास आता त्या दिशेने सुरु झाला.

पठाणकोटच्या रस्त्याच्या दोन्ही बाजुला बरीच आंब्याची झाडे दिसत होती. वाटेत एक शहरवजा गांव लागले. तेथे गब्बुने गाडी थांबविली.रस्त्याच्या बाजुला अनेक दुकाने होती. त्या दुकानांमध्ये विकायला ठेवलेली एक वेगळीच वस्तु होती. तिचे नांव होते आमके पपड. आंब्याच्या रसापासून बनविलेले हे पापड म्हणजे आपल्याकडे बनवतात ती आंबापोळी अथवा साठे होती. रायवळ सारख्या आंब्यापासून बनविलेली असल्यामुळे आंबट लागत होती. आपल्याकडे चिपळुण रत्नागिरी येथे मिळतात तशा जेलीच्या स्वरुपातही आंब्याच्या वड्या विकायला ठेवलेल्या होत्या. अशाप्रकारच्या आंब्याच्या जेली आम्हाला अमृतसरमध्येही नंतर बघायला मिळाल्या.

पठाणकोट येथील गुरुदास पुर रोड वरील न्यू पटेल नगरमधील गुरुराज गेस्ट हाऊसमध्ये आम्ही उतरलो होतो. वास्तविक आमच्या सहलीच्या नियोजनात पठाणकोट येथे जायचे नव्हते परंतु डलहौसीला झालेल्या हॉटेलच्या बुकींगमध्ये झालेल्या घोळामुळे आम्ही फक्त पठाणकोट येथे वस्तीला आलो होतो. तेथिल कोणतेही स्पॉट बघण्याचा आमचा शेड्युल नव्हता. कारण उद्या आम्हाला धरमशाला येथे जायचे होते.

****

दिवस बारावा

धरमशाला दर्शन

आज दिनांक २५ मार्च २०१६! सकाळी जरा उशिरा म्हणजे साडे आठ वाजता सगळीजण तयार होऊन गाडीमध्ये हजर झाले. आज धरमशाला परिसर दर्शन हा आमचा कार्यक्रम होता.

धर्मशाळा हे हिमाचल प्रदेशमधील मोठे शहर असून हे जिल्ह्याचे ठिकाण आहे. हे शहर “भागसु” या नावानेदेखिल ओळखले जाते. येथे दलाई लामा यांचे निवासस्थान आणि तिबेटी प्रशासनाचे मध्यवर्ती ठिकाण आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदिंनी स्मार्ट सिटी योजनेमध्ये निवडलेल्या १०० शहरांपैकी हे एक आहे. देवदार वृक्षांच्या दाट वनराईने युक्त अश्या कांग्रा घाटीमध्ये वसलेले हे निसर्गरम्य स्थळ आहे. एम् सि लिओडगंज, भागसुनाग, धरमकोट, नड्डी, फॉरसिथगंज, कोतवाली बझार, कचेरी अड्डा, धारी, रामनगर, सिद्धपुर आणि सिध्दबारी ही या शहराची उपनगरे आहेत.

धर्मशाळा येथे आंतर राष्ट्रीय क्रिकेटचे मैदान आहे. हे आंतर राष्ट्रीय दर्जाचे मैदान आहे. येथे आय पी एल् च्या, एकदिवसीय, टेस्ट मॅच असे सर्व प्रकारचे सामने होतात. आम्ही हे मैदान पहावयास गेलो परंतु सुरक्षेच्या कारणा वरून आम्हाला आत सोडले नाही.

धर्मशाळा शहरामध्ये प्रवेश करताना लक्ष वेधून घेतो तो गोरखा रेजिमेंटचा कॅटोन्मेंट एरिया. हे सर्व शहर टेकड्या टेकड्यांवर वसलेले आहे. सर्वप्रथम आम्ही नड्डी या विभागात उतरलो. तेथे पांच सहाजण स्टँडवर दुर्बिणी घेऊन उभे होते. त्या दुर्बिणीमधून ते दूरवरच्या शिखरांवर असणारे निरनिराळे पॉईंट दाखवत होते.

थोडे पुढे गेल्यावर बुरान फुलांची झाडे होती. अगदी हाताने काढता येतिल इतक्या जवळ तिथल्या झाडांवर फुले होती. ती फुले काढून आम्ही सगळ्यांनी त्या फुलांसोबत फोटो काढले. बायकांनी केसात माळून तर पुरुषांनी शर्टाच्या बटनहोलमध्ये लावूनही फोटो काढले.

थोडे अंतर चालुन गेल्यावर माता निर्मलादेवी यांनी स्थापित केलेल्या सहज योग आश्रमात गेलो. त्या ठिकाणी मेडिटेशनसाठी रहाण्याचीही व्यवस्था आहे. मार्च १९८५मध्ये स्वत: माताजी

आशिर्वाद देण्यासाठी येथे राहिल्या होत्या. सर्वांनी तेथे चालू असलेल्या मेडिटेशनमध्ये सहभाग घेतला. मेडिटेशननंतर मनाला शांतता आणि तरलता आल्याचे जाणवले, समाधान वाटले.

निर्मला माता यांनी स्थापित केलेले सहजयोग केंद्र पाहिल्यानंतर आम्ही भगसु नाग मंदिरात जाण्याचे ठरविले. वाटेत जाता जाता रस्त्याच्या कडेला असलेले दाल सरोवर पाहिले. हे दाल सरोवर म्हणजे एक तलाव होता. तलावाच्या आजुबाजुचा परिसर निसर्गसंपन्न आहे.

थोड्याच वेळात आम्ही एम् सि लिओडगंज पासून दोन किलोमिटर अंतरावर असलेल्या भगसुनाग मंदिरात आलो. भगसूननाग मंदिर हे पुरातन मंदिर आहे. येथे पवित्र झऱ्याच्या पाण्याचे एक कुंड आहे. कुंडापासून वरच्या बाजुला सुमारे एक दिड किलोमिटर अंतरावर भगसु धबधबा आहे.

भगसु नाग मंदीराची कहाणी फार पुरातन आहे. द्वापारयुगाच्या मध्यंतरामध्ये दैत्यांचा राजा भगसु याची राजधानी अजमेर(राजस्थान) राज्यामधे होती. त्याच्या राज्यामधे बराच काळ पाऊस न पडल्याने प्रजा दु:खी होती. प्रजेच्या प्रमुखाने राजा भगसुकडे प्रार्थना केली की, आपण पाण्याची व्यवस्था करा अन्यथा आम्हाला देश सोडुन जाणे भाग पडेल. त्यावर त्याने प्रजेला दिलासा दिला आणि स्वत: पाण्याच्या शोधाकरिता बाहेर पडला. दैत्यांचा तो राजा भगसु स्वत: मायावी जादुगार होता. फिरत फिरत दोन दिवसांनी तो १८००० फूट उंचीवर असणाऱ्या नाग दाल सरोवरापाशी पोचला. हे सरोवर खूप खोल होते. त्याचा परिघ २ मैल एवढा होता. आपल्या

मायावी शक्तीच्या जोरावर त्या सरोवरातले सर्व पाणी आपल्या कमंडलु भरले आणि तो परत आपल्या राज्यात यायला निघाला असता रात्र झाल्यामुळे तो सध्याच्या भगसु नाग येथे थांबला.

भगसुनाग मंदीर आणि धबधबा, लिओडगंज

दरम्यान नागदेवता आपल्या सरोवरापाशी आल्यावर त्यांना सरोवर पाण्याविना कोरडे झालेले दिसले. पावलांचा मागोवा घेत घेत त्या तेथे भगसु विश्रांती घेत होता त्या जागेवर आल्या. त्याच्याशी युद्ध करून नाग देवतांनी त्याला मारून टाकले. युद्धाच्या गडबडीत सर्व पाणी जमिनीवर सांडले. त्यामुळे कोरडे पडलेले सरोवर पाण्याने भरून गेले. त्याच पाण्याचा झरा येथे वाहताना आपल्याला दिसत आहे.

मरता मरता भगसुने नागदेवतेची स्तुती केली. त्याने केलेल्या स्तुतीने नागदेवता प्रसन्न झाली आणि त्यांनी भगसुला तुझी इच्छा असेल ते माग असे सांगितले. त्यावर त्याने माझ्या राज्यातिल दुष्काळ दूर व्हावा आणि माझे नांवही विश्वविख्यात व्हावे असा वर मागितला. त्यावर नागदेवतेने तथास्तु असे म्हटले. या स्थानाच्या नांवात आधी तुझे नांव येईल नंतर माझे नांव घेतले जाईल असाही वर दिला. म्हणून या स्थानाला भगसु नाग असे संबोधले जाते. त्या घटनेला आता २०१६ साली ९१२८ वर्षे पूर्ण झाली आहेत.

कलीयुगाला सुरवात झाल्यावर येथे धर्मचंद राजा राज्य करित होता. एके दिवशी धर्मचंद राजाच्या स्वप्नांत भगवान शंकर भगवान आले व त्यांनी या ठिकाणी नागदेवतेने पवित्र जलाची

स्थापना केल्या पासून मी येथे रहायला आलो आहे, तेव्हा तू या स्थानी येऊन माझी प्रतिष्ठापना कर असे सांगितले. तेव्हा धर्मचंद राजाने येथे मंदिर निर्माण केले. त्या घटनेला या वर्षी २०१६ साली ५१२४ वर्षे पूर्ण झाली आहेत.(महंत गणेशगिरजी, भगसुनाथ आश्रस यांच्या संगमरवरी लेखावरून)

४ एप्रिल १९०५ ला पूर्ण कांग्रा घाटीमध्ये मोठा भूकंप झाला होता. त्यामध्ये २०,००० लोक दगावली होती. पूर्ण धर्मशाळा परिसर उध्वस्त झाला होता. त्यातच भगसुनाग मंदिरही उदध्वस्त झाले होते. त्याची पुन: उभारणी गुरखा रायफलस् नी केली होती. आज भगसु नाग मंदिर पहिल्या गुरखा रायफलचे पवित्रस्थान म्हणून ओळखले जाते.

त्यानंतर आम्ही एम् सि लिओडगंज या धर्मशाळा येथील मोठ्या विभागात आलो. हा विभाग तिबेटी बहुल असल्याचे जाणवत होते. येथेच दलाई लामा यांचे निवासस्थान आहे. ट्रफिक पोलिसांनी आमच्या गाडीला दलाई लामा यांच्या निवास स्थाना पर्यंत जाऊ दिले नाही. म्हणून आम्ही तेथिल चौकात उतरलो आणि चालत जायला सुरवात केली.

वाटेत मेन रोडवरच एक स्तुप दिसले. आम्ही त्या स्तुपाला भेट दिली. तेथिल मुख्य कक्ष बंदच होता. परंतु बाकी सगळे पाहून आलो. तेथे असलेल्या प्रेयर व्हील फिरवत फिरवत प्रदक्षिणा घातली. त्या प्रेयर व्हीलवर “ॐ मणी पद्मे हम” ही प्रार्थना लिहिलेली असते.

या स्तुपापासून १५-२० मिनिटे चालत गेल्यावर दलाई लामा यांचे निवास स्थान होते. प्रवेशद्वारातून आत गेल्यावर डाव्या बाजुला एक तिबेटी म्युझियम आहे. तेथे चिनने तिबेटी लोकांवर केलेल्या अनन्वित अत्याचाराच्या कहाण्या फोटोंच्या स्वरुपात पहायला मिळतात. वास्तविक तिबेट हे एक स्वतंत्र राष्ट्र होते. चिनने ते ताब्यात घेण्यासाठी काय काय प्रकार केले याचे पुरावे तेथे आपल्याला बघायला मिळतात.

दलाई लामा निवासस्थानात भगवान बुद्धांची भव्य मूर्ती आहे. त्याचप्रमाणे आचार्य पद्मसंभव यांची ही मूर्ती तेथे पहायला मिळते. येथे तिबेटी संस्कृतीशी निगडित हजारो हस्तलिखित पोथ्या आणि वस्तु जतन करून ठेवलेल्या आहेत.

एम् सि लिओडगंज मधे आणखी एक तिबेटी लोकांशी निगडित एक वास्तु पाहिली. त्याचे नांव टेनझिन ग्वॉटसो मठ(monstery). या ठिकाणी तिबेटी विद्य़ार्थ्यांचे वसतिगृह आहे.

कदाचित धार्मिक शिक्षण संस्था असावी. एखादे लँडस्केप असावे तशी ही वास्तु बर्फिल्या डोंगरांच्या पार्श्वभूमीवर दिसत होती.

तिथुन आम्ही छीलगारी येथे चहाचे मळे बघायला गेलो. चहाचे मळे पाहिल्यावर मला अडुळशाची झुडपे सलग लावली आहेत असा भास झाला. आम्ही चहाची पाने चुरगळून वास घेऊन पाहिला. कोवळया पानांना नाही पण जुन पानांना चुरगळल्यावर चहाचा छान वास येत होता.

अशा तऱ्हेने आजचा पूर्ण दिवस धर्मशाळा परिसरांत घालवला. संध्याकाळी चामुंडा देवीच्या मंदिराजवळ एका हॉटेलात मुक्कामाला गेलो. हॉटेलच्या परिसरात आणखीही पांच सहा हॉटेल होती. हॉटेलचा परिसर निसर्गरम्य होता. रात्री जेवण झाल्यावर शतपावली करण्याकरीता थोडे फिरलो. आज सगळयांची आईसक्रीम खाण्याची इच्छा होती, परंतु तेथे आईसक्रीमच उपलब्ध नव्हते.

प्रवासाला सुरवात केल्यापासून आम्ही एक नियम कटाक्षाने पाळला होता. तो म्हणजे काहीही झाले तरी बाटली बंद मिनरल वॉटर शिवाय पाणी प्यायचे नाही. त्याकरीता आम्ही शक्यतो पाण्याच्या बाटल्यांचा डझनाचा बॉक्सच खरेदी करत होतो. या ठिकाणी आम्हाला असा बॉक्स खूपच स्वस्त मिळाला म्हणून आम्ही एकदम तिन बॉक्स खरेदी केले. पाण्याच्या बाबतित दक्षता बाळगल्यामुळे पूर्ण सहलीच्या काळात कोणालाही कसलाही त्रास झाला नाही.

आज दिनांक २६ मार्च! सकाळी ज्या हॉटेलात उतरलो होतो तेथेच चहा पाणी नाश्ता करून आठ वाजता तयार होऊन गाडीत बसलो. चामुंडादेवीचे मंदिर जवळच होते. चामुंडा देवी, बज्रेश्वरी देवी, ज्वालामुखी देवी आणि चिंतापूर्णी देवी ही देवीची चार धाम हिमाचल प्रदेश मधे प्रसिद्ध आहेत.

हिमाचल प्रदेशमधील कांगडा जिल्यातील चामुंडा देवीचे मंदिर बाणेर नदिच्या किनाऱ्यावर पालमपुर पासून दहा किलोमिटर अंतरावर आहे. चामुंडा देवीचे नांव तिने मारलेल्या चंड आणि मुंड या दैत्यांच्या नावावरून पडलेले आहे. या संदर्भात सप्तशतीमध्ये एक श्लोक आहे,

यस्माच्चंडं च मुंडच गृहित्वात्वमुपागता।

चामुंडति ततो लोके ख्याता देवी भविष्यसि।।

या स्थानाला चामुंडा नंदिकेश्वर धाम असेही म्हणतात. चारशे वर्षांपूर्वी राजा आणि ब्राह्मणाने देवीकडे प्रार्थना केली की, भक्तांना सहज जाता येईल अशा ठिकाणी तिचे मंदिर बांधण्याची परवानगी द्यावी. देवीने ब्राह्मणाच्या स्वप्नांत येऊन या गोष्टीला संमती दिली आणि तिने एका ठराविक जागी खणल्यास तेथे तिची पुराणकालिन मूर्ती सापडेल त्या मूर्तीची प्रतिष्ठापना मंदिरात करून त्या ठिकाणी तिची उपासना करावी असे सांगितले.

राजाने काही माणसांना मूर्ती आणण्यास पाठविले परंतु त्यांना ती मूर्ती सापडली नाही. त्यानंतर देवी परत त्या ब्राह्मणाच्या स्वप्नात आली आणि तिने सांगितले की शोध करण्यास गेलेली माणसे देवीची पवित्र मूर्ती शोधण्याच्या भावनेने न जाता एखादा दगड शोधण्याच्या भावनेने गेली होती म्हणून मी त्यांना सापडले नाही. तेव्हा तू सकाळी स्नान करून शुचिर्भूत होऊन पवित्र भावनेने शोध घे. त्या प्रमाणे तो ब्राह्मण गेला आणि ती मूर्ती घेऊन देवळात आला.

चामुंडादेवीचे दर्शन घेतल्यानंतर सर्वजण मंदिर परिसरातच असलेल्या खादी ग्रामोद्योग मंडळाच्या स्टॉलमध्ये शिरले. तिथे हिमाचलमधील वस्तु विकायला ठेवलेल्या होत्या. तिथुनच आम्ही बुरान फुलांचे सरबत आणि चटणी खरेदी केली.

चामुंडादेवीच्या दर्शनानंतर आम्ही जवळच असलेल्या “गोपाळपुर” चिडियाघरमध्ये गेलो. त्यामध्ये वाघ, सिंह, हिमालयामधील अस्वले, सांबर, हरणे, कोल्हे, ससे असे बऱ्याच प्रकारचे प्राणी आणि पक्षी होते. त्या चिडियाघरमध्ये अनेक प्रकारची झाडेही होती.

चिडियाघर बघुन झाल्यावर आम्ही देवीच्या चारधामांपैकी एक असलेल्या बज्रेश्वरी देवीच्या मंदिरात गेलो. मंदिराचे आवार प्रशस्त होते. सोमनाथ मंदिराप्रमाणे या मंदिराकडे असलेल्या प्रचंड संपत्ती करिता महमंद घोरीने दोनदा हे मंदिर लुटले होते. १९०५ साली झालेल्या भूकंपामध्ये हे देऊळ पूर्ण उध्वस्थ झाले होते. पंधरा वर्षांनी ते परत खुले झाले.

दरवर्षी संक्रातीच्या दिवशी येथे मोठा उत्सव होतो. आठवडाभर चालणाऱ्या या उत्सवात देवीला प्रथम तूपाने स्नान घातले जाते. त्यानंतर १०० वेळा साध्या पाण्याने आंघोळ घातली जाते. स्नानानंतर मातेला फुलांनी सजविली जाते.

आपल्याकडे शिखर शिंगणापुर येथे ज्याप्रमाणे पितळेच्च्या नंदिच्या मूर्ती आहेत, त्याप्रमाणे बज्रेश्वरी मंदिराच्या बाहेर सभामंडपात चार पांच पितळेच्च्या सिंहांच्या मूर्ती आहेत. मंदिराच्या रस्त्यावर प्रसाद, निरनिराळया प्रकारच्या माळा, प्रसाधनाचे साहित्य, पूजा साहित्य यांची खूप दुकाने आहेत.

बज्रेश्वरी मातेच्या दर्शनानंतर आम्ही कांगडा शहराच्या नजिकच असलेला कांगडा किल्ला बघायला निघालो. जाता जाता वाटेत एका शर्मा धाब्यावर जेवणासाठी थांबलो. गब्बुने(आमच्या बसचा ड्रायव्हर) सांगितले की, भारतिय क्रिकेट टिममधील खेळाडु या धाब्यावर खास जेवणासाठी थांबतात. जेवणासाठी अर्थातच पराठ्याचे प्रकार होते. या सहलीमधे एकुणच सगळीकडे पराठ्याचे प्रकार जास्त होते. प्रत्येक ठिकाणची चव मात्र वेगळी असायची.

कांगडा किल्ला कटोच या रजपुत राजघराण्याने बांधलेला होता. ह्या राजघराण्याचे मूळ महाभारत कालिन त्रिगर्त राज्याशी जाते. हा हिमालयातिल सर्वात मोठा आणि देशातिल कदाचित सगळ्यांत जुना किल्ला आहे. या किल्यावरून मोगल बादशहा अकबर यानेदेखिल हार पत्करली होती. काही काळाने अकबर बादशहाचा मुलगा जहांगिर याने मात्र तो जिंकला होता. या किल्याकरिता अनेक लढाया झाल्या. त्यामुळे हा किल्ला शिख, रजपुत, मोगल, गुरखा अशा अनेक राज्यकर्त्यांच्या ताब्यात आलटुन पालटुन होता. अखेरीस १८०६ साली हा किल्ला ब्रिटिशांनी घेतला होता. १९०५ च्या भूकंपामध्ये पडझड होईपर्यंत हा किल्ला ब्रिटिशांकडेच होता.



किल्यामध्ये जायला छान फरसबंदी रस्ता आहे. फरसबंदी रस्त्याच्या दक्षिण बाजुला लक्ष्मी नारायण, सितला देवी आणि अंबिकादेवी यांच्या उभ्या मूर्ती आहेत. किल्ल्याला अनेक दरवाजे आहेत. त्यांची नांवे अहानी दरवाजा, अमिरी दरवाजा, जहांगिरी दरवाजा, दर्शनी दरवाजा, रणजित सिंग दरवाजा अशी आहेत.

या किल्ल्यामधे जाताना समोरच्या टेकडीवर जयंतीमाता मंदिर दिसते. हे देऊळ गुरखा सेनेचा प्रमुख बडा काजी अमरसिंग थापा याने बांधले होते. कांगडा किल्ल्याच्या बालेकिल्ल्यामध्ये

अंबिकामाता आणि जैन मंदिर एकाच छताखाली आहे. या मंदिरामध्ये बसून “श्री सूक्ताचे” पठण केले. एकाच छताखाली दोन वेगळ्या प्रवृत्ती असलेल्या देवतांची मंदिरे कशी काय याचा मला प्रश्नच पडला. कारण अंबिकामाता म्हणजे सकल शस्त्र धारी आणि असुरांचा शस्त्राने विध्वंस करणारी देवता, तर जैन देवता ही अहिंसेचा पुरस्कार करणारी, या दोघांची मंदिरे एकत्र बांधण्याचा काहितरी वेगळा हेतू असावा. किल्ल्यामधे लक्ष्मी नारायणाचेदेखिल मंदिर आहे.

किल्ला उतरताना आम्ही मराठीत बोलत बोलत किल्ला उतरत होतो. ते ऐकुन किल्ला चढणाऱ्या एका फॅमिलीने ऐकले आणि त्यांनी आमच्याशी संवाद साधला. कारण तेही महाराष्ट्रामधील परंतु सध्या दिल्ली आणि धर्मशाळा येथे रहाणारे होते. त्यातिल मुलगी तर चक्क श्रीवर्धन येथील होती.

कांगडा किल्ला पाहून झाल्यावर आम्ही ज्वालामुखी या चारधाममधील एका देवीच्या दर्शनाला जाण्यासाठी निघालो. कांगडा किल्ल्यापासून ज्वालामुखी गाव ३३ किलोमिटर आहे. संध्याकाळी सहा वाजण्याच्या सुमारास आम्ही ज्वालामुखी गावातिल आमच्या मुक्कामाच्या ठिकाणी हॉटेलात गेलो. ज्वालामैयाची आरति ८ वाजता असते ती साधण्यासाठी आम्ही साडेसात वाजता मंदिरात जायला निघालो.

ज्वालामुखि किंवा ज्वालामैयाचे मंदिरात जायला जवळपास १००-१५० पायऱ्या चढून जावे लागते. वाटेत अनेक प्रकारची दुकाने, जेवणाच धाबे आहेत. वर चढून गेल्यावर बघितले तर जवळपास चार पाच हजार लोक दर्शनाला लाईनमधे उभे होते. त्यातच आरती करिता जवळपास अर्धा तास लाईन बंद केली होती. मंदिर परिसर खूपच विस्तिर्ण होता. तेथे असलेली मंदिरे सोनेरी रंगाची होती.

माता ज्वालामुखीचे कांगडा जिल्ह्यातिल हे मंदिर सर्व ज्वालाजी मंदिराच्या रचने प्रमाणेच आहे. चतुष्कोनी असलेल्या या मंदिराला घुमट असलेला कळस आहे. मंदिराच्या गाभाऱ्यात अखंड तेवत रहाणारी मुख्य ज्योत आहे. शिवाय आणखिही सात किंवा नऊ ज्योती तेवत असतात. त्या ज्योती हे सात आसरा किंवा बहीणींचे प्रतिक आहे, तर नऊ ज्योती हे नव दुर्गांचे प्रतिक आहे. हे मंदिर खूप प्राचिन आहे. या मंदिराचा उल्लेख महाभारतात तसेच आणखीही काही पौराणिक ग्रंथात आढळतो. पौराणिक कथे नुसार सतीच्या शरिराचे जे एकावन्न तुकडे झाले त्यातिल सतीमातेची जिभ येथे पडली. येथे असणारी ज्योती हे त्या जिभेचे प्रतिक आहे. दुसरे एक मत असे आहे की, सतीची जळती वस्त्रे येथे पडली.

या मंदिरा संबंधी एक कथा सांगितली जाते. एका गुराख्याला त्याच्या गाईंपैकी एक गाय दुध देत नाही असे आढळले. म्हणून तो त्या गाईच्या मागावर राहिला असता त्याने पाहिले की एक मुलगी अरण्यामधून बाहेर येते आणि गाईचे दूध पिऊन परत चमकणाऱ्या उजेडात अंतर्धान पावते. त्या गुराख्याने ही गोष्ट राजाला सांगितली. राजाला आपल्या राज्यात कुठेतरी सतीची जिभ पडलेली आहे ही गोष्ट माहित होती परंतु बराच शोध करूनदेखिल त्याला ती जागा सापडत नव्हती. परत त्याच गुराख्याने त्याला डोंगरामध्ये न विझता पेटत रहाणारी ज्वाला दिसल्याचे सांगितले.

त्यानंतर राजाला ती जागा सापडली आणि त्यालादेखिल त्या पवित्र ज्वालेचे दर्शन झाले. राजाने त्या जागेवर मंदिर बांधले आणि तेथे एक पूजारी नेमुन नियमित पूजेअर्चेची व्यवस्था केली. काही काळाने पांडवांनी या मंदिराचा जिर्णोद्धार केला होता असा लोकांचा विश्वास आहे.

मंदिरामधून दर्शन घेऊन बाहेर पडेपर्यंत अकरा वाजले होते. अजुन जेवण व्हायचे होते. मंदिरा बाहेर लंगर होता. परंतु तिथे इतकी गर्दी होती की, अजुन दोन तास गेले तरी नंबर लागला नसता, म्हणून मंदिराच्या पायऱ्यांच्या जवळ असणाऱ्या एका वैष्णो धाब्यावर जेवलो आणि मग हॉटेलवर गेलो. उद्या दुपारी वाघा बॉर्डरला जायचे होते आणि तिथल्या कार्यक्रमाला वेळेवर पोचायचे होते.

दिवस तेरावा

चितपूर्णी माता दर्शन आणि वाघा बॉर्डर

आज दिनांक २७ मार्च २०१६! आज संकष्टी चतुर्थी. गाडी सुरु होताच मंगलमूर्ती मोरयाचा गजर झाला. त्यानंतर श्री गणपति अथर्वशिर्षाची एकवीस आवर्तने म्हणून झाली. त्यानंतर “प्रणम्य शिरसा” ही म्हणून झाले. आजच्या नियोजित वेळापत्रकाप्रमाणे संध्याकाळी साडेचार वाजे पर्यंत वाघा बॉर्डरला पोचायचे आहे. त्यामुळे सकाळी आठ वाजताच सगळे तयार होऊन मार्गस्त झालो.

पहिला टप्पा होता चिंतपूर्णी मातेचे दर्शन. गब्बुने मंदिराच्या खाली गाडी उभी केली. मंदिराच्या दिशेने चढत असताना, वाटेत काही माणसे भेटली त्यांनी सांगितले मंदिरात जायला खूप मोठी रांग आहे चार तास गेले तरी नंबर लागणार नाही. तुम्ही बाहेर पडण्याच्या मार्गाने गेलेल तर कदाचित लवकर जाऊ शकाल. बाहेर पडण्याच्या गेटवर पोलीस बंदोबस्त होता. आम्ही त्यांना आम्हाला वाघा बॉर्डरला जायचे आहे असे सांगितले तरी ते सोडेनात. शेवटी कळसाला नमस्कार करून परत जायचे असे ठरवले. शेवटची एकदा पोलिसांना विनवणी केली. अखेर त्यांना आमची दया आली आणि त्यांनी आम्हाला गेटमधून आत सोडले. परंतु पुढे अजुन एक पोलिस गेट होतेच. परंतु तेथुन येणाऱ्या लोकांमध्ये घुसून आमच्यापैकी काहीजण आत पोचले.

चिंतपूर्णी हे प्रख्यात ५१ शक्ति पीठा पैकी एक आहे. या देवीला “छिन्नमस्तका” देवी असेही म्हटले जाते. या जागेवर सतीचे पाय पडले होते. मार्कंडय पुराणातिल उल्लेखानुसार “माता चंडिने केलेल्या घनघोर युद्धामध्ये राक्षसांचा पूर्ण विध्वंस झाला परंतु जया आणि विजया या दोघी योगिनींची रक्ताची तहान भागली नाही. ती भागवण्या करिता चंडीने स्वत:चे मस्तक कापुन त्यातून गळणाऱ्या रक्ताने त्यांची तहान भागविली.”

या बाबतित आणखी एक पौराणिक आख्यायिका आहे. छिन्नमस्तका देवीचे रक्षण रुद्र महादेवां कडुन चारही दिशांनी केले आहे. त्या रक्षण करणाऱ्या शिवरुपांची पूर्वेला कलेश्वर महादेव, पश्चिमेला नारायण महादेव, उत्तरेला मुचकुंद महादेव तर दक्षिणेला शिव बारी अशी मंदिरे आहेत. भक्तांची अशी श्रद्धा आहे की, पूर्ण भक्ति भावाने जर देवीकडे काही मागितले तर ती भक्ताची इच्छा पूर्ण करतेच. या मंदिराची स्थापना पंडित माईदास या सारस्वत ब्राह्मणाने

केली. आजही त्या ब्राह्मणाचे वंशज देवीची सेवा करीत आहेत. त्र्यंबकेश्वर येथे ज्याप्रमाणे भक्तांच्या वंशावळींची नोंद ठेवली जाते तशीच इथेही ठेवली जाते.

चिंतपूर्णी मातेचे दर्शन झाल्यानंतर आम्ही वाघा बॉर्डरला जाण्यासाठी प्रवास सुरु केला. संध्याकाळी सव्वाचार वाजता आम्ही वाघा बॉर्डरच्या पार्कींग मधे पोचलो. पार्कींगमधील गाड्यांच्या गर्दीवरून तिथे उपस्थित असणाऱ्या लोकांच्या गर्दीचा अंदाज येत होता. लाऊडस्पिकरवर स्वागताची अनाऊन्समेंट होत होती. त्यामध्ये पॉवर बँक सिमेवर नेता येणार नाही असे सांगितले जात होते. म्हणजेच मोबाईल फोन न्यायची परवानगी होती. त्यामुळे मोबाईल मधे फोटो व्हीडीओ काढता येणार होते.

दोन टप्यामधील सिक्युरीटी चेकअपमधून गेल्यावर सिमेवरचे गेट दिसु लागले. परंतु प्रत्यक्ष वाघा बॉर्डर वरील गेटच्या समोर असलेले स्टेडियम फुल झाले होते. त्यामुळे उरलेल्या सर्व लोकांना स्टेडियमच्या अलिकडे असलेल्या गेटवरच थांबवले होते. तेथे होणारा कार्यक्रम प्रत्यक्ष डोळयांनी आम्हाला पहाता येणार नव्हता. परंतु तेथे मोठी स्क्रीन लावलेली होती. त्यावर परेडचा कार्यक्रम लाईव्ह दाखवत होते.



स्टेडियमच्या बाहेर १५ ते २० हजार लोक उभे होते. वातावरण एकदम वेगळेच होते. तेथे उपस्थित असणारे सर्वच जण देशभक्तीने भारलेले होते. “भारतमाताकी जय” या सतत

होणाऱ्या घोषणेने वातावरण भारून गेले होते. प्रत्येकाचे डोळे समोरच्या स्क्रीनवर खिळलेले होते. आपल्या कडचे जवान परेड करताना ज्या पद्धतीने पाय डोक्याच्या लेव्हलला नेत होते ते पहाण्यासारखे होते. दोन्ही कडची गेट उघडल्यानंतर दोन्ही कडच्या जवानांनी एकमेकांशी हात मिळवले होते. दोन्ही कडचे ध्वज एकसाथ उतरवले जात होते. आतमध्ये स्टेडीयममधे बसूनदेखिल स्क्रिनवर दिसत होते असे व्यवस्थित दिसले असतेच असे नाही. हा कार्यक्रम सुमारे अर्धातास चालला.

भारत पाकिस्थानला रस्त्याने जोडण्याऱ्या या एकमेव सिमेवर (वाघा बॉर्डरवर) दररोज संध्याकाळी सूर्यास्ताच्या वेळेला दोन्ही देशांचे ध्वज उतरविण्याचा समारंभ होतो त्याला “Beating Retreat ceremony” असे म्हणतात. हा कार्यक्रम सन १९५९ पासून दररोज भारताच्या सिमा सुरक्षा दलातिल आणि पाकिस्थानी रेंजर्सच्या पायदळातिल जवान एकत्रित पणे करतात. हा कवायतिचा कार्यक्रम बारीक सारीक तपशिल विचारांत घेऊन केलेला आणि अतिशय जलद हालचालींनी युक्त असतो. सुर्यास्त होण्याच्या सुमारास सुरवातिला दोन्ही देशांचे जवान एकमेकांचे सामर्थ्य दाखवत पाय जास्तीत जास्त उंच नेत कवायत करतात. बरोबर सुर्यास्ताला दोन्ही गेट उघडली जातात त्यावेळी दोन्हीकडचा एक एक जवान दक्ष अवस्थेत तेथे उभा असतो दोन्ही कडचे ध्वज एकाच वेळी उतरवले जातात. दोनही जवान एकमेकांशी हात मिळवतात. दोनही गेट एकाचवेळी बंद होतात आणि हा कार्यक्रम संपतो.

कार्यक्रम संपल्यावर आम्हालाही प्रत्यक्ष सिमेपर्यंत जाऊन दिले. प्रत्यक्ष सिमेवर ऊभे राहुन परिसराचे निरिक्षण करताना मनात एक वेगळीच भावना होती. विशिष्ट पद्धतीने फेटे बांधलेले जवान आजु बाजुला वावरत होते. अनेकजण त्यांच्या बरोबर फोटो काढत होते. एकुणच आजचा दिवस संस्मरणिय असा होता.

वाघा बॉर्डरला भेट देऊन आल्यावर आम्ही अमृतसरला गेलो. अमृतसर येथे रेल्वे स्टेशन लिंक रोडवर असलेल्या विकी रेसिडेन्सि या गेस्ट हाऊसवर आमचा मुक्काम होता. आम्हाला रुम दुसऱ्या आणि तिसऱ्या मजल्यावर मिळाल्या होत्या. आता आमचा अमृतसरला दोन दिवस मुक्काम होता. त्यामुळे आजचा कार्यक्रम थोडा निवांत होता.

****

दिवस चौदावा

अमृतसर दर्शन

आज दिनांक २८ मार्च२०१६! सकाळी प्रातर्विधी आंघोळ आटोपुन आठ वाजता हॉटेलच्या समोरच असलेल्या छोट्याशा दुकानात चहा कॉफी पिण्यासाठी एक एक करून सर्वजण गेलो. एक वयस्कर शिख दांपत्य ते दुकान चालवत होते. तिथे एक जरा वेगळीच दिसणारी खारी(बिस्कीटे) मिळत होती. चहाबरोबर खायला छान लागत होती. आमचे चहा पाणी होईपर्यंत गब्बु गाडी घेऊन आला होता. लगेचच आम्ही सुवर्ण मंदिरात जायला निघालो.

सुवर्ण मंदिराच्या अलिकडे साधारण दिड ते दोन किलोमिटर अंतरावर पार्किंगमध्ये गब्बुने गाडी लावली. गाडीमधून उतरताच डोक्याला बांधायचे भगवे रुमाल विकायला अनेक विक्रेते आले. त्यातल्याच एका वृद्ध विक्रेत्या कडुन रुमाल विकत घेतले. त्यानेच ते सगळंयाच्या डोक्याला बांधले. पार्किंगच्या बाहेर आल्यावर बॅटरी रीक्षावाले सुवर्णमंदिर लांब आहे असे सांगत आम्हाला मनवु लागले. आमच्यापैकी कोणालाच अंतराचा अंदाज नव्हता म्हणून मग दोन गाड्या ठरवून सुवर्णमंदिरापर्यंत आलो.

प्रथमदर्शनी उन्हामध्ये चकाकणाऱ्या त्या सोन्याच्या मंदिराने मनाला भुरळ घातली. मोबाईल आणि वस्तु क्लॉक रुममध्ये जमा केल्या आणि मंदिराच्या गेटमध्ये प्रवेश केला. समोर मोठे सरोवर आणि त्या सरोवरामध्ये मंदिर फारच छान दिसत होते. मंदिरात जायला प्रचंड गर्दी होती. मंदिराचे पूर्ण आवार दर्शनार्थिंनी भरले होते. जवळपास चार ते पाच हजार लोक रांगेत उभे होते. परंतु रांगेला शिस्त नव्हती. एवढी गर्दी असूनही कुठेही सिक्युरीटी दिसत नव्हती. रांगेमध्ये लोक सतत “सतश्री अकाल! वा ऽ हे गुरु!!” हा जप सतत करत होते. सुमारे अडीच तास रांगेत उभे राहिल्यावर आमचा नंबर लागला.

सुवर्णमंदिर अथवा हरमिंदर साहेब हे शिखपंथियांचे सर्वांत पवित्र स्थळ आहे. अमृतसर शहरामधील हे अत्यंत पवित्र स्थान आहे. किंबहूना अमृतसर शहराचे नांवच ज्या सरोवरावरून पडले आहे ते सरोवर शिख गुरु रामदास यांनी स्वत: निर्माण केले आहे.

हरमिंदर साहेब हे गुरुद्वारा या सरोवराच्या मधोमध आहे. या गुरुद्वाराचा बाहेरील भाग सोन्याच्या पत्र्यांनी मढविलेला आहे. म्हणून या गुरुद्वाराला सुवर्ण मंदिर असे म्हणतात. या गुरुद्वाराची पायाभरणी सुफी संत साई मिया मीर यांच्या हस्ते डिसेंबर १५८८मध्ये केली गेली. या मंदिरामध्ये शिखांशिवाय अन्य लोकही मोठ्या संख्येने येतात. सुमारे ४०० वर्षांपेक्षा जास्त काळापूर्वी बांधलेल्या या गुरुद्वाराचा आराखडा गुरु अर्जुन सिंग यांनी तयार केला होता. या गुरुद्वाराला चारही दिशेने दरवाजे आहेत.

येथे येणाऱ्या भक्तांकरिता येथे लंगरची सोय आहे. लंगरमधील सर्व व्यवस्था कारसेवेद्वारे केली जाते. भक्तांची रहाण्याची व्यवस्थाही येथे केली जाते. सुवर्णमंदिर परिसरात अनेक तिर्थ आहेत. लंगरमध्ये मिळणाऱ्या प्रसादा शिवाय मंदिरात प्रसाद म्हणून एका द्रोणात अस्सल साजुक तुपातला(शिरा) दिला जातो. लंगरमध्ये खुप गर्दी असण्याची शक्यता असल्याने आम्ही द्रोणामध्ये मिळालेल्या प्रसादावरच समाधान मानायचे ठरवले आणि सुवर्णमंदिर परिसरातून बाहेर आलो.

सुवर्णमंदिराच्या बाहेरच असलेल्या एका धाब्यावर जेवायचे आम्ही ठरवले. अमृतसर येथील प्रसिद्ध अमृतसरी कुलच्याचा आस्वाद येथे आम्ही घेतला. कुलचा म्हणजे पराठ्याचाच एक प्रकार होता. परंतु छोले आणि कुलचा हा छान मेनू होता. सोबत हिरवी मिरची, दही आणि कांदाही होता त्यामुळे एक वेगळीच मजा आली.

जेवण झाल्यावर खरेदीची मोहिम सुरु झाली. आजची दुपार खास खरेदी करिता राखुन ठेवलेली होती. सुमारे दोन अडिच तास निरनिराळी दुकाने फिरून ड्रेस पिस, तयार ड्रेस, शाली असे कपड्याचे निरनिराळे प्रकार खरेदी करून झाले. मला तर त्याकरीता नविन बॅगपण खरेदी करायला लागली.

खरेदीचा कार्यक्रम पार पडल्यावर तेथुन जवळच असलेल्या जालियनवाला बागमध्ये गेलो. जालियनवाला बाग म्हणजे देशाच्या स्वातंत्र्यासाठी एकाचवेळी मोठ्या संख्येने बलिदान दिलेल्या हूतात्म्यांचे स्मृती स्थान आहे.

दिनांक ११ एप्रिल १९१९ या दिवशी ब्रिगेडीअर जनरल डायर याने अमृतसर शहराची कायदा आणि व्यवस्थेची सूत्रे आपल्या हातात घेतली आणि त्याने शहरामध्ये कोणत्याही प्रकारे सभा घेण्यास किंवा लोकांनी एकत्र येण्यास प्रतिबंध घातला. आणि ह्या नोटिशीला फारशी प्रसिद्धीही दिली नाही. अशातच दिनांक १३ एप्रिल १९१९ या दिवशी पंजाबमधील मुख्य सण बैसाखी होता.

या निमित्ताने जालियनवाला बाग येथे आजुबाजुच्या खेड्यामधून हजारो लोक जमा झाले होते. जनरल डायरला हे समताच त्याने पन्नास गुरखा हत्यारी शिपायांसह तेथे आला आणि त्यांना लोकांच्या पाठीमागे उभे करून जमावावर गोळीबार करायला सांगितला. या जमावामध्ये अनेक लहान मुले आणि स्त्रियासुद्धा होत्या. एकुण १६५० फायरिंगचे राऊंड झाडण्यात आले. त्या बागेतून जमा करण्यांत आलेल्या रिकाम्या काडतुसांवरून हा आकडा जाहिर करण्यांत आला होता. अधिकृत आकडेवारी नुसार ह्या गोळीबारात ११०० जखमी आणि ३७९ व्यक्ती मृत झाल्या होत्या. परंतु प्रत्यक्ष हा आकडा १५०० गंभिर जखमी आणि ११०० मृत असा होता.

या स्मारकामध्ये अमर ज्योती, स्मृती स्तंभ, स्मृती बाग याचे निर्माण या गोळीबारामुळे मृत्युमुखी पडलेल्यांमधे लाला लजपतराय यांचाही समावेश होता. या घटनेचा बदला घेण्याच्या हेतूने क्रांतिवीर भगतसिंग आणि त्यांच्या सहका-यांनी जनरल डायर यांच्या हत्येचा कट रचला होता.

सन १९५१मध्ये भारत सरकारने ही जागा राष्ट्रीय स्मारक म्हणून घोषित केली. त्यानंतर जालियनवाला बाग राष्ट्रीय स्मारक ट्रस्ट ची स्थापना करण्यांत आली. या ट्रस्टने जालियनवाला बागेची जागा मुळ मालकाकडुन खरेदी केली आणि त्या जागेचे सध्या दिसते आहे त्या आराखड्या प्रमाणे स्मारक बागेत रुपांतर केले.

हे सर्व काम लोकवर्गणितून करण्यांत आले. करण्यांत आले आहे. या जागेचे मूळ नांव बाग असे असले तरी ही जागा म्हणजे एक ओसाड जागा होती. त्यामध्ये असलेल्या बलिदान विहिरीचेही पुनरुज्जीवन करण्यांत आले. गोळीबारातून वाचण्याकरिता पळालेल्या अथवा जखमी झालेल्या अनेक लोकांचा या विहिरीत पडुनही मृत्यु झाल्याचे मी वाचले होते.

जालियन बागेतल्या हुतात्म्यांना वंदन करून नंतर तिथेच असणाऱ्या छोट्याशा म्युझियमला भेट दिली. तेथे असणारे त्या काळातिल वर्तमान पत्राचे फोटो पाहिले. गोळीबाराच्या खुणा दर्शविणाऱ्या भिंती पाहिल्या. या भारतिय स्वातंत्र्य संग्रामाच्या साक्षीदार असणाऱ्या स्थळाची आठवण चिरंतन रहावी म्हणून फोटो काढले.

अजुनही काही खरेदी बाकी होती म्हणून आमच्या पैकी काहीजण जालियनवाला बागेच्या बाहेरच असणाऱ्या दुकानांना भेट द्यायला गेले. तिथपर्यंत संध्याकाळचे पाच वाजुन गेले होते. सर्वजण चालतच गाडी पार्क केली होती तिथे गेलो. त्यानंतर आमचा स्टॉप होता दुर्गियाना मंदिर.

दुर्गियाना मंदिराला लक्ष्मी नारायण मंदिर, दुर्गा तिर्थ आणि सितला तिर्थ या नावानेही ओळखले जाते. हे हिंदू मंदिर असले तरी याची रचना सुवर्ण मंदिर या शिख पंथातिल गुरुद्वारा प्रमाणे आहे. या मंदिराचे दुर्गाडिया हे नांव या मंदिरातील मुख्य देवता दुर्गा देवी असल्या कारणाने दिलेले असावे. या मंदिरामध्ये लक्ष्मी आणि नारायण यांच्या मूर्तिंचीही पूजा केली जाते. येथील मूळ मंदिर १६ व्या शतकातिल होते. सध्या असणारे हे मंदिर गुरु हरसाईमल कपूर यांनी सन १९२१मध्ये परत बांधलेले आहे किंवा होते त्याचा जिर्णोद्धार केला आहे. या नूतन मंदिराची रचना सुवर्ण मंदिरा प्रमाणे केलेली आहे. या नूतन मंदिराचे उद्घाटन पंडित मदन मोहन मालविय यांच्या हस्ते झाले होते. दसरा, जन्माष्टमी, राम नवमी आणि दिपावली ला येथे उत्सव साजरा केला जातो.

दुर्गियाणा मंदिराला भेट दिल्यानंतर चहा कॉफी घेऊन मुक्कामी हॉटेलवर आलो. दिवसभर उन्हात आणि शॉपिंगमुळे ताटकळत राहिल्याने थकवा जाणवत होता. म्हणून कुठेही जायचे नाही असे मी ठरवले होते. परंतु सुवर्ण मंदिराचे लाईटिंग पहाण्यासाठी म्हणून परत सर्वजण सुवर्ण मंदिराकडे स्पेशल रिक्षा करून गेलो. लाईटिंग केलेले सुवर्णमंदिर खरोखरच पहाण्या सारखे होते. मंदिराला लावलेले सोने विद्युत रोषणाई मधे चमकत होते. रात्र होती तरी दर्शनाला सकाळपेक्षा जास्त गर्दी दिसत होती.

****

दिवस पंधरावा

कुरुक्षेत्र आणि पानिपत दर्शन

आज दिनांक २९ मार्च २०१६! आज आमच्या सहलीचा अखेरचा दिवस. आजच्या दिवसात कुरुक्षेत्र आणि पानिपत ही दोन ठिकाणे पाहिली की पानिपत येथे मुक्काम करून उद्या सकाळी पानिपत रेल्वे स्टेशन वरून मुंबईला जाणारी रेल्वे गाठायची आहे. आज ज्या ठिकाणांना भेट द्यायची आहे ती दोन्हीही युद्ध क्षेत्र आहेत. योगायोगाने सहलीचा शेवट युद्धक्षेत्राने होत आहे, कारण उद्या पासून परत प्रापंचिक जीवनात दाखल व्हायचे आहे. आणि प्रपंच म्हटला की, “दैनंदिन आम्हा युद्धाचा प्रसंग.”

कुरुक्षेत्रात दहाच्या सुमारास दाखल झालो. प्रथमच दर्शन झाले कुरुक्षेत्राच्या प्रवेशद्वाराने. प्रवेशद्वाराची कल्पना खूपच छान आहे. भगवान श्रीकृष्ण सारथ्य करीत असलेल्या अर्जुनाच्या रथाचे शिल्प प्रवेशद्वारावर आहे. त्या शिल्पानेच आम्हाला सांगितले की तुम्ही आता एका पौराणिक महत्वाच्या स्थळाला भेट देत आहात.

कुरुक्षेत्र या स्थळाचे महत्व आपल्या पौराणिक साहित्यात वर्णन केले गेले आहे. कुरुक्षेत्र हे सध्या शहर असले तरी महाभारत काळात ही युद्धभूमी होती. या स्थळी कौरव आणि पांडवांचे प्रसिद्ध युद्ध झाले होते. या युद्धात कौरवांचा पूर्ण वंश नष्ट झाला होता. तर पांडवांचा नातु आईच्या पोटात असल्यामुळे वाचला होता. लहानपणापासून आपण भगवद्गीता वाचतो आहोत. भगवद्गीतेची सुरवातच “धर्मक्षेत्रे कुरुक्षेत्रे” अशा शब्दाने केली आहे. याच ठिकाणीच भगवान श्रीकृष्णांनी अर्जुनाला गीता सांगितली होती.

वामन पुराणातिल उल्लेखानुसार कुरुराजाने वास्तव्यासाठी सरस्वती नदीच्या तिरावरील या स्थानाची निवड “तप, सत्य, क्षमा, दया, शुद्धी, दान, यज्ञ आणि ब्रह्मचर्य” या आठ पुरुषार्थाचा पुरस्कार करण्यासाठी केली. कुरुने केलेल्या या आठ तत्वांच्या पुरस्कारासाठीच्या कार्याने भगवान विष्णू प्रसन्न झाले आणि त्यांनी कुरुराजाला वर दिला की या क्षेत्राला तुझ्या नावाने म्हणजेच “कुरुक्षेत्र” या नावाने ओळखले जाईल आणि या क्षेत्रात ज्याचा मृत्यू होईल त्याला स्वर्ग प्राप्ती होईल.

कुरुक्षेत्राचे महत्व सांगणारा एक श्लोक कुरुक्षेत्र येथील ब्रह्म सरोवराच्या बाहेर प्रदर्शित केलेला आहे. तो असा आहे,

गंङ्गायां तु जले मुक्ति: वाराणस्यां जले स्थले।

कुरुक्षेत्रे त्रिधा मुक्ति: अंतरिक्षे जले स्थले।।

या श्लोकाचा अर्थ आहे गंगेच्या जलाने स्नान केल्याने मुक्ति मिळते, वाराणसी क्षेत्राच्या पाण्यात स्नान केल्याने आणि तिर्थक्षेत्री वास्तव्याने मुक्ति मिळते, मात्र कुरुक्षेत्राच्या जल, स्थल आणि आकाश या तिन्ही ठिकाणी मुक्ति मिळते.

कुरुक्षेत्रामध्ये पहाण्यासाठी अनेक स्थाने आहेत. त्यातिल आम्ही मोजकीच पाहू शकलो तरीही त्या सर्व स्थळाचा आपण परिचय करून घेऊया.

१)अर्जुन चौक:- अर्जुन चौकातिल पुरुषश्रेष्ठ महान योद्धा अर्जुनाचा पुतळा. हा जाता येता सहज दिसतो.

२)ब्रह्म सरोवर:- अतिशय पवित्र असलेल्या सरोवरात स्नान केल्याने सर्व पापांतून मुक्ति मिळते आणि "पुनरपि जननं पुनरपि मरणं" या दुष्ट चक्रांतूनही सुटका होते. सोमवति अमावस्येला या सरोवरात स्नान केल्याने विशेष लाभ होतो असाही भाविकांचा विश्वास आहे. भगवान श्रीकृष्ण सारथ्य करित असलेल्या अर्जुनाच्या रथाचे जगांतिल सर्वात मोठे ब्रांझचे शिल्प येथे साकारलेले आहे पुराणातिल उल्लेखानुसार स्वत: ब्रह्मदेवाने या ठिकाणी प्रचंड यज्ञ करून सृष्टीच्या निर्मितीला प्रारंभ केला. थोडक्यांत ब्रह्मसरोवर हा या सृष्टीचा पाळणा आहे.

३)ज्योतिसर:- ज्योती सर याचा अर्थ आहे, ज्योती म्हणजे प्रकाश आणि सर म्हणजे गाभा म्हणजेच सूक्ष्म ज्ञान. ज्योतीसर हे गांव कुरुक्षेत्र पेहोवा रोडवर आहे. अर्जुनाच्या मनाला पडलेला मोह अथवा राज्याच्या प्राप्ती करिता आपल्याच सुहृदांबरोबर युद्ध करावे की नाही याचा झालेला संभ्रम दूर करण्याकरिता भगवान श्रीकृष्णाने पवित्र गीता सांगितली आणि शेवटी आपले विश्वव्यापी स्वरुप दाखवले ती जागा येथे आहे. ज्या वडाच्या झाडाखाली हा दिव्य संवाद झाला ते वडाचे झाड आजही येथे आहे असा लोकांचा दृढ विश्वास आहे.

४)भिष्म कुंड:- जेव्हा पितामह भिष्मांच्यावर शिखंडीने शरवर्षाव केला तेव्हा त्यांनी त्याला प्रतिकार केला नाही आणि ते धारातिर्थी पडले.

त्यानंतर त्याच जागेवर त्यांच्याच सांगण्यावरून अर्जुनाने त्यांना शरशय्या करून दिली. त्यांना ईच्छा मरणाचा वर होता, त्यामुळे त्यांनी उत्तरायण सुरु होईपर्यंत मरण स्विकारले नव्हते. त्यांची तहान भागविण्याकरिता अर्जुनाने बाण मारून जमिनीतून पाणी काढले होते. त्या बाणगंगेचेच हे कुंड. त्याला भिष्म कुंड असे नांव पडले. ते कुंड आजही लोकांची तहान भागवते आहे.

५) संन्निहित सरोवर:- हे सरोवर म्हणजे सात (सरस्वती)आसरांचे भेट होण्याचे स्थान आहे असा समज आहे. ह्या सरोवरातिल पाणी अतिशय पवित्र आहे अशी लोकांची श्रद्धा आहे. येथे अमावस्येच्या दिवशी स्नान केल्याने अश्वमेध यज्ञ केल्याचे पुण्य मिळते. या ठिकाणी पिशाश्च बाधा दूर होते. या शिवाय मृत झालेल्या व्यक्तिंचे पिंडदानही येथे केले जाते. सरोवराच्या कडेला विष्णू,

लक्ष्मी नारायण, हनुमान, दुर्गा देवी, धृव नारायण, धृव भगत यांची मंदिरे आहेत. हे सरोवर भगवान विष्णूंचे आश्रयस्थान आहे अशी लोकांची श्रद्धा आहे.

६)श्रीकृष्ण संग्रहालय:- कुरुक्षेत्र येथे पाह्यलाच पाहिजे अशा स्थळांपैकी श्रीकृष्ण म्युझियम हे स्थळ आहे. भगवान श्रीकृष्णाच्या जीवनातिल महत्वाचे प्रसंग निरनिराळया माध्यमातून येथे साकार केलेले आहेत. यामध्ये मूर्ती, चित्रे, पडदे, शिल्प, हस्तकला यासारख्या अनेक माध्यमांचा मोठ्या खुबीने वापर केला आहे. महाभारतात्तिल अनेक प्रसंग मल्टी मिडियाच्या सहाय्याने अकृत्रिमपणाने सादर केले आहेत. चक्रव्युहाचे दृष्यतर चक्रव्युहातून फिरायला लाऊन दाखवले आहे.

कुरुक्षेत्र हे सरस्वती नदिच्या किनाऱ्यावरच होते. किंबहूना प्राचिन भारतिय संस्कृती ही सरस्वतीच्या किनाऱ्यावरच बहरली होती. नैसर्गिक बदलामुळे सरस्वती नदी लुप्त झाली. तिच्याबरोबरच महाभारत कालिन संस्कृति दाखविणारी सर्व शहरही जमिनीच्या पदराखाली लुप्त झाली.

भारतिय पुरातत्ववेत्यांनी अथक परिश्रम करून उत्खनन केले आणि त्या संस्कृतीचे नमुने आपल्याला अवलोकनार्थ या संग्रहालयात ठेवले आहेत. त्या सुप्त सरस्वती नदीचा शोधही पद्मश्री डॉ. विष्णू श्रीधर वाकणकर यांनी लावला आहे. या आणि अशा अनेक पुरातत्वीय संशोधनाकरीता त्यांना अनेक परदेशी पुरस्कारही मिळाले आहेत. या संग्रहालयात हिमाचल प्रदेश, हरियाणा, गुजरात अशा अनेक ठिकाणी सापडलेल्या वस्तु येथे अवलोकनार्थ ठेवलेल्या आहेत. आमचे दोन अडिच तास हे संग्रहालय पहाण्यात गेले.

७)भद्रकाली मंदिर:- भद्रकाली माता मंदिर हे कुरुक्षेत्र येथील प्रसिद्ध मंदिर आहे. हे मंदिर सतिच्या एकावन्न पिठांपैकी एक मंदिर आहे. भगवान विष्णूंनी सुदर्शन चक्र सोडल्यानंतर सतीच्या शरिराचा उजव्या पावलाचा भाग या ठिकाणी पडला. हे मंदिर स्थानेश्वर मंदिराच्या जवळच आहे.

या स्थानाला सिद्धपिठ मानले जाते. मंदिराच्या समोर एक कुप आहे. त्या कुपामध्ये एक कमळाचे शिल्प आहे. मनोकामना पुर्ण झाल्यावर भक्त मातिच्या घोड्यांच्या मूर्ती या कुपावर ठेवतात. महायुद्धा पूर्वी भगवान श्रीकृष्णाच्या सांगण्यावरून अर्जुनाने या ठिकाणी देवीसमोर दुर्गा स्तोत्राचा पाठ केला होता.

८) स्थानेश्वर महादेव मंदिर:- स्थानेश्वर महादेव मंदिर हे कुरुक्षेत्र येथील पुरातन मंदिर आहे. या मंदिराचा उल्लेख महाभारतामध्ये केलेला आहे. आपल्या मनोकामना पूर्ण करण्यासाठी भक्त येथे विधिपूर्वक अभिषेक करतात. सकाम अथवा निष्काम अशा कोणत्याही भावाने स्थानेश्वराचे दर्शन घेतले तरी भक्त आपल्या सर्व पापांमधून मुक्त होतो. या मंदिरात आल्याशिवाय कुरुक्षेत्राची यात्रा पूर्ण होत नाही असे म्हणतात. महायुद्धापूर्वी अर्जुनाने स्थानेश्वराची विधिपूर्वक पूजा केली होती.

स्थानेश्वर दर्शनाला शिखांचे नववे गुरु तेगबहादूर आले होते असा उल्लेख सापडतो. या मंदिराच्या बाजुलाच त्यांच्या या भेटीच्या स्मृती प्रित्यर्थ “नवी पातशाही गुरुद्वारा” बांधलेला आहे.

या मंदिराच्या बाहेर एक सरोवर आहे. त्याच्या पाण्याने स्थानेश्वराची पूजा केल्याने सर्व रोगांपासून मुक्ती मिळते असा भक्तांची विश्वास आहे. त्या सरोवरावर महिलांनाही स्नान करण्याची स्वतंत्र सोय केलेली आहे.

आमच्याकडे वेळ फार कमी होता त्यामुळे वरीलपैकी ब्रह्म सरोवर, श्रीकृष्ण संग्रहालय आणि भद्रकाली माता मंदिर या ठिकाणीच आम्ही गेलो. कुरुक्षेत्र हे धर्मक्षेत्र असल्याने येथे अनेक

तिर्थक्षेत्र आहेत ज्याची माहिती मला मिळाली नाही. हरियाणा सरकारने पर्यटकांना दृष्टीसमोर ठेवून या तिर्थक्षेत्राचा चांगला विकास केला आहे.

आजच्या दिवसात पानिपतमधीलही काही स्थळांना भेट द्यायची होती म्हणून कुरुक्षेत्राची भेट आवरती घेतली. तरीही आम्हाला पानिपतला पोचायला पाच वाजुन गेले. पानिपतमध्ये युद्ध क्षेत्र बघणे हे आमच्या दृष्टीने महत्वाचे होते. पानिपत शहरात शिरल्यापासून युद्ध क्षेत्राची चौकशी करायला सुरवात केली. बऱ्याचलोकांना ते माहितच नव्हते. कालाआम या नावाने चौकशी केली तरी कोणी नक्की मार्ग दाखवेना. शेवटी गुगल मॅपच्या मदतिने काला आम या पानिपत युद्ध स्मारक बागेपर्यंत पोचलो.

मी श्रीवर्धनचा म्हणजे पेशव्यांच्याच गावचा, पेशव्यांचा वाडा आमच्या घरा जवळच आहे. त्यातच ऐतिहासिक कादंबऱ्यामध्ये पानिपत युद्धा विषयी खूप वाचले होते. त्यामुळे ज्या युद्धक्षेत्रावर मराठ्यांचा दारुण पराभव झाला. जेथे हजारोंच्या संख्येने मराठी लोकांचे रक्त सांडले त्या जागेचे दर्शन घेणे आणि प्रणाम करणे हा पानिपतला भेट देण्याचा माझा प्रमुख उद्देश होता. कदाचित माझे पूर्वजही त्या धारातिर्थी पडलेल्यांपैकी एक असतिल. कारण मी वाकणकर कुलाची माहिती मिळवली तेव्हा माझे असे लक्षांत आले की, जेथे जेथे पेशवे स्वारी करिता गेले तेथे तेथे वाकणकरांचे वंशज रहात आहेत.

या ठिकाणी हरियाणा पर्यटन विकास विभागाने “काला आम युद्ध स्मारक बाग” छान तयार केली आहे. त्याबद्दल हरियाणा सरकारचे आभार मानायलाच हवेत. प्रसिद्ध कादंबरीकार विश्वास पाटील यांनी पानिपत या विषयावर कादंबरी लिहिली आहे. त्यांनी हल्लीच पानिपत येथे भेट दिली होती त्या वेळचा त्यांनी लिहिलेला अनुभव येथे देत आहे.

ते म्हणतात, ”वडिलांच्या अस्थिविसर्जनाच्या निमित्ताने मी हरिद्वारला गेलो होतो. तेव्हा शेजारच्याच पानिपत परिसरातून नव्याने हिंडून आलो. युद्धाच्या वेळची शुक्रताल, बडौत, नजिबाबाद, कुंजपुरा ही ठाणी आणि जुन्या खाणाखुणा अजूनही तशाच आहेत. पानिपत जिल्ह्यातील एका गावाचेच नाव भाऊपूर असे आहे. मराठ्यांचा दारुण पराभव होऊन काही हजार कुटुंबे पळापळीनंतर उत्तरेतच स्थायिक झाली. कर्तृत्ववान बनली. त्यापैकी काही जणांनी उत्तर प्रदेशासारख्या बलाढ्य राज्याच्या मुख्यमंत्रिपदापर्यंत मजल मारली.

पानिपताच्या युद्धाच्या वेळी आपले बापजादे यमुनाकाठी घिसाडघाईने कपाळमोक्ष करून घेण्यासाठी आले नव्हते, तर इकडे राष्ट्राच्या उत्थानासाठी आले होते, याच नवजाणिवेने आता तिकडे स्थलांतरित मराठ्यांमध्ये नवजागृतीची लाट आली आहे. युद्धाच्या वेळी मराठी लष्कराने पानिपताच्या किल्ल्यात रोजच्या पूजेसाठी भवानीचे छोटेसे मंदिर बांधले होते. त्याचा गेल्या वर्षी जीर्णोद्धार झाला आहे. अगदी शेवटच्या क्षणी केवळ अल्लातालाच्या कृपेने अब्दालीला तेव्हा तो विजय मिळालेला होता, त्याचे निशाण उराशी कवटाळताना त्याला धाप लागली होती. खणाणत्या, जिगरबाज मराठा तलवारींची त्याने एवढी दहशत खाल्ली होती की, विजयी होऊनसुद्धा पुन्हा हिंदुस्थानावर आक्रमण करायचे त्याला धाडस राहिले नाही. आज अडीचशे वर्षांच्या दीर्घ पल्ल्यानंतरही या परिसरातले जोगी जमातीचे शाहीर आम्ही केव्हाच वेड्या ठरवलेल्या भाऊसाहेब पेशव्यांचेच पोवाडे आजही गातात; अब्दालीचे नव्हेत! पराजयाचा कलंक लागूनही कळीकाळानेच जणू भाऊसाहेबांना अमरत्वाच्या सिंहासनावर आरूढ केले आहे. आज "रोड मराठा' या नावाने आपले बांधव त्या दूरदेशी लाखालाखांच्या संख्येने एकत्र येऊ लागले आहेत. हरियानात मेळावे भरवू लागले आहेत.

पानिपत येथील काला आम या युद्धभूमीला काला आम नांव का पडले त्याला एक ऐतिहासिक कथा आहे. या युद्ध भूमिवर तिन युद्ध झाली होती. त्या ठिकाणी एक आंब्याचे झाड होते ते तोडले असता त्यातून रक्त येत असे अशी आख्यायिका आहे. म्हणून या जागेला “काला आम” असे म्हणतात.

या बागेच्या बाजुलाच एक गव्हाचे शेत होते. त्याचे फोटो काढून झाले. या युद्धभूमीवरील स्मारक बाग बघुन होईपर्यंत संध्याकाळ झाली. त्यानंतर मग कुठेच जाणे झाले नाही. तेथुन सरळ मुक्कामाच्या हॉटेलला गेलो.

पानिपतमध्ये ज्या ठिकाणाला आवर्जुन जायला हवे होते अशा एका जागेचा इथे फक्त उल्लेख करतो. कारण तिथे जाणे तर झाले नाही. ते ठिकाण होते देवीचे मंदिर. या देवळाचा जिर्णोद्धार पेशव्यांनी केला होता. पानिपत येथील हे देवी मंदिर तसे पुरातन आहे. अठराव्या शतकात हा भाग मराठ्यांच्या अधिपत्याखाली होता. श्रीमंत सदाशिवराव भाऊ एकदा अफगाण स्वारी करिता या गावातून जात होते. तेव्हा ते येथे दोन महिने राहिले होते. त्यांनी देवीचे मोडकळीस आलेले मंदिर पाहिले आणि त्यांनी त्या मंदिराचा जिर्णोद्धार केला. त्याचवेळी बाजुचे तळेदेखिल दुरुस्त केले.

त्यानंतर पानिपत युद्धातून वाचलेल्या एका मंगल रघुनाथ नावाच्या सैनिकाने त्या देवी मंदिरा जवळ एक शंकराचे मंदिर बांधले. त्या शिव मंदिराला आजही मंगल रघुनाथ शिव मंदिर असे म्हटले जाते.

हॉटेलमध्ये दाखल झाल्यावर सर्व सामान चेक करून रुम मधे ठेवले. आता इतके दिवस सोबत असलेली बस सोडायची होती. गब्बु आणि शिवा(क्लिनर) १७ तारखे पासून आज २९ तारखेपर्यंत सतत आमच्या बरोबर होते. त्यांना शक्य होती तेवढी जास्तीत जास्त सेवा त्यांनी दिली होती. त्यामुळे त्यांना सगळ्यांनी मिळून बक्षिसी दिली. त्यांचा आणि गाडीचा निरोप घेतला.

आज सहलीतिल मुक्कामाची शेवटची रात्र होती. सकाळी आठची ट्रेन होती. आज दिवसभर गरमा होत होता. त्यामुळे रुम ताब्यात घेतल्यावर स्वच्छ आंघोळ केली. त्यानंतर सगळेजण जेवणासाठी आणि उद्या परवा गाडीमध्ये नाश्ता आणि जेवण याकरिता लागणारे सामान खरेदी करिता बाहेर पडलो. एका नेपाळी माणसाच्या हॉटेलात जेवलो. सकाळी स्टेशनवर जाण्याकरीता वाहन काय मिळेल याची चौकशी केली. कारण आता आम्हाला आमच्या सामानाच्या वाहतुकीची व्यवस्था स्वत:च करायची होती.

****

दिवस सोळावा

सहलीचा अखेरचा दिवस

आज दिनांक ३० मार्च २०१६! सकाळी साडे सहा वाजता सर्वजण तयार होऊन सर्व सामानासह हॉटेलच्या खाली हजर होते. जवळच असलेल्या हायवे वरून दोन रिक्षा ठरवून आणल्या. सातच्या ठोक्याला आम्ही सर्वजण पानिपत रेल्वे स्टेशनवर हजर झालो होतो. आमच्या जवळ प्रत्येकी कमितकमी दोन बॅगा शिवाय एखादी सॅक एवढे सामान होते. आमची गाडी दोन नंबर प्लॅटफॉर्मवर येणार होती. त्याकरिता जिना चढून पलिकडे जायचे होते. एवढे सामान घेऊन पलिकडे जायचे होते शिवाय सर्व सामान गाडीत चढवायचे होते. त्यात या स्टेशनवर गाडी फक्त दोन मिनिटेच थांबणार होती त्यामुळे खूप टेन्शन आले होते.

पण तेवढ्यात एक वयस्कर पोर्टर आला व त्याने सर्व सामान पलिकडे नेऊन आमच्या डब्यात चढवून देईन असे सांगितले. त्याप्रमाणे त्याने त्याच्या ढकलगाडीवर सर्व सामान चढवून पलिकडे नेले आणि आमचा डबा जेथे थांबणार होता तिथे सर्व सामान त्याच्या ढकलगाडीवर तयारीत ठेवले आणि गाडी आल्यावर अक्षरश: दिड मिनिटात गाडीत चढवलेदेखिल. खरोखरच त्या वयस्कर माणसाच्या या स्किलला दाद दिली पाहिजे.

आता गाडी वेळेवर येऊन त्यात सर्व सामान चढवून झाले होते त्यामुळे सर्व काळजी दूर झाली होती. माझे रिझर्वेशन दुसऱ्या बोगीत होते ते टि सी च्या मदतिने सेट करून झाले. त्यानंतर प्रथम चहावाला आला होता त्याच्या कडुन चहा घेतला.

गाडी स्टेशन मागुन स्टेशन मागे टाकुन भरधाव वेगाने पुढे जात होती. प्रवासा दरम्यान दोन तिन वेळा चहा झाला. एकदा सँडविच करून खाऊन झाले. एकदा भेळ झाली. मधून मधून पत्यांचा डाव होत होता. प्रत्येकाला आता घराचे वेध लागले होते. जाताना होते त्यापेक्षा आज गाडीत विक्रेते कमी दिसत होते. मधेच एक बॅग रिपेर करणारा आला होता. त्याच्याकडुन बॅग रिपेर करून घेतली. नाहीतर उतरल्यावर त्या बॅगेची वाहतूक करणे कठीण होणार होते.

दुपारी थोडावेळ झोपुन घेतले होते. कारण आम्हाला रात्रभर जागरण करायचे होते. ही गाडी अहमदाबादला रात्री एक वाजता पोचणार होती, त्यामुळे झोपेत स्टेशन गेले तरी पत्ता लागणार नाही म्हणून झोपता येणार नव्हते आणि अहमदाबादहून जामनगरची गाडी पहाटे पाच वाजता होती त्यामुळे ती गाडी चुकायला नको म्हणून तिथेही झोपता येणार नव्हते. आमची ही

गाडी पानिपत, दिल्ली, गुरगाव, रेवरी, नरनौल, निम का थाना, रिंगास जंग्शन, फुलेरा जंग्शन, अजमेर, मारवार, फलना, अबु रोड, पालनपुर, मेहसाणा इतक्या ठिकाणी थांबली. अहमदाबाद येईपर्यंत आम्ही सात आठजण पत्ते खेळत जागे राहिलो होतो. अहमदाबादला एक वाजता आम्ही उतरल्यावर ती मंडळी झोपली. अहमदाबाद येथे गाडी जवळपास अर्धा तास थांबली होती. त्यामुळे सामान सावकाशपणाने काढता आले. पुढच्या गाडीला अजुन चार तास होते त्यामुळे सर्व सामान घेऊन वेटींगरुममध्ये गेलो. जामनगरची गाडी वेटींगरुम होते त्याच प्लॅटफॉर्मला येणार होती. त्यामुळे परत सामान जिन्यावरून हलवण्याची काळजी नव्हती.

वेटींगरुममध्ये आता साडेतिन तास काढायचे होते. म्हणून प्रथम गरमा गरम कॉफी प्यायली. नंतर टाईमपास म्हणून मोबाईलमधील फोटो बघायला सुरवात केली. फोटो बघताना परत ती सगळी दृष्य जिवंत होऊन समोर दिसायला लागली. या सहलीमध्ये आपण काय मिळवले आणि आपल काय करायच राहुन गेले याचा आढावा फोटो बघता बघता मनात चालू होता.

आपण पूर्वापार ऐकत आलो आहे की आपण जे अन्न खातो त्याचा परिणाम आपल्या आचरणावर होतो ते खरे असावे. कारण जिथपर्यंत काश्मिरमध्ये होतो तेवढ्या काळांत कुठल्याही मंदिरात जाणे झाले नाही. शंकराचार्य मंदिरात जायचेच असे ठरवून गेलो असूनही त्या मंदिराच्या बाजुलाही फिरकलो नाही. जे मंदिर बघायलो गेलो ते नेमके उध्वस्त झालेले होते. तेच जम्मुमध्ये गेल्या गेल्या बाहेरून का होईना रघुनाथ मंदिराचे दर्शन झाले. हे सर्व मनाचे खेळ चालूच होते.

आयुष्यात आपण कधी असे बर्फामधे फिरत असु अशी कधी कल्पना सुद्धा केली नव्हती ती प्रत्यक्षात उतरली होती. या सहलीच्या पंधरा दिवसाचा अनुभव असा की, ज्या गुढघेदुखीला मी घाबरत होतो त्याचा मला बिलकुल त्रास झाला नाही. त्याचप्रमाणे थंडीचेही, जामनगरला १३-१४ तापमान असताना पाय फुटणे त्यातून रक्त येणे हे प्रकार व्हायचे. पण २-३ तापमान असूनही किंबहूना शून्यपेक्षा कमी तापमान असतानादेखिल कोणताही त्रास झाला नाही.

आम्ही ज्या भागातून सहलीच्या निमित्ताने फिरलो तो जवळपास सर्वभाग हिमालयाच्या परिसरात होता. सर्वभाग पहाडी मुलखातिलच होता. निसर्गाची मुक्त उधळण असलेल्या या परिसरात फिरताना मनाला नवी उभारी आल्याचे जाणवले. सेवानिवृत्त झाल्यामुळे जीवनाला जी शिथिलता आली होती त्याच्या ऐवजी जीवन उत्साहाने भरल्याची जाणिव झाली.

सतीची जी ५१ पिठे आहेत त्यापैकी ज्वालामुखी, छिन्नमस्तिका अथवा चिंतपूर्णी, कुरुक्षेत्र येथील भद्रकाली माता या मंदिरात या सहलीच्या निमित्ताने जाणे झाले.

आतापर्यंतच्या काळात अनेक कारणांनी जे शक्य झाले नव्हते ते पटणी टॉप, पहलगाम, डलहौसी या सारख्या हिल स्टेशनवर या निमित्ताने राहणे फिरणे झाले. एकुणच आतापर्यंतच्या आयुष्यात अनेक कारणांनी जे करायचे राहुन गेले आहे ते पूर्ण करायचे हा मुदत पूर्व सेवानिवृत्ती घेण्याचा जो उद्देश होता तो या सहलीच्या निमित्ताने थोडाफार साध्य झाला.

वेटींगरुममध्ये बसून फोटो बघता बघता हे जे मनाचे खेळ चालू होते ते गाडी येण्याची वेळ झाली म्हणून थांबवून प्लॅटफॉर्मवर सामान घेऊन गेलो. जामनगरची गाडी वेळेत होती. अशातऱ्हेने या सहलीतला अखेरचा प्रवास सुरु झाला आणि ३१ मार्चला दुपारी बारा वाजेपर्यंत संपलादेखिल.

“केल्याने देशाटन पंडित मैत्री, सभेत संचार ।

शास्त्र ग्रंथ, विलोकन, मनुजा येतसे चातुर्य फार ।।”

या कवी वामन पंडितांच्या उक्ती प्रमाणे देशाटन केल्याने, विद्वान लोकांच्या संगतित राहिल्याने, निरनिराळया सभांमध्ये(सेमिनार) भाग घेतल्याने आणि शास्त्र, ग्रंथ यांच्या अभ्यासाने माणसाला शहाणपण येते. या सहलीच्या निमित्ताने देशाटन तर झाले. काही वेगळे अनुभव मिळाले त्या अनुभवातून नकळत काही शिकायला मिळाले. एकंदरीत अशा प्रकारच्या सहलीचा परत परत अनुभव घ्यायला काही हरकत नाही.

****

१७) सहलीकरीता केलेला प्रवास

काश्मिर, हिमाचल प्रदेश, पंजाब आणि हरियाणा या चार राज्याच्या सहलीकरीता दिनांक १३ मार्च २०१६ ते ३१ मार्च २०१६ या काळात प्रवास केला. त्यातिल पुष्कळसा प्रवास मिनी बसने केला. जाण्याकरीता जामनगर ते कत्रा हा प्रवास भारतिय रेल्वेने केला त्याचप्रमाणे येतानाचा पानिपत ते जामनगर प्रवासही भारतिय रेल्वेने केला. त्याच्या अंतराचा आढावा घेण्याचा येथे प्रयत्न केला आहे.

प्रवासाची तारीख	प्रवासाचा टप्पा	अंतर	प्रवासाचे वाहन
१३/३	जांनगर ते बडोदा	४२६	भारतिय रेल्वे
१४/३	बडोदा ते कत्रा	१६४८	भारतिय रेल्वे
१६/३	कत्रा ते वैष्णोदेवी आणि परत	३२	मिनी बस
१७/३	कत्रा ते पटणी टॉप	८०	मिनी बस
१८/३	पटणी टॉप ते श्रीनगर	१८५	मिनी बस
१९/३	श्रीनगर ते सोनमर्ग	८०	मिनी बस
	सोनमर्ग ते श्रीनगर	८०	
२०/३	श्रीनगर ते गुलमर्ग	५०	मिनी बस
	गुलमर्ग ते श्रीनगर	५०	
२१/३	श्रीनगर ते पहलगाम	९०	मिनी बस
२२/३	पहलगाम ते जम्मु	२८३	मिनी बस
२३/३	जम्मु ते डलहौसी	१७१	मिनी बस
२४/३	डलहौसी ते खज्जर लेक खज्जर लेक ते काला टॉप	२१ ३३	मिनी बस

	काला टॉप ते भालेई माता	५५	
	भालेई माता ते पठाणकोट	११०	
२५/३	पठाणकोट ते पंचफुला, धरमशाला	८८	मिनी बस
	पंचफुला ते भगसु नाग	१०	
	भगसु नाग ते छिलगारी	९	
	छिलगारी ते चामुंडा	१३	
२६/३	चामुंडा ते बज्रेश्वरी	१९	मिनी बस
	बज्रेश्वरी ते ज्वालामुखी	२५	
२७/३	ज्वालामुखी ते चितपूर्णी	३५	मिनी बस
	चितपूर्णी ते वाघा बॉर्डर	१९२	
	वाघा बॉर्डर ते अमृतसर	३५	
२८/३	अमृतसर दर्शन	१५	मिनी बस
२९/३	अमृतसर ते कुरुक्षेत्र	३००	मिनी बस
	कुरुक्षेत्र ते पानिपत कालाआम	८०	
३०/३	पानिपत ते अहमदाबाद	१६९	भारतिय रेल्वे
३१/३	अहमदाबाद ते जामनगर	९४८	भारतिय रेल्वे

कसं वाटलं पुस्तक मित्रांनो?

फ़ुकट असलं तरी दर्जेदार आहे ना?

काही लोकांचा असा समज आहे की जे फ़ुकट मिळतं ते कमी दर्जाचं असेल. पण तसं नसतं. आपल्याला आपले आईवडील मिळतात ना की ते आपण विकत घेतो? आणि त्यांचे संस्कार? आणि आपला देश आपलं राष्ट्रीयत्व? अगदी आपल्या आजूबाजूच्या हवेतला ऑक्सिजनही फ़ुकटच मिळतो ना. आणि हा मौल्यवान मनुष्यजन्मही फ़ुकटच मिळाला की आपल्याला!

तेव्हा मित्रांनो जे जे फ़ुकट ते ते फ़ालतू असा समज असलेल्या लोकांना एकदा ई साहित्यच्या साइटवर आणा. ई साहित्यची पुस्तकं वाचायला द्या. तुम्ही जे पेराल तेच उगवेल. जर तुम्ही समाजात चांगली मूल्यं पेराल तर तुम्हालाही या समाजात चांगली वागणूक मिळेल. समाज म्हणजे आपणच की. निदान आपल्या आजूबाजूचा समाज तरी मूल्यप्रधान करुया.

चला तर मित्रांनो, एक भव्य चळवळ उभारुया. यात प्रत्येकाने आपला सहभाग घेतला तर हा बाराकोटींचा महाराष्ट्र जगातला सर्वोत्कृष्ट अभिरुचीपूर्ण वाचकांचा प्रदेश बनायला वेळ लागणार नाही.

टीम ई साहित्य

esahity@gmail.com

www.esahity.com

एक प्रसन्न अनुभव